रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २८ एप्रिल २०२४



# राजकीय गुरुंच्या सल्ल्यामुळे काँग्रेस संकटात


आमच्या सुजाण वाचकांना विनम्र आवाहन

वृत्तपत्रांच्या जगात दैनिक आधुनिक केसरीने वेगळेपण जपत वाचकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. हे स्थान टिकवून ठेवताना व्यवहारी जगात पैशांचे सोंग आणणे मात्र अवघड आहे. त्यामुळे आमच्या लाखो सहृदय वाचकांना आम्ही विनम्र आवाहन करत आहोत की, दैनिक आधुनिक केसरी जर आपल्याला आवडत असेल तर ते सुरू ठेवण्यासाठी आपण दररोज अगदी 1 रुपयापासून पुढे कितीही रुपयांची मदत आम्हाला करू शकता.

आपले आर्थिक योगदान फोन पे नंबरवर किंवा क्यूआर कोडवर किंवा खाते क्रमांकावर देऊ शकता.
State Bank of India, A/c No. 40533797942, IFS code : SBIN0050896

आपली छोटीशी मदत आमच्यासाठी अनमोल आहे

आधुनिक केसरी

**काँग्रसने पक्षाने दोन लोकसभा निवडणुका भावनिक व सहानुभूतीच्या आधारावर जिंकल्या! नंतरही मतदारांनी काँग्रेसला नाकारले! काँग्रेसच्या विरोधात विरोधी पक्ष संघटीतपणे लढला,सत्तेत आला.पण ते करंटे निघाले! सरकार चालवू शकले नाहीत. भारतात वारसा संपत्ती कर लागू करण्याचा सल्ला राजकीय गुरु सॅम पित्रोदाने शिष्य काँग्रेसचे राहुल गांधी यांना दिला! गुरुच्या सल्यामुळे काँग्रेस पक्षच 'बैक फूट आला. भारतात नागरिकांच्या संपत्तीचे सर्वेक्षण करुन विशिष्ठ समाजाला लाभ देण्याचा काँग्रेसचा छूपा अजेंडा अखेर उजेडात आला..**


काँग्रेसने देशावर आणीबाणी लादून लोकशाहीची हत्या केली.मतदारांनी पक्षाला धडा शिकविला. नंतर कडबोळयांचे जनतापार्टी सरकार सत्तेत आले.पक्षातील अंतर्गत भेदामुळे सरकार कोसळले.काँग्रेसला पक्षाला तेच पाहिजे होते! काँग्रेसकडे बहुमत नव्हते!त्यात श्रीमती इंदिरा गांधी यांची एक हाती सत्ता घेण्याची महत्वाकांक्षा असल्याने सत्ता स्थापनेचा दावा केला नाही. घटनेत राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची तरतूद आहे!पण केंद्रात नाही. त्यामुळे १९८० मध्ये देशाला लोकसभेच्या ७ व्या मध्यावधी निवडणुकीला सामोर जावे लागले देशातील मतदारांनी इंदिरा काँग्रेसवर विश्वास दाखविला.काँग्रेसला ३५३, जनता पक्ष सेक्युलरला ४१, माकप-३६ भाकप- ११ व डीएमकेने १६ जागा जिंकल्या. विरोधी पक्ष संघटीत राहून इंदिरा काँग्रेला पराभूत करता आले असते विविध पक्षाची आघाडी करुन सरकार स्थापनेचा प्रयोग केला गेला. पण तो प्रयोग अयशस्वी झाला. आघाडी सरकार पूर्णकाळ चालू शकले नाही, याची राजकीय इतिहास नोंद झाली.काँग्रेसची २०२४ मोदी सरकारला ताचद नाही, म्हणून तर इंडी आघाडीचा प्रयोग केला आहे. या मार्गाने सत्तेत येण्याचा धूर्त डाव खेळत आहे, पण डाव काँग्रेसच्या अंगलट येत आहे. आताच प्रादेशिक पक्ष तर काँग्रेसचा कठपुतली म्हणून वापर करत आहे. यात २८ प्रादेशिक पक्षाचे वेग -वेगळे जाहीरनामे, पाच खासदार असलेले प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय जाहीरनामे काढत आहेत.इंडी आघाडी संयुक्तपणे जाहीरनामा तयार करु शकलेले नाही. मग ही आघाडी केंद्रात सरकार तरी कसे चालविणार ?असो



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


तत्कालिन श्रीमती इंदिरा गांधी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी सकाळी ९.३० वा.पत्रकाराला मुलाखत देउन निवासस्थानातून बाहेर पडत हौत्या त्याचवेळी अंगरक्षक सतवंतसिंग व बिअंतसिंग या दोघांनी ३६ गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. पंतप्रधानची हत्या करणारी पहिली घटना. या घटनेचा सर्वच राजकीय पक्षांनी निषेध नोंदविला, देशात शोकाकूल वातावरण पसरले होते. या दोन अंगरक्षकांनी हे एवढे मोठे पाऊल का उचलले ? या मागे कारण आहे.ते म्हणजे, काँग्रेसचा १९७७ मध्ये पंजाबसह इतर राज्यात दारुण पराभव झाला होता.पंजाबमध्ये अकाली दलाने सरकार स्थापन केले होते. काँग्रेसने या राज्यात पक्षाचे बळ वाढविण्यासाठी जर्नेलसिंह भिंद्रनवाले याची मदत घेतली.तो युवा नेता संजय गांधी यांना मदत करत असे. दरम्यान १९८० मध्ये संजय गांधींचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाला. गांधी परिवाराला मोठा धक्का बसला! त्यामुळे राजीव गांधी. १९८१ पायलटची नोकरी सोडूनराजकारणात उतरले.त्यांनी अमेठी मतदार संघात पोट निवडणुकीत लढविली. त्यांनी लोकदलाचे उमेदवार शरद यादव यांचा पराभव केला व लोकसभेत पोंहचले.भिंद्रनवाले यांनी काँग्रेसचा प्रचार केला होता. तेव्हा पंजाब राज्यात हिंदी भाषेला महत्व देण्यासाठी मोहिम राबविली जात होती. याला विरोध म्हणून भिंद्रवाल्याने एका हिंदी वृत्तपत्र मालकाची हत्या केली. त्यास अटक झाली पण काँग्रस सुटका केली.श्रीमंती गांधीं यांनी राजकीय फायद्यासाठी भिंद्रनवाले हा भस्मासूर तयार केला. तो राज्यात शक्तीशाली नेता बनला. १९७३ मध्ये अकाली दलाने पंजाबला स्वायत्तता देण्याच्या मागणीसाठी आंनदपूर साहेबचा प्रस्ताव मांडला होता.हीच मागणी भिंद्रनवाले याने १९८२ मध्ये केली.तो अकाली दलाच्या आंदोलनात सहभागी झाला. या गटाची स्वतंत्र खलिस्तान राष्ट्राची होती. या मागणीसाठी पंजाबमध्ये हिंसक आंदोलन सुरु झाले.१९८३ मध्ये बसमधील हिंदुनाखाली उतविले गेले व रांगेत उभा करुन गोळ्या घातल्या गेल्या. या घटनेनंतर श्रीमती गांधींनी दरबारासिंह सरकार बरखास्त केले राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली,भिंद्रनवाल्याने तर सशस्त्र साथीदाराची फौज तयार केली. त्यांच्या हिंसक कारवाया वाढत चालल्या होत्या,इतकेच नव्हे,या दहशदवादी टोळीने सुवर्ण मंदिराच्या अकाल तख्तचा ताबा घेतला. त्यांना पाकमधून मदत मिळत होती.यात भारताचे विभाजन करण्याचा कट होता, अशी गुप्तचर यंत्रणेची माहिती होती. त्यामुळे तत्कालिन पंतप्रधान श्रीमती गांधींनी दि.६ जून १९८४ सवर्ण मंदिरावर ऑपरेशन ''ब्लू स्टार' ची कारवाई केली. त्यासाठी लस्कराची मदत घेतली गेली. दहशदवादीटोळीचा प्रमुख भिंद्रनवाले व साथीदार मारले गेले.या संघर्षात ८३ सैनिक शहीद झाले, दहशदवादी इतर लोक असे ४९३ जण मृत पावले.यात सुवर्ण मंदिराचे मोठे नुकसान झाले. श्रीमती गांधी रांनी सवर्ण मंदिरावर लष्कर कारवाई केल्याने शीख समाज संतापला.त्यांच्यात असंतोष वाढत गेला,यातून पंजाब जळत होता. यात शीख विरोधात हिंदु स्वरूप आले. सवर्ण मंदिरावरील हल्याचा बदला म्हणुन अंगरक्षकांनी श्रीमती गांधींची हत्या केली! हे स्पष्ट झाले. श्रीमती गांधी हत्यानंतर काँग्रेसचे नेतेही आक्रमक झाले. त्यांनी शीख बांधवावर राग काढला. त्यांचे घरावर हल्ले केले! जाळपोळ व हत्या केली गेली. हे गांधीवादी काँग्रेस नेत्यांनी चिथावणी दिल्याने घडले! शासकीय माहितीनुसार या घटनेत २ हजर ५०० ते ३५०० शीख कुटुंबाची हत्या केली गेली. खाजगी सूत्रांची आकडेवारी ८ हजाराच्यावर आहे. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना शीख हत्याकांड घडविले! ऑपरेशन ब्लू स्टार मोहिम राबवणारे माजी लष्करप्रमुख अरूण वैद्य यांचेवरही गोळ्या झाडून हत्या केली गेली. काँग्रेसवर १९४८ च्या ब्राह्मण हत्येनंतर १९८४ मध्ये शीख हत्याकांडाचा दुसरा कलंक लागला. काँग्रेस राजवटीत दंगली मोठ्या प्रमाणात होत गेल्या? यातून राजकीय फायदा त्यांना होत गेला. काँग्रेस सरकार धर्मनिरपेक्षाच्या तुष्टीकरणाची राजकारण करत आला,आता तेच करु पहात आहे.परवा काँग्रेस पक्षाचा धर्मनिरपेक्षतेचा बुरखा पंतप्रधान मोदी टरा- टरा फाडत आहेत. घटनेत धर्माच्या नावाखाली आरक्षण देता येत नाही.तरीही आंध्र, तेलंगणा, कर्नाटक या राज्यात मुस्लिमांना समाजाला आरक्षण दिले गेले! केवळ अल्पसंख्याकाच्या नावाखाली 'वोट बँके'साठी मुस्लिमांचे लांगूनचालन केले गेले!आजही काँग्रसची हीच नीती आहे. भाजपाचा मुस्लिम समाजा बाबत विरोध नाही.भाजपा सरकार भेदभाव करत नाही.देशात घटनेने सर्वांना सर्व समाजाला समान अधिकार व हक्क मिळाले पाहिजे, असे आहे. पण याला मुस्लिम विरोध भावना भकविल्या जातात. भारताच्या पंतप्रधानाची हत्या करणे निंदनीय आहे.काँग्रेस नेते व गांधी परिवार श्रीमती गांधींना शहीदाचा दर्जा देतात. वास्तविक श्रीमती गांधी यांचे चुकीचे धोरण व निर्णयामुळे हत्या झालेली आहे.ज्या गांधीवादी काँग्रेस नेत्यांनी नरसंहार घडविला. त्यांना फाशी झाली काय? काँग्रेसने प्रथम पंजाब शांत होईल, या उद्देशाने ग्यानी झैलसिंगाना राष्ट्रपती केले व नंतर २००४ मध्ये मनमोहनसिंग यांना नामधारी पंतप्रधान केले गांधी परिवाराने रिमोट कंट्रोलने सरकारने चालविले ! राष्ट्रपती ग्यानीझैलसिंग यांचा सुवर्ण मंदिरावर लष्करी कारवाई करण्यास विरोध केला होता. श्रीमती इंदिरि गांधी हत्येनंतर राजीव गांधी यांना वारसदार म्हणून देशाचे पंतप्रधान केले.राजीव गांधीनी तर हत्याकांडावर 'मोठे झाड पडले की आजू बाजूची जमीन हादरते' असे विधान केले.यावरुन गांधी परिवाराची मानसिकता दिसून येते. श्रीमती गांधीची हत्येने काँग्रेसला तर ऑक्सीजन मिळाले. १९८४ मध्ये मुदतपूर्व आठव्या लोकसभेची निवडणूक घेण्यात आली. काँग्रेस पक्षाने प्रचारात श्रीमती गांधी राष्ट्रीय एकता व राष्ट्रासाठी बलिदान दिले!असे म्हणत श्रीमती गांधी हयात असताना भाषणातील 'माझ्या शरिरात रक्ताचा शेवटच्या थेंबापर्यंत देशासाथी लढेन' असे वाक्य टेप करुन प्रचारात वापरले गेले. काँग्रसने श्रीमती गांधीं यांच्या मृत्यूचे राजकीय भांडवल केले. काँग्रेस पक्षाने भावनिक व सहानभूती मिळवत १९८४ ची निवडणूक जिंकली. पक्षाने५४२ जागा लढविल्या ४११ जागा जिंकल्या. तेंव्हा घटना व लोकशाही संपुष्टात आली होती काय ? आज भाजपा चारशेच्या पार घोषणा करत आहे.तेंव्हा काँग्रेसही विरोधी पक्ष घटना व लोकशाही धोक्यात





येईल,अशी अफवा पसरवित आहे.२०२४ च्या भाजपाच्या निवडणूक संकल्पात घटना बदण्याचा उल्लेखही नाही. तसेच संकल्प पत्रात हिंदू समाजाला लालूच दाखविली गेली नाही. जनता पार्टीचे१९८० मध्ये विभाजन झाले. जनसंघाऐवजी भाजपा नव्या राजकीय पक्षाची स्थापना झाली.


भाजपाने २५२ जागा लढविल्या पण पक्षाचे दोन उमेदवार विजयी झाले.यात आंध्रप्रदेशच्या हनमकोंडा मतदार संघातून काँग्रेसचे पी. व्ही नरसिंहराव यांचा पराभव भाजपाचे सी.जंगारेड्डी पराभव केला,गुजरातच्या मेहसना मतदार संघातून भाजपा एम.के. पटेल हे निवडून आले.देशात काँग्रेसबद्दल सहानुभूतीची लाट असताना तेलगू देशम प्रादेशिक पक्षाने ३० जागेवर यश मिळविले. हे विशेष! १९८० भाजपाच्या यशाचा आलेख वाढत चालला आहे तर काँग्रेसचा घसरत चालला आहे. राजीव गांधींच्या सरकारमध्ये व्ही.पी. सिंग अर्थमंत्री होते! भारतात संपती अधिनियम १९५३ नुसार वारसा संपत्ती कराचा कायदा लागू होता.यात वीस लाखाच्यावर ८५ टक्के कर देण्याची या कायद्यात तरतूद होती जर संपत्तीचा मालकाचे निधन झाले,की संपत्ती सरकारने जमा करण्याचा तो कायदा होता. तो राजीव गांधी यांनी १ एप्रिल १९८४ रोजी संपत्ती वारसा कर कायदा रद्द के.हा कायदा रद्द झाल्यानंतर एक महिन्यात २१ मे १९८४ रोजी श्रीमती इंदिरा गांधी २१.५० लाखाची संपत्ती ही राहुल प्रियंका, वरुण गांधी यांचे नावे केली. श्रीमती इंदिरा गांधी संपत्ती देण्यासाठी या कायदा रद्द केला, हे उघड आहे. परवा तर काँग्रेसचे नेते राहुल गांधी देशातील नागरिकांच्या संपत्तीचे सर्वेक्षण करुन संपत्तीचे वाटप करण्याचे विधान केले. तसेच देशातील संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा केले होते. यात इंदिरा गांधी व राजीव गांधी व मनमोहनसिंग सरकारचे सल्लागार राहिलेले सैम पित्रोदा शिकागो येथे वास्तव्यास आहेत!राहुल गांधींचे राजकीय गुरुच्या विधानाने भर पडली. पित्रोदा म्हणाले.' अमेरिकेप्रमाणे भारतात वारसा कर लागू केला पाहिजे!त्यामुळे काँग्रेस पक्षाचा सामान्यांचा संपत्तीवर डोळा असून तो विशिष्ट समाजाला वाटप करण्याचा उद्देशअसल्याचे आरोप भाजपा केला.यात काँग्रेस नेते गोंधळात सापडले! त्यांनी पित्रोदा यांचे विधानाशी काँग्रेस पक्षाचा सबंध नाही,असे म्हणत सारवासारवी केली राहुलगांधी परदेशात जातात,पित्रोदा यांना भेटतात! त्यांचा राजकीय सल्ला घेतात! तेथे भारतीय लोकशाहीची बदनामी करत असतात! पण गुरुने शिष्याला चांगले अडचणीत आणले. पंतप्रधान राजीव गांधींनि १९८६ मध्ये भारत व स्वीडन राष्ट्रात बोफार्स खरेदीबाबत चा१४३७ कोटीचा करार झाला.यात स्वीडन एका कंपनीने भारतातील मोठ्या राजकीय नेत्यांना ६० कोटी लाच दिल्याचा आरोप केला.तसेच पत्रकार बो.एंडर्सनच्या बोफार्स घोटाळ्याने वृत्ताने खळबळ उडाली. लोकसभेत बोफार्स लाचेचे विरोधकांनी लावून उचलले !त्यामुळे राजीव गांधी सरकार अडचणीत आले.या प्रकरणाच्या चौकशीसाठी संसदीय समिती नियुक्ती गेली, ती समिती स्वीडनला जाउन आली. सी, बी.आय.ने चौकशी केली.या बोफोर्स घोटाळ्यात इटलीचा व्यापारी आत्तोवियो क्यात्रोकी यास अटक केली पण त्याला जामीनवर सोडले. त्याने इटलीला पलायन केले! यात गांधी परिवाराचा हात होता.सी. बी. आय. चौकशीची भूमिका त्याला वाचविणारी होती. यात विरोधी पक्षाची बोफोर्सच्या लाचेच्या संशयाची सुई ही गांधी परिवाराकडे होती.त्यामुळे बोफार्स घोटाळ्यात गांधी परिवार अडचणी आला. या घोटाळ्यातबाबत चौकशी समिती नियुक्त गेल्या व त्याचा अहवाल थंडबस्त्यात टाकला गेला. श्रीलंकेत तामीळ समुदायावर होणारे अत्याचार व स्वतंत्र तामीळ राष्ट्राच्या मागणीसाठी लिबरेशन टायर्गस ऑफ तामीळ ईलम( लिट्टे) सशस्त्र दलाची स्थापना वेल्लूपिल्लाई प्रभाकरन यांनी केली होती. श्रीलंका व एलटीटीई यांचेत संघर्ष चालू होता, यात हजारोंचा बळी गेला. तेंव्हा भारताने श्रीलंकेच्या मदतीसाठी सैन्य पाठविले! भारतीय लष्कराने प्रभाकरन याला ठार मारले! निवडणुक प्रचार निमित्ताने राजीव गांधी हे २१ मे१९९१ मध्ये तामीळनाडू मधील पेरंबदूर येथे गेले असताना व धनू नावाच्या तरुणीने स्वतःच्या पोटाला बॉम्ब लावले,व तीने स्वागताच्या निमित्ताने गांधीजवळ गेली व स्वतः ला उडवून घेतले.या आत्मघातकी हल्यात राजीव गांधी यांचेसह १४ जणांच्या शरिराचे तुकडे झाले. या घटनेत आरोपींना अटक झाली! काही जणांना शिक्षा झाली, भारतात दुसऱ्या पंतप्रधानांची हत्या झाली. गांधी यांची धोरणामुळे हत्या झाली. त्यांनाही शहीद म्हटले जाते. परवा प्रियंका वाड्रा यांनी म्हणाल्या! माझ्या आईने देशासाठी मंगळसूत्र दिले. खरं तर! गांधी परिवारात मंगळसूत्र घालण्याठी सस्कृंती आहे की नाही? भारताला स्वातंत्र्य गांधीपरिवारामुळे मिळाले, अशी बढाई मारुन क्रांतिकारांचा अवमान केला जातोय? या गांधी परिवाराने सत्तेत असताने किती काळे कारनामे केले? हे माहिती आहे.स्वातंत्र्यासाठी शेकडो महिलांनी देशासाठी मंगळसूत्र दिले! घरा दाराची रांगोळी केली. तरुण फासावर गेले! याचे नकली गांधी परिवाराने याचे भान ठेवावे! त्यानंतर १९८९ मध्ये विविध पक्षांनी जनता आघाडी स्थापन करून निवडणुकीत उतरला! मग काय घडले? याची माहिती पुढील लेखात!





आधुनिक केसरी

निसर्ग, प्राणी आणि माणूस यांच्यात आरोग्याच्या दृष्टीनं पाहिलं तर बरीचशी तत्व सारखीच आहेत. जे त्यांच्यासाठी आरोग्यदायी आहे, ते माणसाला देखील लागू होते. आमच्या या संजयजवळ ती व्यि दृष्टी नक्कीच होती. बऱ्याच आजारांवर घरगुती उपचार तो सहज सांगायचा. त्याने सांगितलेल्या उपचारांचा लोकांना फायदाही होताना दिसायचा. माझा व्यस्त दिनक्रम पाहून ' दादा, तुम्ही निवांत व्हा. ' असा प्रेमळ सल्ला तो मला वारंवार द्यायचा. पण मला कधी त्याच्यासारखे निवांत होणे जमलेच नाही. निवांत होणं म्हणजे आपल्या सगळ्या व्यापातून बाजूला होऊन स्वतःसाठी वेळ देणं असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता. प्राणायामातले बरेच बारकावे त्याने मला सांगितले. ध्यान करणं म्हणजे काय हे त्याच्याकडून छान ऐकायला मिळायचं. तो एका जागी ध्यान लावून बसला, तर तासनतास हालचाल न करता बसू शकत असे. विचारशून्य होणं, निर्विचार होणं म्हणजे ध्यान असं त्याचं सांगणं. तुम्हाला असं निर्विचार होणं किंवा विचारशून्य होण्याची अवस्था जमली की तुम्हाला देवपूजा, स्तोत्र, मंत्र आदी काही करण्याची जरुरी नाही असे त्याचे सांगणे. सविकल्प समाधी, निर्विकल्प समाधी, वाणीचे चार प्रकार - परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी यासारखे शब्द त्याच्या बोलण्यात सहज येत. तो फारसा शिकलेला नव्हता आणि खरंतर त्याने आध्यात्माची कुठलीही पुस्तके वाचली नव्हती. पण त्यातील सार मात्र त्याला स्वानुभवाने आणि स्वतः केलेल्या साधनेने त्याला कळले होते. '



## हितगुज
पुष्प ५१वे




**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## सनातन धर्माची लक्षणे

चातुर्मासत सतत कानी चांगले पडल्याने दुधाच्या सायीप्रमाणे मनावर संयम व धैर्याचा घट्ट थर जमा व्हायचा, वैर व सूडभावना बोथट व्हायची, जवळ बसलेल्या मुलाबाळांवर, लेकीसुनांवर नकळत चांगले संस्कार व्हायचे, देवाघरी दुष्ट कर्माचा जाब द्यावा लागतो, अशी पापभीरु वृत्ती बळकट व्हायची, प्रवचनकाराची झोळी धान्याने, दुधा-तुपाने भरायची, असा चातुर्मास सामाजिक मनाची, व्यवहारांची सुव्यवस्था करण्यात महत्त्वाचा हातभार लावीत असे. पुढे आधुनिकतेच्या वावटळीत, औद्योगिक संरचनेत गावे उद्ध्वस्त झाली. चातुर्मास दुर्लक्षित झाला. लोकांकडे आता शांततेने काही ऐकण्याची, घेण्याची मानसिकता व वेळच उरला नाही. सारे आयुष्य भाकरीच्या तरतूदीतच संपते आहे. भारतीय सनातन धर्म अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. वासुदेव कृष्णाने प्रतिपादित केलेला, आदि पुरुष नारायणाकडून निर्माण झालेला सनातन धर्म अखिल जगतासाठी आहे. श्रीमद् भागवताच्या 7 व्या स्कंधात 11 व्या अध्यायात नारदाने युधिष्ठिराला या धर्माचा उपदेश दिला आहे. त्यापूर्वी भगवान नारायणाने बदरिकाश्रमात नारदाला सनातन धर्माची तीस लक्षणे सांगितली होती. सत्य, दया, तप, पावित्र्य, सहनशक्ती, सारासार विवेक, शम, दम, अहिंसा, त्याग, ब्रह्मचर्य, स्वाध्याय, साधेपणा, संतोष, समदर्शिता, सेवाभाव, दैहिक सुखांचा त्याग, मौन, आत्मचिंतन, ईश्वराला चराचरात अनुभवणे, विपरित कर्मफलांचे चिंतन, सर्व प्राणीमात्रांमध्ये ईश्वराचा निवास असल्याची अनुभूती, सर्व प्राण्यांना त्यांचा योग्य वाटा/भाग देणे, श्रवण, कीर्तन, स्मरण, प्रभु-सेवा, नम्रता, दास्यभाव, सख्यभाव, आत्मसमर्पण भाव अशी तीस लक्षणे भागवतात सांगितली आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**




## आनंदी पहाट

# समजूतदारपणा व दयाळूपणा बोलण्यातून दिसतो

आधुनिक केसरी

नकारात्मक विचार आपले वजन कमी करतात आणि आपल्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक जीवनावर परिणाम करू शकतात. नकारात्मक मानसिकता सकारात्मक दृष्टिकोनाकडे वळवण्यासाठी सराव करत राहणे आवश्यक असते. अपयशी होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अनुभवातून काहीही शिकणे होय. अपयशांना शिकण्याच्या अनुभवांमध्ये बदलण्यावर आपली उर्जा केंद्रित करावी. जेव्हा आपण आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करतो तेव्हा अनुभवातून शिकलेल्या, घेतलेल्या धड्याचा आपल्याला उपयोग होतो. स्वतःबद्दल खूप कठोर असणे खरोखर आपल्या कार्यक्षमतेत अडथळा आणू शकते. स्वतःशी अधिक दयाळूपणे वागणे हा तुमच्या मनाला यश मिळवून देण्याचा सर्वोत्तम मार्ग असू शकतो. सुधारित मनोवैज्ञानिक कल्याण आणि शरीराच्या चांगल्या प्रतिमेपासून वाढीव आत्म-मूल्य तसेच वाढीव प्रेरणा या सर्व गोष्टींशी आत्म-करुणा जोडलेली असते. म्हणून, स्वतःशी समजूतदार आणि दयाळूपणे बोलण्याची सवय लावावी. आमचा अंतर्गत संवाद अनेकदा नीट आणि पूर्णपणे होत नाही. आपण ज्याची काळजी घेतो, त्याच्याशी कसे बोलायचे, हेच समजून घेत नाहीत. स्वतःशी बोलणे इतरांशी बोलण्यापेक्षा खूप वेगळे असते. हे विशेषतः परिपूर्णतावादी लोकांसाठी खरे आहे. स्वतःची टीका न करण्याचे आपण नेहमीच लक्षात ठेवावे. आपण अयशस्वी झाल्याबद्दल किंवा चुकल्याबद्दल स्वतःला दोष देण्याऐवजी, आपण विश्वासू मित्राला द्याल तोच सल्ला स्वतःला देण्याचा प्रयत्न करावा. शारीरिक स्तरावर, नवीन गोष्टी शिकणे आपली मेंदूसाठी निरोगी ठरत असते. नवीन कौशल्ये शिकल्याने आपल्या स्मृती स्नायूंना वाकवण्यास आणि एकूण आठवण सुधारण्यास मदत होते. हे मेंदूतील न्यूरॉन्सला उत्तेजित करते, अधिक मज्जासंस्थेचे मार्ग तयार करते आणि विद्युत आवेग त्यांच्या ओलांडून वेगाने प्रवास करू देते. या दोन गोष्टी एकत्र केल्यानेआपल्याला अनेक गोष्टी लवकर शिकण्यास आणि नवीन परिस्थितींशी आत्मविश्वासाने जुळवून घेण्यास मदत होते.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## मोक्षानंदी भिक्षा | प्राप्त झाली ||


मंद तेजाळला | नंदादीप जेथे ||
ज्ञान विद्या तेथे | सुखावले ||१||
श्रध्दा भक्ती भाव | नांदावा अखंड ||
जळावा पाखंड | क्षणोक्षणी ||२||
चालता बोलता | विठुचे स्मरण ||
संतांचे चरण | दिसे आम्हा ||३||
गाथा ज्ञानेश्वरी | घराचे भूषण ||
सात्त्विक तोरण | शोभे दारी ||४||
तुळशीची काया | फुलली अंगणी ||
दर्वळ चंदनी | अभंगात ||५||
तेजाळली दिप्ती | उजळली दिक्षा ||
मोक्षानंदी भिक्षा | प्राप्त झाली ||६||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अकथ अनूप अपूर्व है, पर असीम आनन्द ।
त्रिजग भोग अणु सम नहीं, मह सागर आनन्द ।।६६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/६६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तो अमृत परमानंद अवाच्य, अनुपम, अपूर्व आणि असीम आहे. तिन्ही लोकांतील भोग त्याच्या अणू मात्र चेतन सुखाच्या बरोबर नाहीत. अव्यक्त परमानंद महान सुखाची इतकी महिमा आहे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी


सर्वत्र संचार करणे हा तिचा व्यवहार आहे. पाच भूते तीन गुण आणि सगळे दृष्य पदार्थ व्यक्तिच्या हालचालीने होत असतात. ही दृष्टी संपादन करून साधकाने आपल्या एकट्याचा विचार न करता संपूर्ण जगाचा विचार करावा. यासाठी समर्थांचे विचार समजून घेतले पाहिजेत. यासाठी आपल्याला जगण्यासाठी प्रेरणा देणारे सद्विचार सतत मनाला काय चांगले आहे अन् काय वाईट आहे याचा विचार करायला लावणारे ग्रंथ वाचावेत.   परब्रम्हामध्ये मूळमाया निर्माण झाली हे अवाढव्य विश्व निर्माण करण्याची कला "मूळमायेचीच" तिच्या लिला अगाध आहेत. जेव्हा या लीलांचा महिमा बघतो तेव्हा जाणवते की ती निव्वळ पांच भूते आणि तीन गुण यांची मूस आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु यांना विकार आहेत यांच्यामध्ये बदल घडू शकतो.  पण आकाश मात्र निर्विकार आहे. आकाशाला उपाधि आहे, मर्यादा आहे म्हणून ते भूतामध्ये गणले जाते. "जीव कशास म्हणतात" जाणीव जेव्हा पिंडाला व्यापते तेव्हा तिला जीव म्हणतात.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# कळकळीचे नामस्मरण

आधुनिक केसरी

आम्ही सुस्थितीत असलो म्हणजे आमचे नामस्मरण अधिक होते. त्यात काही बिघाड झाला की तिकडेच सारे लक्ष वेधते. याला कारण म्हणजे आमचे स्मरण हे वरवरचे असते. श्रद्धेने नामस्मरण करणे आपल्याला कठीण जाते. परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही असा दृढ निश्चय अगर श्रद्धा असणे आवश्यक आहे. म्हणजे मग प्रकृतीत काही बिघाड झाला तरी आपले स्मरण टिकून राहील. द्रौपदीला आता आपला कोणी त्राता नाही असे वाटून जेव्हा तिने श्रीकृष्णाचा धावा केला, तेव्हा भगवान् लगेच धावून आले. असे खऱ्या कळकळीचे स्मरण आपले असायला पाहिजे. जसे लहान मूल काहीही झाले तरी आपल्या आईलाच हाक मारते, दुसरे तिसरे कोणी जाणत नाही, तसे आपले परमेश्वर-स्मरणाच्या बाबतीत झाले पाहिजे. आपली भिस्त खरोखर कोणावर आहे हे संकटकाळीच उत्तम कळते. नामस्मरणाच्या पायऱ्या अशा सांगता येतील - पहिली, सुस्थितीतले वरवरचे स्मरण; दुसरी, परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही



ही जाणीव होऊन, संकटसमयी त्याचे स्मरण; आणि तिसरी, हीच जाणीव दृढ होऊन पुढे अखंड होणारे नामस्मरण. यांपैकी वरवर स्मरण करणारा 'आम्हांला संकटेच नकोत' असे म्हणतो, तर साधुसंत 'आम्हांला संकटे येऊ देत' असे भगवंताजवळ मागतात, कारण त्यावेळेसच त्याचे खरे स्मरण होते. आपण स्वतः आहोत याची आपल्याला आज जितकी खात्री आहे, तितकी खात्री भगवंत आहे अशी झाली पाहिजे. परमात्मा सर्व ठिकाणी आहे की कल्पना केव्हा तरी आपल्याला होते खरी, पण ती कायम न राहिल्यामुळे दृढपणे आपल्या आचरणात येत नाही; आपली वृत्ती तशी झाली की ती आपल्या आचरणात येईल. भगवंत हा कर्ता आहे अशी आपली दृढ भावना झाली की आपण प्रत्येक गोष्ट त्याला सांगत बसणार नाही, 'भगवंताला माझे सर्व कळते' असे जर खरेच वाटले तर त्याला आवडेल असेच आपण वागू. पहाटे उठावे आणि भगवंताची मूर्ती डोळ्यांसमोर आणून प्रार्थना करावी, आणि "तुझे विस्मरण जिथे होते, तिथे मला जागृत करीत जावे; नाही मला आता तुझ्याशिवाय आसरा," असे म्हणून त्याला मनःपूर्वक नमस्कार करावा. मनुष्य कसाही असला तरी भगवंताच्या स्मरणात त्याला समाधान खात्रीने मिळेल. जो भगवंताचा झाला त्याला जगण्याचा कंटाळा कधीच येणार नाही. विषयाचा आनंद हा दारूसारखा आहे; ती धुंदी उतरल्यावर मनुष्य जास्त दुःखी बनतो. 'मी भगवंताचा आहे' या भावनेने जो राहील त्यालाच खरा आनंद भोगता येईल.

**३६. भोग व दुःख यांत वेळ न घालविता भगवंताकडे लक्ष दिले पाहिजे.**

## निरूपण

आधुनिक केसरी

**तश्कर अथवा दावेदार । आवचितां करिती संव्हार ।**
**लुटिती घरें नेती खिल्लार । या नांव आदिभूतिक ॥४७॥**
**नाना धान्यें केळी कापिती । पानमळां मीठ घालिती ।**
**ऐसे नाना आघात करिती । या नांव आदिभूतिक ॥४८॥**
**मैंद उचले खाणोरी । सुवर्णपंथी भुरेकरी ।**
**ठकु सिंतरु वरपेकरी । वरपा घालिती ॥४९॥**

रविवार, २८ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २४२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 28 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-242 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05


# पैठण येथील हरिकृपा सेवा समिती संचलित शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज प्रसादालयास दै. आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**



**पैठण :** दक्षिण काशी असणाऱ्या पैठण या तीर्थक्षेत्राचा महिमा आपण सर्व जाणताच. दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या पैठण नगरीमध्ये इतर राज्यांतूनही रोज हजारोंच्या संख्येने भाविक नाथ समाधीच्या दर्शनासाठी येतात. पण त्यांना भोजनप्रसाद देण्यासाठी एखाद्या अन्नछत्राची सोय इथे नाही ही खंत मनाला सारखी लागली होती. या तळमळीतून जगभर आध्यात्मिक गुरू म्हणून परिचित असलेले स्वामी हरि चैतन्य महाप्रभू यांच्या संकल्पनेतून नाथांच्या दरबारात भाविकांना भोजनप्रसाद देण्याच्या हेतूने आणि अन्नदानाचे महत्त्व लक्षात घेऊन सन २०१७ मध्ये चैतन्य महाप्रभूंच्या आशीर्वादाने श्रीहरी कृपा सेवा समितीच्या वतीने शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज प्रसादालय भाविकांसाठी सुरू करण्यात आले. या सेवाभावी कार्याची दखल घेत दैनिक आधुनिक केसरीने हरिकृपा सेवा समिती संचलित शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज प्रसादालयास 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर केला आहे. सेवाभावी वृत्तीने सुरू झालेल्या या भोजनरूपी यज्ञाला पैठणचे आमदार तथा संत एकनाथ महाराज संस्थानचे अध्यक्ष व पालकमंत्री संदिपान भुमरे यांनीही अनुमती देत अन्नदात्यांना आवाहन केले व रोज अन्नदान करण्यासाठी हजारो हात पुढे आल्याने सात वर्षांपासून अखंड प्रसादरूपी भोजन अन्नदात्यांमुळे सुरू असून भाविकांचा यास प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. म्हणून हरिकृपा सेवा समिती संत एकनाथ महाराज प्रसादालयाचे कार्य वारकरी, भाविकांसाठी निश्चितच कौतुकास्पद आणि गौरवास्पद असल्याने त्यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली जात आहे.




या प्रसादलयाचा अन्नदानरूपी अखंड यज्ञ सुरूच असल्याने राज्यस्तरीय 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कारासाठी नामांकन झाले आहे. दै. आधुनिक केसरीच्या वतीने 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर केला असता त्यासाठी राज्यभरातून नागरिकांकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. पैठण येथील हरिकृपा सेवा समितीच्या कार्याची माहिती मिळाली. दै. आधुनिक केसरीच्या निवड समितीने अध्यक्ष सतीश उदावंत, शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज प्रसादालय पैठणला भेट दिली आणि पाहणी केली असता येथील सेवेकरी यांनी संपूर्ण माहिती दिली. त्यांचे कार्य वारकरी, भाविक व इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी असून शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज प्रसादालयास दै. आधुनिक केसरीने समाजसेवा कार्याचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर केला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. हरिकृपा सेवा समिती परिवाराचे या पुरस्काराबाबत समाजातील विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.










# ही लढाई आपल्याला जिल्ह्याच्या विकासासाठी जिंकायची

## भाशिप्र संस्थेच्या मतदार जागृती मेळाव्यात पंकजाताई मुंडेंना विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि मुंडे परिवाराचे वर्षानुवर्षांचे ऋणानुबंध आहेत. तुम्ही सर्व सुशिक्षित आणि प्रज्ञावंत आहात. प्रज्ञावंत मतदार म्हणून तुम्ही नक्कीच जिल्ह्याच्या विकासाला योगदान देण्यासाठी तुमचे अमूल्य मत मला द्याल ही खात्री आहे, मात्र तुमच्यासह आपल्यासाठी नकारात्मक असलेली वीस मते तरी प्रत्येकाने आपल्या बाजूने मिळवण्यासाठी भाजपची विचारधारा अन् देश विकासाचे धोरण मतदारांपर्यंत पोहचवावे असे आवाहन भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केलं. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या आशीर्वाद मंगल कार्यालयात झालेल्या मतदार जागृती मेळाव्यात पंकजाताई मुंडे बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ.हेमंत वैद्य, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, प्रवक्ते राम कुलकर्णी, उमेश जगताप,चंद्रकांत मुळे आदींसह केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, संघ विचारसरणीत मोठे झालेल्या गोपीनाथराव मुंडे यांची मी कन्या आहे. त्यामुळे शिस्त आणि माझे कर्तव्य मला माहित आहे. या निवडणूकीत जातीपातीच्या भिंती तोडण्यासाठी प्रज्ञावंतांनी योगदान द्यावे. भाशिप्र संस्थेच्या सर्व प्रज्ञावंतांनी आपल्याविरुद्ध असलेली नकारात्मक मते सकारात्मक करण्यासाठी काम करावे. बीड जिल्ह्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मी मते मागत आहे. त्यात तुम्ही तुमचे सत्पात्री दान टाकावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. आपण कोणीही जातीवादाला थारा देत नाहीत पण निवडणूक आली की, मुद्दाम विरोधकांकडून जात पुढे आणली जाते. यातून जोडलेली माणसं बाजूला करण्याच काम केलं जातं. मात्र ही लढाई आपल्याला बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जिंकायची आहे. पुन्हा एकदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना विराजमान करण्यासाठी आपण सर्वांनी या निवडणूकीत भाजप-महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे. राजकारणात मुंडे परिवाराने कधीही जात-धर्माचा भेदभाव केला नाही याकडेही त्यांनी लक्ष वेधले.



**मुंडे साहेबांचे संस्थेसाठी भरीव योगदान ; पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देऊ :** प्रारंभी प्रास्ताविक भाशिप्रचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे यांनी केले .दिवंगत गोपीनाथ मुंडे साहेबांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेसाठी भरीव काम केले आहे हे आम्ही कधी विसरणार नाही .भा .शि .प्र .संस्थेच्या प्रत्येक संस्कार केंद्रातून पंकजाताई मुंडे यांना अधिकाधिक मतदान मिळवण्यासाठी आम्ही सर्व जण सामूहिक योगदान देऊ असं मुळे म्हणाले . याप्रसंगी राम कुलकर्णी म्हणाले, माझी माणसं, माझा जिल्हा या भावनेने पंकजाताई मुंडे काम करतात . भा .शि .प्र ही संस्था आणि मुंडे परिवाराचा खूप वर्षांचा ऋणानुबंध आहे . शिक्षण क्षेत्रात भरीव काम आपल्या संस्थेला मुंडे साहेबांच्या आणि नंतर पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना करता आले आहे त्यामुळे या निवडणुकीत पंकजाताई यांना प्रचंड मतांनी आपल्याला निवडून द्यायचे आहे असा संकल्प आम्ही सर्वांनी केला आहे पंकजाताई यांचा विजय निश्र्चित आहे फक्त त्या किती लाख मतांनी निवडून येतील याची आम्हाला प्रतीक्षा आहे असे ते म्हणाले . याप्रसंगी हेमंत वैद्य म्हणाले, भा . शि . प्र . संस्थेच्या सर्व कर्मचार्यांनी या निवडणुकीत मतदार जागृतीचे काम करावे . देशाला पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच सरकार सत्तेत आणण्यासाठी बीड लोकसभा मतदार संघात पंकजाताई मुंडे यांना निवडून देण्यासाठी सर्व प्रज्ञावंतांनी योगदान देवून मतदान जागृती करावी . भारतीय शिक्षण प्रसारक संस्था कायम पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, ताईंचा विजय निश्र्चित आहे असा विश्वास हेमंत वैद्य यांनी व्यक्त केला . सूत्रसंचालन उमेश जगताप यांनी केले .







# लोकशाही, साम्यवाद आणि बदलते राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**बदलत्या राजकारणाचा अभ्यास करताना या विषयाच्या अनेक पैलूंचा विचार करणे आवश्यक आहे. राजकारणातील बदल हे फक्त नेतृत्वाच्या बदलापुरते मर्यादित नाहीत तर ते समाजाच्या बदलत्या गरजांशी देखील संबंधित आहेत. कारण दिवसागणिक नवीन आव्हानांना, प्रश्नांना, समस्यांना माणसाला तोंड द्यावे लागत आहे. ही काळाची गरज समजून घेऊन त्यात निश्चितच काही बदल होणे अपेक्षित आहे.**



## क्षितिजापल्याड

सर्वप्रथम, आपल्याला जाणून घ्यावे लागेल की आधुनिक राजकारणात सोशल मीडियाचा उदय आणि तंत्रज्ञानाचा विस्तार यांनी मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले आहेत. सोशल मीडियामुळे राजकारणातील पारदर्शकता वाढली आहे आणि जनतेशी संवाद साधण्याची पद्धत देखील बदलली आहे. निवडणुकांदरम्यान उमेदवारांची भूमिका आणि विचार यांची माहिती जनतेपर्यंत अधिक सहजपणे पोहोचू शकते.

दुसरा महत्वाचा बदल म्हणजे राजकारणातील सहभागीत्वाच्या स्वरूपात होणारा बदल. आधुनिक काळात युवकांचा राजकारणातील सहभाग वाढत आहे. युवा पिढीच्या विचारांमध्ये आणि त्यांच्या क्रियाशीलतेमध्ये येणारे बदल हे राजकारणाच्या दिशेला प्रभावित करतात. युवा पिढीची नवीन विचारधारा, जसे की पर्यावरणाचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि तंत्रज्ञानातील समावेशकता या विषयांवर अधिक भर दिला जात आहे.

तिसरे, राजकीय पक्षांच्या धोरणांमध्ये होणाऱ्या बदलांचा विचार केला पाहिजे. वैश्विकीकरण आणि आर्थिक धोरणांमध्ये बदल यांमुळे पक्षांना आपल्या धोरणांमध्ये बदल करणे भाग पडले आहे. उदाहरणार्थ, भारतीय राजकारणात उदारमतवादी आर्थिक धोरणांना स्थान देण्यात आले आहे, जे औद्योगिक विकास आणि आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी महत्वाचे ठरले आहे. चौथे, आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय सहकार्य आणि संघर्ष यांच्या बदलांचा विचार करावा लागेल. विविध देशांमध्ये होणारे राजकीय आणि आर्थिक संघर्ष, तसेच सहकार्यामुळे देशांतर्गत राजकारणातही मोठे बदल घडत आहेत. या संघर्षांमधून उद्‌भवणाऱ्या नवनवीन धोरणांचा प्रभाव देखील राष्ट्रीय पातळीवरील निर्णयांवर व नीतींवर पडत असतो. याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे जलवायु परिवर्तनासंदर्भातील परिषदेत विविध देशांच्या नेत्यांमध्ये झालेले करार आणि त्याचे राष्ट्रीय धोरणांवर होणारे परिणाम. पाचवे, लोकशाहीच्या स्वरूपात घडत असलेल्या बदलांचा विचार करणे आवश्यक आहे. आजच्या काळात लोकशाहीची व्याख्या आणि तिच्या कार्यप्रणालीमध्ये अनेक बदल झाले आहेत. या बदलांमध्ये निवडणूक प्रणाली, मतदानाची पद्धत, निवडणूकीतील पारदर्शकता आदींचा समावेश आहे. सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाच्या वापराने मतदान प्रक्रियेला अधिक सुलभ बनविण्यात मदत केली आहे, तसेच त्याच वेळी, फेक न्यूज आणि माहितीच्या चुकीच्या वापरामुळे नवीन आव्हानेही निर्माण झाली आहेत. अखेरीस, राजकीय संस्कृतीतील बदलांच्या दिशेने नजर टाकणे गरजेचे आहे. राजकीय नेते आणि पक्ष यांच्यामध्ये सामाजिक मीडिया व तंत्रज्ञानाच्या वापराने नवनवीन माध्यमांचा वापर करून जनतेशी संवाद साधण्याची पद्धत बदलली आहे.

हे बदल नुसते तंत्रज्ञानात्मकच नाहीत तर सांस्कृतिकही आहेत, ज्यामुळे राजकारणाच्या प्रणालीत आणि तिच्या संवादात मोठा फरक पडला आहे. या सर्व बदलांमधून एक गोष्ट स्पष्ट आहे की, बदलत्या राजकारणाचा प्रवास फक्त एका देशाच्या सीमा भिंतीतच मर्यादित नाही, तर तो जागतिक स्तरावर सुद्धा अनेक सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक घटकांचा विचार करतो. बदलत्या राजकारणामध्ये सामावून घेण्यासाठी नागरिकांनी सतत जागरूक राहून, सक्रिय सहभाग घेतला पाहिजे आणि राजकीय प्रक्रियांमध्ये सहभागी होऊन आपल्या हक्कांचा आणि कर्तव्यांचा वापर करणे आवश्यक आहे. साम्यवादी विचारांचे लोकशाहीतील महत्व समजून घेण्यासाठी आपल्याला साम्यवादी विचारधारेच्या मूळ संकल्पना आणि त्यांचा लोकशाहीवरील प्रभाव यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. साम्यवाद ही एक राजकीय आणि आर्थिक विचारधारा आहे, जी सार्वभौम समानता आणि सामूहिक मालकीच्या सिद्धांतांवर आधारित आहे. कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगेल्स यांच्या लेखनातून या विचारधारेचा जन्म झाला, ज्यांनी समाजातील आर्थिक विषमता आणि वर्ग संघर्षाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. साम्यवादी विचारधारा आर्थिक समानतेला



प्राधान्य देते. याचा अर्थ असा की समाजातील सर्वांना समान संधी मिळाली पाहिजेत आणि उत्पादनातील सर्व संसाधने आणि धनाचे वाटप सर्वांमध्ये समानरित्या केले जावे, हे लोकशाहीत महत्वाचे आहे. कारण त्यामुळे नागरिकांमध्ये समानता वाढते आणि सामाजिक न्याय साधला जातो. साम्यवादी विचारधारा लोकशाहीच्या संकल्पनेला आणखी गहिरे करते कारण ती सर्व सामाजिक आणि आर्थिक स्तरांवर समानता आणि सहभागाची भूमिका अधोरेखित करते. यामुळे लोकशाही समाज रचना अधिक समावेशक आणि प्रतिनिधित्वक्षम होते. याचे कारण म्हणजे साम्यवादी विचारधारा लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला सत्तेत सहभागी करण्याची आणि समाजातील निर्णय प्रक्रियेत व्यक्त होण्याची संधी देते. साम्यवादी विचारधारा नागरिकांना न केवळ राजकीय प्रक्रियांमध्ये, तर आर्थिक आणि सामाजिक प्रक्रियांमध्ये देखील सक्रिय सहभाग घेण्यास प्रोत्साहित करते. हे नागरिकांना अधिक जबाबदार आणि सशक्त करते, ज्यामुळे ते समाजातील विविध पातळ्यांवरील निर्णयांमध्ये आपले मत व्यक्त करू शकतात. साम्यवादी विचारधारा विकासाच्या नवीन मॉडेल्सचा प्रस्ताव देते जे सामाजिक-आर्थिक विषमता कमी करण्याच्या दृष्टीने अधिक कार्यक्षम असू शकतात. यामुळे विकासाच्या पारंपारिक संकल्पनांवर पुनर्विचार करण्याची संधी मिळते आणि समाजातील सर्व स्तरांना फायदा होण्याची शक्यता वाढते.

साम्यवादी विचारधारेमध्ये सामूहिक हिताचा विचार करण्याची प्रवृत्ती आहे, जी वैयक्तिक हितांपेक्षा समुदायाच्या हितांना प्राधान्य देते. हा दृष्टिकोन लोकशाहीमध्ये नागरिकांना अधिक सामूहिक जबाबदारी घेण्यास प्रवृत्त करतो आणि सर्वांच्या समृद्धीसाठी काम करण्याची ओढ निर्माण करतो. अशा प्रकारे, लोकशाहीमध्ये साम्यवादी विचारांचा समावेश हा केवळ एक राजकीय अथवा आर्थिक विचार नाही तर तो एक सामाजिक संवादाचा भाग आहे. हा संवाद नागरिकांना सशक्त करण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचा ठरू शकतो. साम्यवादी विचारांना योग्य ढंगाने राबवण्यात आले, तर त्याचा उपयोग लोकशाहीच्या मूल्यांचे संवर्धन आणि न्यायसंगत समाज निर्मितीसाठी होऊ शकतो.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# माणसे शोभून दिसतात कशाने ?



बबन गुळवे
मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**पुर्वीच्या काळात माणसे दररोज दोनदा अंघोळ करायचे.सकाळी पाण्याने आणि दिवसभर कष्टाच्या घामाने.म्हणून ही माणसे शोभून दिसायचे कष्टाने व घामाने.तेव्हा माणसे मायाळू,कष्टाळू आणि प्रामाणिक होते,दिलेला शब्द पाळणारे होते.म्हणून त्यांच्या शब्दाला मान होता, त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान केला जायचा.त्याकाळात आजच्या एवढी सौंदर्य प्रसाधने उपलब्ध नव्हती.तरीही फक्त कष्टाच्या जोरावर व वर्तनामुळे माणसे ठळकपणे उठावून दिसत होते. केवळ पाण्याने अंघोळ करणे आता बंद झाले आणि कष्ट करण्याची मानसिकता पण कमी झाली.त्यामुळे माणसांचे शोभून दिसणे कमी झाले आहे.हल्ली माणसे सौंदर्य प्रसाधनांचा भरपूर प्रमाणात वापर करत असले तरीही अगोदरच्या सारखे माणसे सुंदर व शोभून दिसत नाहीत.**

चांगले वर्तन, कष्ट करण्याची जिद्द, प्रामाणिकता, सुसंस्कृत भाषा, चारित्र्य, सत्यवादी आणि सर्वांसोबत मिळून मिसळून राहणे हे माणसांचे गुण वैशिष्ट्ये आहेत ज्यामुळे माणसे शोभून दिसतात. आजचे जग अशा गुणवान, कर्तृत्ववान, निर्व्यसनी आणि संस्कारी लोकांमुळे टिकून आहे. कितीही संकटे आली तरी आपला प्रामाणिकपणा न सोडणारे या जगात खूप लोक आहेत. मी शिक्षक असल्याने अनेक व्यक्तींच्या संपर्कात आहे. बालवयापासून ते आजच्या प्रौढ वयापर्यंत मी अनेक व्यक्तींच्या सोबत काम केले आहे, सहवास लाभला आहे. सुखाची व दुःखाची चव चाखली आहे. काही श्रीमंत लोक जेव्हा साधेपणात रमतात तेव्हा ते खूप शोभून दिसतात. टाटा समुहाचे रतनजी टाटा,इन्फोसिसचे नारायण मूर्ती आणि सुधा मूर्ती हे श्रीमंत आहेत तरीही साधे राहणीमान,उच्च विचार सरणी आणि गोरगरीबांना आर्थिक मदत करणे हे त्यांचे कार्य नक्कीच प्रशंसनीय आहे. बाबा आमटे व त्यांच्या परिवाराने समाजसेवेचा जो विडा उचलला आहे ते अतिशय अलौकिक असे समाजकार्य आहे. आपले शेतकरी, शेतमजूर सतत शेतात काम करतात. त्यांच्या हाताला घट्टे पडतात. राबलेल्या हातांमुळे व डोईवर झेलल्या अने पावसाळ्यांमुळे ते अनेक व्यक्तींच्या समुहात सुध्दा जगाचा पोशिंदा म्हणून शोभून दिसतात.

आपले सगळे महामानव हे समता व मानवतेचे पुरस्कर्ते होते म्हणून आजही त्यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव केला जातो.माझे काही मित्र आहेत ज्यांना कशाचेही व्यसन नाही.आपल्या क्षेत्रात कर्तृत्ववान म्हणून ते नावारुपाला आले आहेत. शिवाजी वाघमारे, प्रेमनाथ गायकवाड,मारोती रुद्रावाड,माधवराव वाघमारे, कार्तिक घाटीवाले, महेशराव पाटील,राजेंद्र नरवाडे, राजू गोरगिळे, धनंजय उजनकर, शेकाजी गायकवाड हे काही माझे मित्र व माझे भाऊ प्रा.राजेंद्र गुळवे व बालाजी गुळवे,दिपक कांबळे हे निर्व्यसनी व चारित्र्यवान आहेत.हे सगळे इतरांपेक्षा वेगळे आहेत व यांनी समाजात स्वतःचे आदर्श स्थान निर्माण केले आहे. म्हणून ते इतरांसाठी आदर्श ठरतात.

मला ज्यांनी शिक्षणाचे धडे दिले ते माझे काही शिक्षक आज सेवानिवृत्त झाले आहेत.पण समाज कार्यात रमले आहेत. बंकटराव गरड,अप्पाराव लोहारे व गणेशराव गुळवे हे तिघेही वय विसरून समाजकार्यात रमले आहेत.गणेशराव गुळवे यांनी त्यांचे आत्मचरित्र लिहिले आहे व आजही ते तितक्याच तत्परतेने समाजकार्य करताना



दिसतात. सज्जन पाटलांचे भूत या नाटकात त्यांनी प्रमुख भूमिका केली आहे.हे नाटक सह्याद्री वाहिनीवर अनेकदा प्रसारित झाले आहे.म्हणून माझे हे शिक्षक इतरांपेक्षा उजवे ठरवतात व हिऱ्यासारखे शोभून दिसतात.

अहमदपूर शहरात अक्षरा फोटो स्टुडिओ चालवणारे गोविंदराव काडवदे हे निव्वळ व्यावसायिक नाहीत.त्यांनाही समाजकार्य करण्याची आवड आहे. म्हणून त्यांचा गौरव व सन्मान करावा तितका कमी ठरेल.

शेवटी इतकेच विशेष बाब म्हणून सांगावे वाटते की माणूस त्याच्या कर्तृत्ववाने चारचौघांत शोभून दिसतो.माणूस त्याच्या स्वभावाने व चांगल्या व्यक्तिमत्वामुळे सरस ठरतो.लोकांच्या घोळक्यात शोभून दिसतो. मग आपण सगळ्यांनी कृत्रिमता व दिखाऊपणा सोडून दिला पाहिजे व प्रामाणिकपणे कष्ट करत जीवन जगले पाहिजे. तुमची वाहवा होईल,तुमच्या बद्दल कोणी ना कोणी चार चांगले शब्द बोलेल किंवा लिहिल.हेच तुमचे खरे मोठेपण,हेच तुमचे खरे सौंदर्य आणि हेच तुमचे खरे शोभून दिसणे असेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्री रेणुकामाता यात्रेस चैत्र पौर्णिमेपासून सुरुवात

आधुनिक केसरी



**बाजार सावंगी :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बाजार सावंगी येथील श्री रेणुकामाता यात्रेस चैत्र पौर्णिमेपासून सुरुवात झाली असून दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनाचा लाभ घेत आहेत.

दरवर्षी हा यात्रोत्सव चैत्र पौर्णिमेस सुरुवात होतो पंधरा दिवस ही यात्रा चालते बाजार सावंगी येथे रेणुका मातेचे भव्य दिव्य असे मंदिर असून या हेमाडपंती मंदिरात गाभाऱ्यमध्ये सिंहावर स्वार दिव्य अशी रेणुका मातेची मूर्ती आहे. यात्रेनिमित्त मंदिरावर व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. चैत्र पौर्णिमेपासून भाविक या ठिकाणी आपले नवस फेडण्यासह नऊ दिवसांचे उपवास ते देवीला नैवेद्य दाखवून सोडतात. तसेच दिवसभर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते यात्रा सुरुवातीलाच तकदराव, नृत्य गीतांच्या सादरीकरणासह, गळ ओढणे, रेवड्यांची उधळण करत देवीच्या जयघोषाने परिसर दणाणून जातो. नवसाला पावणारी आई रेणुकामाता असे मोठ्या श्रद्धेने भाविक मानतात. मंदिरासमोर कुंपनलिका (बोअर) घेतलेली आहे. ज्याला 24वर्षांपासून अखंड पाणी असून कडक उन्हाळ्यातही संपूर्ण गावास याचा पाणीपुरवठा होतो कधीच पाणी कमी होत नाही आणि ही रेणुकामातेची कृपा असल्याचे बोलले जाते. यात्रा महोत्सवात आजूबाजूचे 30-35 खेड्यांसह जिल्हा व जिल्ह्याच्या बाहेरून देखील भाविक दर्शनासाठी येतात. काही वर्षांपूर्वी या ठिकाणी रेणुकामाता संस्थांनला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळालेला आहे त्यामुळे या देवस्थानचे



महत्त्व आणखीनच वाढले आहे तसेच ग्रामस्थ व ग्रुप ग्रामपंचायत च्या पुढाकाराने या ठिकाणी सतत विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा व ईतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यात्रेमध्ये विविध प्रकारचे दुकाने थाटली आहेत. ज्यात खेळणी, भांडी, हॉटेल्स, प्रसाद, कापड दुकान आदी विविध प्रकारचे दुकाने थाटलेले आहेत. मनोरंजनाचे साधने हे देखील यात्रेत दाखल झालेले आहेत. यात्रा यशस्वीतेसाठी रेणुकामाता संस्थान, ग्रामपंचायत, पोलीस, व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.



संकलन : सचिन गवळी
मो. 8407919897
बाजार सावंगी प्रतिनिधी

रेणुकामाता यात्रेनिमीत्त येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे सहर्ष स्वागत
रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज
बाजारसावंगी, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर
मुख्याध्यापक
प्रा. विश्वंभर नलावडे सर
सचिव
दीपक काळे

रेणुकामाता यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, छत्रपती संभाजीनगर
ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, बाजारसावंगी
बाजारसावंगी, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर
मा. श्री. विजय द्वारकुंडे
अध्यक्ष
ज्ञा.शि.प्र. मंडळ
छत्रपती संभाजीनगर
जिल्हा अध्यक्ष
म.रा.शि. संस्थाचालक
महामंडळ
मा. श्री. भाऊसाहेब काळे
सचिव
ज्ञा.शि.प्र. मंडळ
छत्रपती संभाजीनगर
संचालक
लोकविकास नागरी सह. बँक
छत्रपती संभाजीनगर
मा. श्री. योगेश झिंजुर्के प्राचार्य बाजारसावंगी
मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा राज्य पुरस्कार प्राप्त
महाविद्यालयाची वैशिष्ट्ये
उज्ज्वल निकालाची परंपरा
उच्च विद्याविभूषित प्राध्यापक व शिक्षक
दीर्घ सुट्यांमध्ये ज्यादा तासिका स्पर्धा परीक्षेसाठी उच्चस्तरीय मार्गदर्शन
दरवर्षी पालक मेळावा, युवा महोत्सव व स्नेहसंमेलन
सौजन्य : सर्व प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी वृंद, बाजारसावंगी

रेणुकामाता यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
विकास ट्रेडर्स
बाजार सावंगी, छत्रपती संभाजीनगर
भुसार मालाचे व्यापारी
प्रो.विलास मल्हारी सोनवणे
प्रो.संतोष मल्हारी सोनवणे

रेणुकामाता यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
संग्राम हॉटेल अँड फॅमिली रेस्टॉरंट
बाजार सावंगी, ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर
प्रो. अरुण भुजंगराव जल्हार
प्रो. अवि विश्वंभर जल्हार

रेणुकामाता यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कुल (CBSE) ज्युनिअर कॉलेज
बाजार सावंगी ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर
संस्थापक
विलास आर. साळुंके
अध्यक्ष
अरुण आर. साळुंके
मुख्याध्यापिका
सौ. कल्पना व्हि.साळुंके
आता पर्यंत नवोदय मध्ये निवड झालेले गुणवंत विद्यार्थी
ओम मुक्तेश्वर गायकवाड, तेजेस्विनी सुरेश नलावडे, ऋतुजा खंडु नलावडे, किर्ती बळीराम महालकर, गौरी भाऊसाहेब गायकवाड, समिक्षा बाळू काटकर, सार्थक शेषराव काटकर, सुदर्शन बळीराम महालकर

रेणुकामाता यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
भिकणराव मोहनराव घुले
बाजार सावंगी,
जिल्हा उपाध्यक्ष
भारतीय किसान संघ
लक्ष्मण भिकण जाधव
बाजार सावंगी,
जिल्हा कार्यकारणी सदस्य
भारतीय किसान संघ

रेणुकामाता यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत!
विविध सेवा सहकारी सोसायटी, बाजार सावंगी
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर
किशोर पाटील नलावडे
चेअरमन
एस. पी. जाधव
मुख्य सचिव

# आसियान : भविष्याचा वेध घेणारे व्यासपीठ



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**हनोई येथे झालेल्या चर्चेचा केंद्रबिंदू कोणता होता, तर सहभागी विकासासाठी सामुदायिक विचारांची देवाणघेवाण करणे हा होता आणि आशियांच्या या व्यासपीठावरून जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सखोल चिंतन करण्यात आले आहे. प्राचीन काळात कंबुज ऋषींनी आग्नेय आशियात प्रवेश करून तेथे कंबुज द्वीपाची स्थापना केली. त्यातूनच आज व्हिएतनाम, कंबोडिया हे देश उभे आहेत. तसेच कौंडीन्य ऋषींनी सुवर्णद्वीपात प्रवेश केला व तेथे श्री विजय साम्राज्य उभे राहिले. त्यातून इंडोनेशिया, मलेशिया ही राष्ट्रे आज प्रगतीच्या शिखरावर आहेत. कोडेज या फ्रेंच पुरातत्वज्ञाने लिहिलेल्या भारतीयकरण या ग्रंथामध्ये प्राचीन काळातील भारताच्या सांस्कृतिक विस्ताराची पहिल्यांदा नोंद केली.**

आज आग्नेय आशियाई राष्ट्रांबरोबर सांस्कृतिक संबंधांचा सुवर्णबंध भारत भक्कमपणे विकसित करत आहे. व्हिएतनामधील हनोई शहरात संपन्न झालेल्या पहिल्या आशियान फ्युचर फोरम शिखर परिषदेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. कारण आग्नेय आशियाई राष्ट्रांमध्ये एक नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य या संघटनेने केले आहे. आशियान फोरमच्या पहिल्या परिषदेत भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी घडविलेले विचारमंथन हे सबंध आशिया खंडातील विशेषतः आग्नेय आशियाई देशांना नवी ऊर्जा देणारे आणि नवी दिशा देणारे ठरले आहे. या आशियान फोरम व्यासपीठाचे एक अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण आग्नेय आशियाई देशांचे प्रश्न व त्यांच्या विकासाच्या समस्या यांना मुखर करण्याचे कार्य या व्यासपीठाने करण्यास प्रारंभ केला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांनी आपल्या संदेशात असे नमूद केले की, सुमारे सहा दशकांपासून दक्षिण पूर्व आशियातील देशांनी एक गतिमान, लवचिक आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक अर्थव्यवस्था तयार केली आहे. शांतता, संवाद, निःशस्त्रीकरण आणि जागतिक स्तरावर अणू अप्रसारासाठी एक मजबूत आवाज तयार केला आहे. जलद आणि शाश्वत विकासासाठी या मंचाचे विशेष महत्त्व आहे. जागतिक संघर्ष, हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन, प्रदीर्घ व बिकट गरिबीची समस्या, असमानतेचे परिणाम दूर करण्यासाठी दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रे प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत. शाश्वत विकास उद्दिष्टपूर्तीसाठी लोकांची स्वप्ने पूर्ण करण्यास या संघटनेवर विशेष जबाबदारी आहे. कारण शाश्वत विकास गुंतवणूकीला नवी गती देण्याची गरज आहे. हवामान बदलाच्या संकटातून दक्षिण आशियाला मुक्त करून हरित उत्तरे शोधण्यासाठी या देशाच्या अर्थव्यवस्थांना जोडण्याची वेळ आली आहे. गंभीर जागतिक अर्थप्रणाली आणि पुरवठा साखळीचे प्रश्न सोडविण्यासाठी सुरक्षा परिषदेत अनेकवेळा ऊहापोह होतो. परंतु आर्थिक वास्तूकलेमध्ये सुधारणा आणि पुर्नमूल्यांकन या कामी पुढाकार घेणारी, समृद्ध भविष्य घडविणारी आशियान ही एक प्रमुख संघटना आहे. आशियान हे एक कुटुंब आहे. विकासाची भागीदारी नवीन उंचीवर नेण्यासाठी आता हे नवे व्यासपीठ कटिबद्ध झाले आहे.

आशियान फोरमचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या व्यासपीठावरून आशियाचा आवाज बुलंद झाला आहे. गेल्या ५००० वर्षातील भारत आणि आग्नेय आशियाई राष्ट्रे यांच्यातील जे सांस्कृतिक स्नेहसंबंध आहेत ते त्यामुळे अधिक मजबूत झाले आहेत आणि त्यांच्या प्रश्नांचा ऊहापोह करून या प्रश्नांना नवी दिशा देण्याचे कार्य या आशियान फोरम संघटनेने आरंभिले आहे. परराष्ट्रमंत्री एस्. जयशंकर यांच्या चिंतनाचे सार काय, बहुध्रुवी जगात या चिंतनाचे महत्त्व काय, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे येथे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वसमावेशक सुरक्षेचा विचार आशियान फ्युचर फोरम २०२४ मध्ये करण्यात आलेले विचारमंथन हे सामुदायिक विकासासाठी सर्वसमावेशक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत बोधप्रद उपयुक्त व दिशादर्शक ठरले आहे. आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू, इंडोनेशियाचे ते कारण यांनी बांडुंग परिषदेमध्ये आशियाई देशांच्या संघटनास पहिल्यांदा प्रारंभ केला होता. तेव्हापासून वर्तमान



नरेंद्र मोदी युगापर्यंत आशियाई देशांच्या संघटनेने एक तेजस्वी दिशा घेतली आहे.

आशियान फोरमने २३ एप्रिल रोजी दुपारी हनोई येथे दुसऱ्या पूर्ण सत्रामध्ये प्रवेश केला. त्यामध्ये लोककेंद्रित विकास आणि आशियान समुदायासाठी सर्वसमावेशक सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या केंद्रबिंदूवर भर देण्यात आला. सर्व सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणविषयक पैलूंनी युक्त समग्र शाश्वत विकासाचा विचार करून प्रादेशिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आशियान फोरम या व्यासपीठाने सर्वसमावेशक दृष्टिकोनावर भर दिला आहे. आशियान फोरम हानोई परिषदेचे फलित काय असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर असे की, या परिषदेतील चर्चा ही सामुदायिक विचारमंथन आणि रचनात्मक कृती यावर आधारलेली आहे.

या शिखर डॉ. जयशंकर यांनी भारताच्या दोन कल्पनांवर भर दिला. त्यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे इंडियाज् इंडो-पॅसिफिक ओशन इनिशिएटिव्ह (आय. पी. ओ. आय.) म्हणजे भारताचा हिंद प्रशांत सागर क्षेत्रातील राष्ट्रांसाठी भारताने घेतलेला पुढाकार हा महत्त्वाचा आहे. आय.पी.ओ.आय. हे भारताने नवे व्यूहरचनात्मक संघटन तयार केले आहे. तसेच आशियान आऊटलूक ऑफ इंडो-पॅसिफिक म्हणजेच ए. ओ. आय. पी. हे संघटनही महत्त्वाचा दुवा म्हणून काम करत आहे. या दोन्ही संघटनांमध्ये समन्वय प्रस्थापित करून एक नवी संबंधांची चौकट भारताने तयार केली आहे. त्यामुळे हिंद प्रशांत क्षेत्रातील चीनच्या आव्हानांचा सामुदायिक सामना करण्यासाठी आणि आशियाच्या सुरक्षिततेसाठी एक सर्वसमावेशक संघटन तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. जयशंकर यांनी सांगितल्याप्रमाणे भारताच्या अॅक्ट ईस्ट धोरणाच्या परिपूर्तीसाठी हे नवे धोरण केंद्रस्थानी आहे. त्याचे पुढचे पाऊल या व्यासपीठाने टाकले आहे. त्याचा फायदा पूर्व - ईशान्य भागातील सात राज्यांच्या सांस्कृतिक व आर्थिक व्यापार वृद्धीसाठी होणार आहे. पूर्वेकडे नुसते पाहू नका तर कृती करा, ही भारताची भूमिका असल्यामुळे भारताने घेतलेला हा पुढाकार अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या व्यापक हिंद प्रशांत क्षेत्रातील दृष्टिकोनाचे प्रतिबिंब जयशंकर यांच्या भाषणात उमटले आहे. जागतिक शांतता आणि विकासात आशियाचा आणि दक्षिणेचा दृष्टिकोन भारताने गेल्या २ - ३ वर्षात सातत्याने मांडला आहे आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींना नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. नजीकच्या भविष्यकाळात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सर्व आशियाई राष्ट्रांनी एकत्र यावे आणि त्यातल्या त्यात आग्नेय आशियाई राष्ट्रांनी विना अडथळा वाणिज्य स्वातंत्र्याचा पुरस्कार करावा, मुक्त व्यापाराचा आदर करावा आणि परस्पर हितसंवर्धक कार्य करावे, त्यासाठी सुविधा तयार कराव्यात व अत्यावश्यक अशा व्यवस्था विकसित करण्यावर भर द्यावा लागणार आहे. विशेषतः क्वाड परिषदेमध्ये भारताने घेतलेल्या भूमिकेस समांतर अशी भूमिका आशियान फोरममध्ये मांडण्यात आली आहे. त्यामुळे सर्व राष्ट्रांनी भारताच्या भूमिकेचे स्वागत करून भारताच्या आवाजाला प्रतिसाद दिला आहे आणि त्यातून आशियान हनोई परिषदेने चीनला एक प्रकारे इशारा दिला आहे आणि भारताचे संघटन व हिंद प्रशांत क्षेत्रातील भारताचे सामर्थ्य याचे दर्शन या पहिल्या आशियान फ्युचर फोरममध्ये प्रकट झाले आहे. समर्थ, बुलंद दक्षिण आशिया आणि मजबूत आशिया आणि त्यात भारताच्या नेतृत्वाखाली आग्नेय आशियाई राष्ट्रांची जबरदस्त भूमिका हाच पहिल्या आशियान फोरमचा संदेश आहे असे म्हणावे लागेल. भारताने घेतलेल्या पुढाकारामुळे हिंद प्रशांत क्षेत्रात एक नवचैतन्य निर्माण झाले आहे आणि आग्नेय आशियाई राष्ट्रांच्या पुढाकाराने झालेल्या पहिल्या आशियान फ्युचर फोरम या शिखर परिषदेने आशियातील सत्ता समतोलाला एक नवी दिशा दिली आहे असेच म्हणावे लागेल.

डॉ. जयशंकर यांनी भारताच्या दोन कल्पनांवर भर दिला. त्यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे इंडियाज् इंडो-पॅसिफिक ओशन इनिशिएटिव्ह (आय. पी. ओ. आय.) म्हणजे भारताचा हिंद प्रशांत सागर क्षेत्रातील राष्ट्रांसाठी भारताने घेतलेला पुढाकार हा महत्त्वाचा आहे. आय.पी.ओ.आय. हे भारताने नवे व्यूहरचनात्मक संघटन तयार केले आहे. तसेच आशियान आऊटलूक ऑफ इंडो-पॅसिफिक म्हणजेच ए. ओ. आय. पी. हे संघटनही महत्त्वाचा दुवा म्हणून काम करत आहे. या दोन्ही संघटनांमध्ये समन्वय प्रस्थापित करून एक नवी संबंधांची चौकट भारताने तयार केली आहे. त्यामुळे हिंद प्रशांत क्षेत्रातील चीनच्या आव्हानांचा सामुदायिक सामना करण्यासाठी आणि आशियाच्या सुरक्षिततेसाठी एक सर्वसमावेशक संघटन तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. जयशंकर यांनी सांगितल्याप्रमाणे भारताच्या अॅक्ट ईस्ट धोरणाच्या परिपूर्तीसाठी हे नवे धोरण केंद्रस्थानी आहे. त्याचे पुढचे पाऊल या व्यासपीठाने टाकले आहे. त्याचा फायदा पूर्व - ईशान्य भागातील सात राज्यांच्या सांस्कृतिक व आर्थिक व्यापार वृद्धीसाठी होणार आहे. पूर्वेकडे नुसते पाहू नका तर कृती करा, ही भारताची भूमिका असल्यामुळे भारताने घेतलेला हा पुढाकार अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या व्यापक हिंद प्रशांत क्षेत्रातील दृष्टिकोनाचे प्रतिबिंब जयशंकर यांच्या भाषणात उमटले आहे. जागतिक शांतता आणि विकासात आशियाचा आणि दक्षिणेचा दृष्टिकोन भारताने गेल्या २ - ३ वर्षात सातत्याने मांडला आहे आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींना नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. नजीकच्या भविष्यकाळात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सर्व आशियाई राष्ट्रांनी एकत्र यावे आणि त्यातल्या त्यात आग्नेय आशियाई राष्ट्रांनी विना अडथळा वाणिज्य स्वातंत्र्याचा पुरस्कार करावा, मुक्त व्यापाराचा आदर करावा आणि परस्पर हितसंवर्धक कार्य करावे, त्यासाठी सुविधा तयार कराव्यात व अत्यावश्यक अशा व्यवस्था विकसित करण्यावर भर द्यावा लागणार आहे. विशेषतः क्वाड परिषदेमध्ये भारताने घेतलेल्या भूमिकेस समांतर अशी भूमिका आशियान फोरममध्ये मांडण्यात आली आहे. त्यामुळे सर्व राष्ट्रांनी भारताच्या भूमिकेचे स्वागत करून भारताच्या आवाजाला प्रतिसाद दिला आहे आणि त्यातून आशियान हनोई परिषदेने चीनला एक प्रकारे इशारा दिला आहे आणि भारताचे संघटन व हिंद प्रशांत क्षेत्रातील भारताचे सामर्थ्य याचे दर्शन या पहिल्या आशियान फ्युचर फोरममध्ये प्रकट झाले आहे. समर्थ, बुलंद दक्षिण आशिया आणि मजबूत आशिया आणि त्यात भारताच्या नेतृत्वाखाली आग्नेय आशियाई राष्ट्रांची जबरदस्त भूमिका हाच पहिल्या आशियान फोरमचा संदेश आहे असे म्हणावे लागेल. भारताने घेतलेल्या पुढाकारामुळे हिंद प्रशांत क्षेत्रात एक नवचैतन्य निर्माण झाले आहे आणि आग्नेय आशियाई राष्ट्रांच्या पुढाकाराने झालेल्या पहिल्या आशियान फ्युचर फोरम या शिखर परिषदेने आशियातील सत्ता समतोलाला एक नवी दिशा दिली आहे असेच म्हणावे लागेल.

# आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकलेचा निर्माता : राजा रविवर्मा

आधुनिक केसरी

आजच्याच दिवशी १८४८ साली राजा रविवर्मा या प्रसिद्ध चित्रकाराचा जन्म केरळ मधील कोईल तंपुरन किळीमनूर राजवाड्यात झाला त्यांचे वडील संस्कृत व आयुर्वेदाचे विद्वान होते अन आई एक प्रसिद्ध कवयित्री होती .आईने लिहलेला पार्वती स्वयंवर हा काव्य संग्रह त्यांच्या आईच्या मृत्यूनंतर राजा रविवर्मा यांनी प्रसिद्ध केला होता त्यांच्या घरात साहित्य व संस्कृतीचे वातावरण होते . त्यांचे काका चित्रकार होते . त्याचा प्रभाव त्यांच्या चित्रावर होता तिरुअनंतपुरम येथील राजदरबारी असणारे इंग्रज गृहस्थ ओडर जेन्सन व रामस्वामी नायडू यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले राजा रविवर्मा त्रावणकोर येथील राजघराण्याचे चित्रकार होते. त्यांनी भारतभर प्रवास केला होता . भारतीय संस्कृती व कला यांचा अभ्यास त्यांनी केला होता . आपले देव देवता कशा आहेत याचे वास्तव लोकांना राजा रविवर्मा यांच्या चित्रावरून कळले. आजही त्यांची हिंदू महाकाव्ये व पुराणे यातील चित्रे प्रमाण मानली जातात. त्रावणकोर येथील दिवाणांच्या सल्यानुसार त्यांनी मुंबई तिल घाटकोपर येथे लिथोग्राफिक प्रिंटिंग प्रेस १८९४ साली काढली . ही प्रेस त्या काळी देशात सर्वात मोठी प्रेस होती नंतर ती मळवली येथे लोणावळ्या जवळ नेली दुर्दैवाने ते प्रेस आगीत नष्ट झाले राजा रविवर्मा यांचे



महाराष्ट्राशी विशेष नाते होते . महाराष्ट्रातील स्त्री त्यांनी त्यांच्या अनेक चित्रात चित्रित केली आहे १८७३ मध्ये त्यांना चित्रकला स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले होते .त्याच वर्षी व्हीएनन्ना येथे भरलेल्या जागतिक चित्र प्रदर्शनात त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले यामुळे जागतिक पातळीवर त्याचे लक्ष वेधले गेले त्यांनी काढलेली दुष्यंत व शकुंतला, नळ व दमयंती, विश्वमित्र व मेनका ही चित्रे विशेष गाजली आहेत.भारतीय संस्कृती व कला यांचा त्यांचा अभ्यास गाढा होता. युरोपियन चित्रकाराप्रमाणे कमिशन पोर्टेट काढणारे ते पहिले भारतीय कलाकार होते. राजा रविवर्मा यांना आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकार असे म्हटले जाते. राजा रविवर्मा यांना अनेक मानसन्मान आयुष्यात मिळाले.



जागतिक पातळीवर भरलेल्या शिकागो येथील प्रदर्शनात त्यांना पुरस्कार मिळाला होता. सातव्या एडवर्ड च्या हस्ते त्यांना कैसर ए हिंद ही पदवी मिळाली होती. राजा रविवर्मा यांची प्रसिद्धी त्या काळी एवढी होती कि त्यांची अनेक चित्रे देशातील राजवाड्यात दिमाखाने वावरत असत .चित्रकलेच्या या महान कलाकाराला मात्र दीर्घायुष्य लाभले नाही . वयाच्या केवळ ५८ व्या वर्षी त्यांचे निधन २ ऑक्टोबर १९०६ रोजी झाले . त्यांच्या स्मरणार्थ भारत सरकारतर्फे १९९३ सालापासून राजा वर्मा पुरस्काराचे दरवर्षी आयोजन केले जाते .चित्रकला क्षेत्रातील नामवंत कलाकारांना या पुरस्काराने गौरविले जाते आजही त्यांची अनेक चित्रे विविध कलादालनात पाहून कलाप्रेमी भावविश्वात रंगून जातात भारतात चित्रकलेचे युग बालक व युवा वर्गात निर्माण होवो हीच राजा रविवर्मा यांच्या जन्मदिनी इच्छा व आशा.

शांताराम वाघ, पुणे
96234 525 53

# ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आपल्या सभोवतालच्या सृष्टीचे मनमोहक सौंदर्य इतर सर्वच सौंदर्यापेक्षा महान आहे! फुले फुलतात, झाडे डुलतात आणि कुणाच्याही बोलावण्याशिवाय कोकिळ सुमधुर गातो! सगळीकडे आनंदाची आरास मांडतांना न चुकता सूर्य-चंद्र आपली परिक्रमा पूर्ण करत असतात. ना मान ना अपमान! सूर्यप्रकाश सोन्यावरही तेव्हढाच आणि गटावरही तेव्हढाच! कुठलाही भेद नाही की; वेगळा भाव नाही. आपलं नित्यनेमाने येणे, सृष्टीला फुलवणे अन् मावळणे! यात तिळमात्रही बदल नाही! किती हे सोपं, सहज, निखळ जगण्याचं स्वरूप! अशा अनेक दृश्य-अदृश्य गोष्टी आहेत ज्या माणसाचं जगणं, वागणं, बोलणं, चालणं सहजच सुंदर बनवतात! त्यातील शब्द हा एक अलौकिक चमत्कार! आत्तापर्यंत शब्दांनीच अनेक पराक्रम आणि परिक्रमा घडवून आणल्या आहेत.**

शब्दांनीच झालेत युद्ध, तह आणि शब्दांनीच संपलेत मोठ मोठे राजे-महाराजे! शब्दच असतात माणसाला घडवणारे आणि बडवणारेही! या शब्दांनीच घेतलाय बळी अनेकांचा आणि यांनीच केलंय अजरामर अनेकांना! शब्दच असतात माणसाचे जगण्याचे आणि मरण्याचेही खरे खुरे बोल! आपण काय विचार करतो? काय व्यक्त होतो? झोपतांना आणि झोपेतून उठल्याबरोबर जे शब्द ओठांवर, मनात असतात ते शब्दच तुमची दिवसभर साथसंगत करत असतात. शब्दच असतात माणसांचे खरे साथी-सोबती! जेंव्हा कुणीच नसतो सोबतीला तेंव्हा धावून येतात मदतीला शब्द! तेच होतात पाठीराखा, एवढेच काय ओसाड, निर्जन रस्त्यावर एकटे एकटे फिरणाऱ्या माणसांना शब्दच आणतात पुन्हा योग्य रस्त्यावर आणि माणसातही! लोकांची मुंडकी तोडणारा कोळ्याचा वाल्या काय किंवा डाकू अंगुलीमाल काय? शब्दांनीच झाले हे दोघेही सन्माननीय! एकाने रामा आधी लिहिले रामायण तर दुसऱ्याने साथ केली तथागतांना! शब्दांनीच बदलली माणसे, बदलताहेत आणि असेतु चंद्रसूर्य बदलत राहतील! आज माणसाने जरी चंद्राच्या अदृश्य भागावर पाउल ठेवले असले तरी ते सांगायला, जल्लोष आणि अभिनंदन करायला शब्दच लागले! शब्द सोडत नाहीत कुणालाच! माणसांकडे कितीही संपत्ती, सत्ता किंवा शक्ती असू द्या, त्यालाही दोन शब्द लागतातच मायेचे, प्रमाचे, आपुलकीचे, जिव्हाळ्याचे! आत्तापर्यंत अनेक महान सत्तास्थाने होऊन गेली. त्यांचे बाकी काही भौतिक शिल्लक असेल-नसेल परंतु शब्दांनीच ती माणसे आजही अजरामर आहेत मनःपटलावर आणि ग्रंथालयात! अगदी माणसाच्या सर्वांगसुंदर जगण्याच्या प्रारंभापासून ते आजतागायत शब्दच माणसांना जागवतात! माणसं कालवश होतात पण शब्द मरत नसतात कधीच! आजही सर्वांचे शब्द घुमताहेत अनंतात! शब्दच असतात प्रेम आणि द्वेषाचे! शब्दच तोडतात रावण आणि बिभीषण, जोडतात राम आणि हनुमान! शब्दच खायला लावतात माणसांना माती आणि शब्दच नेवून ठेवतात माणसांना शिखरावरही! त्यासाठी शब्दांच्या जादूगारांची जादू आजही तेव्हढीच प्रभावी आणि अनंत आहे! तिकडे सॉक्रेटीस, येशू आणि इकडे नामा, जना, ज्ञाना, चोखा, गोरा, बंका, मुक्ता, मीरा, एका, तुका यांनाही जंग जंग छळले शब्दांनी! एवढेच काय जीव घेतला त्यांचा शब्दांनीच पण सोडले नाही त्यांनी शब्दांना! शब्दांनीच प्रचंड छळले आणि शब्दांमुळेच ते लोकांना कळलेही! त्यांचे अलौकिक शब्दच आज शिल्लक आहेत आणि काही जीर्ण, भग्नावशेष! त्यातील अवशेषांना




वंदन करतांना ते तिथेच राहतात, मात्र त्यांचे शब्द नित्य नित्य संगतीत असतात कधी अभंग, गीत, ओवी किंवा ग्रंथाच्या रुपात! याचाच परिपाक म्हणजे आजही या माणसांची शब्द संपत्ती आपल्यासोबत आहे आणि त्यामुळेच नेहमी हवेत उडणाऱ्या भल्याभल्या माणसांचे पाय मातीवर आहेत आणि नसतील तर ते पाय जमिनीवर शब्द आणतातच आणतात! ही सगळीच माणसे आपल्या काळात नित्य उपेक्षित राहिली आणि ते बरे झाले. त्यामुळेच त्यांना लोकांचा इथला लोकधर्म सहज कळला. त्याचा परिपाक म्हणजे ते उत्तमोत्तम निर्मिती करू शकले. अनेक ग्रंथांचे अध्ययन-अध्यापन करू शकले. अनेक ग्रंथांवर अप्रतिम टीका लिहू शकले. त्यातील सर्वांगसुंदर भाव आणि त्यांचा प्रभाव प्रकट करू शकले. या अनेकांच्या मांदियाळीतील ध्रुवतारा म्हणजे जगद्गुरू संत तुकोबाराय! अतोनात कष्ट भोगलेला हा शेतकरी माणूस अजीवन शब्दांसाठीच जगला! लोकांना आपल्या शब्दांनी सतत जागवत राहिला! ज्याच्या जीवाचे जीवन होते शब्द! शब्दांनीच क्रांती पेरीत गेलेला हा महामानव आजही आपल्या

**लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥१॥**
**ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥धृ॥**
**ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ॥३॥**
**तुका म्हणे जाण । व्हावे लहानाहुनी लहान ॥४॥**

(१२८२) अशा सुमधुर शब्दांनी तमाम आसमंत जागा करतो आहे. असं म्हणतात ना, 'जाळ अन् धूर संगतच' अगदी तसे तुकोबांचे अभंग-शब्द म्हणजे दृष्टांत आणि सिद्धांत सोबतच! तुकोबांचे अभंग म्हणजे अणुबॉम्ब! अणुबॉम्बपेक्षाही महान शक्ती या शब्दांत आहे! अणुबॉम्ब शक्ती जशी विधायक कामासाठी शोधली गेली, दुर्दैवाने त्या शक्तीचा माणसाने विघातक विनियोग केला, त्याला संशोधक काय करणार? एखाद्या घरात चाकू आहे, त्याचा वापर कोणी कसा करावा( ?) हे ज्याचे त्याच्यावर अवलंबून आहे. त्याला घरमालक किंवा बिचारा चाकू काय करणार? तेंव्हा अणुबॉम्ब असो की तुकोबांचे शब्द; ते आपण कसे उपयोगात आणतो हे महत्वाचे! तुकोबा सहज बोलत, लिहित जातात. लिहितांना मात्र सर्वकाळ समाजाच्या खोलवर सिंचन व्हावे हाच केवळ प्रांजळ हेतू ठेवून ते आपली पेरणी करतात आणि आजही तेवढ्याच हिरहिरीने करताहेत, फक्त त्याची जाण आणि भान आपण ठेवायला हवे.

आजचा हा अभंग माहिती नाही असा एकही मराठी माणूस सुद्धा शोधून सापडणार नाही. तुकोबांच्या लेखणीचे हे सर्वश्रुत वैशिष्ट्ये! त्यांचे अभंग सहजतेने लोकप्रवाही आहेत. त्यांचे अनेक अभंग लोकव्यवहाराचे शब्द होऊन गेलेत तर अनेक अभंगांनी वाक्प्रचार, म्हणींचे रूप धारण केले आहे. त्यापैकी हा एक अभंग! एखाद्या काव्याचे किंवा वाक्याचे बदलत्या परिपेक्षात वेळोवेळी अर्थ आणि अन्वयार्थ बदलत असतात. तुकोबांच्या शब्दांचे शब्दांचे संदर्भ तत्कालीन, वर्तमानकालीन आणि सार्वकालिक आहेत! अशी एक ना अनेक उद्दिष्टे तुकोबा आपल्या शब्दांनी साध्य करत असतात. त्यातीलच हा एक लोकप्रिय अभंग! इथे तुकोबा देवाकडे लहानपण मागतात. लहानपण दोन प्रकारचे आहे. एक म्हणजे बालपण आणि दुसरे म्हणजे नम्रपणा! लहान मुल कसे निरागस असते? दिसायला देखणे, सदासर्वकाळ हसतमुख, प्रसन्नता लहान मुलांच्या मुखावरून ओसंडून वाहत असते. खळखळून हसणारे गोंडस बाळ कुणालाही पटकन उचलून कडेवर घ्यावेसे वाटते! लहानपण म्हणजेच खऱ्या अर्थाने माणसातील देवपणच! दुसरीकडे माणसाने लहान होऊन म्हणजेच विनम्र होऊन रहावे. महापुरात उंच उंच झाडे उन्मळून पडतात, वाहून जातात तिथेच नदीतील लव्हाळ नावाचे गवत पूर आला की वाकते आणि ओसरला की पुन्हा उभे राहते! लहानपणातच खरी महानता आणि शहाणपण आहे. जी माणसं नम्र, शांत, संयमी आहेत त्या माणसांचे चेहरे प्रसन्न आहेत आणि त्यांना कमी आजार आहेत. त्यासाठी माणसाने लहान बालकासारखे निरागस आणि विनम्र भाव मनामध्ये ठेवावेत. असे केल्यास माणसाला कमी अडचणींना सामोरे जावे लागते. त्याला जोडून तुकोबाराय मुंगीचा दृष्टांत देतात. हत्ती होऊन लाकडं फोडण्यापेक्षा मुंगी होऊन साखर खावी. सर्वकाळ आनंदी जीवन जगण्याचा हा सर्वोत्तम मार्ग! जीवनात लहानपण किती महत्वपूर्ण आणि अगदी कळीचे आहे? याचा दुसरा दृष्टांत म्हणजे एवढा मोठा ऐरावतासारखा हत्तीसुद्धा एवढ्याशा अंकुशाने नियंत्रणात ठेवता येतो. एवढेच काय, एवढीसी मुंगी जर हत्तीच्या कानात गेली आणि तिने त्याला दंश केला तर क्षणार्धात हत्ती खाली कोसळतो! हत्ती केवढा आणि मुंगी केवढी? पण सर्वकाही शक्तीने होत नसते याचे हे उत्तम उदाहरण! लहानपण घेणे म्हणजे कमीपणा घेणे नाही. भरधाव येणाऱ्या वाहनाला रस्ता देण्यासाठी बाजूला उभे राहणे आणि त्याला रस्ता देणे हा खरा शहाणपणा! अपघात झाल्यानंतर पश्चाताप करण्यात काय फायदा? त्यासाठी लहान होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने मोठे होणे होय! तुकोबाराय पुढे मोठ्या माणसांचे मोठेपण कसे आव्हानात्मक असते( ?) याचा दाखला देतात. जी जी माणसे मोठी आहेत त्यांना जबाबदारी मोठी आहे. माझा एक वर्गमित्र मुंबईला पोलीस महासंचालक (एसपी) आहे. बिचाऱ्याला प्रचंड जबाबदाऱ्या! अक्षरशः त्याला जेवायला वेळ नसतो. सारखा व्यस्त असतो. माणूस जेवढा मोठा तेवढ्या जबाबदाऱ्या जास्त! मोठे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने जबाबदारी घेऊन शांत, संयत, लहानपणाने मोठी कामे करणे होय! त्यासाठी शेवटी तुकोबाराय म्हणतात, हे माणसा तू हे लहानपण लक्षात ठेव आणि नित्य नित्य लहान मुलासारखं निरागस, आनंदी रहा! त्याच्या जोडीला तुझ्यातील नम्रभाव कमी होऊ देऊ नको! तू कितीही मोठा, महान असला तरी एक दिवस तुझी सत्ता, शक्ती, वैभव, सौंदर्य क्षीण होणार आहे! तुला इथून निघून जावेच लागणार आहे. त्यावेळी लोकांनी तुझी खरी किंमत केली पाहिजे! तेंव्हा प्रिय माय-बाप वाचकहो, आपणही नित्य नित्य तुकोबांच्या आणि त्यांच्या अभंगांच्या संगतीत राहूया! आपल्या जीवनात लहानपणा आणि त्याच्या जोडीने शांत, संयम, विनम्रतेचा महानपणा जीवनात ओतप्रोत भरुया! असे होणे म्हणजेच नित्य तुकोबांची संगत सोबत बाळगणे होय! जय तुकोबाराय!

# व्यसन आणि फॅशन



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**युवकांचा देश किंवा तरुणाईचा देश म्हणून आज संपूर्ण जगात भारताची ओळख निर्माण झालेली आहे. जगातील सर्वाधिक तरुण आज आपल्या भारतात आहेत . आणि म्हणूनच , डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी याच तरुणाईच्या मनगटावर आणि डोक्यावर विश्वास ठेवत हा देश विश्वगुरूपदी आसनस्थ होईल असं स्वप्न पाहिलं होतं. स्वामी विवेकानंदांनी सुद्धा मला पौलादी नसा आणि सिंहाचे हृदय असलेल्या तरुणांची गरज आहे असा विचार समोर ठेवत या राष्ट्रनिर्मितीसाठी तरुणाईला आवाहन केलेलं होतं . असा हा तरुण आज संपूर्ण जगामध्ये भारताचा प्रतिनिधित्व करत एक वेगळी ओळख निर्माण करणारा ठरला आहे.**

या देशामध्ये चिंता करावी असा विषय म्हणजे आजच्या तरुणाई मध्ये निर्माण होत चाललेली व्यसनाधीनता . महाविद्यालयीन जीवनामध्ये प्रवेश करतात किंबहुना त्या आधीपासूनच आज तरुण हे व्यसनाच्या आहारी गेलेले पाहायला मिळतात . खर्रा , गुटखा , तंबाखू आणि बाजारात मिळणाऱ्या विविध प्रकारच्या सुगंधित तंबाखू युक्त पुड्या खाण्यामध्ये आजचा तरुण हा सहजतेने सरसावला आहे . तर बियर बार मध्ये जाऊन बियर , व्हिस्की , रम घेण्यासही आजची ही तरुणाई बऱ्याच प्रमाणात सैलावली आहे . वाईट याचं वाटतं की, या तरुणांसोबत आता बारमध्ये हातामध्ये मद्याचे ग्लास घेतलेल्या तरुणी सुद्धा त्यांच्यासोबत दिसायला लागल्या आहेत . किंबहुना अनेक मेट्रो सिटी मध्ये ड्रग्स आणि अमली पदार्थांच्या रेव्ह पार्ट्यांचच आयोजन केल्या जात आहे . या पार्टनमध्ये 16 वर्षापासून तर 20/22 वर्षापर्यंतच्या मुला-मुलींचे प्रमाण हल्ली मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. महाविद्यालयीन जीवनापासूनच सुरू झालेली ही व्यसनाधीनता पुढे या तरुणाईच्या वैयक्तिक आयुष्यासह कौटुंबिक आयुष्य , सोबतच सामाजिक स्वास्थ्यावर सुद्धा विपरीत परिणाम करताना दिसू लागली आहे . महाविद्यालयीन तरुणाईचा वाढदिवस हा हल्ली बियर बार मध्ये किंवा मोठ्या हॉटेलमध्ये हातात मद्याचे पेले आणि सिगारेटच्या धुरामध्ये साजरा होताना दिसतो आहे आणि ही सर्व परिस्थिती अतिशय चिंताजनक वळणावर येऊन थांबलेली आहे . हल्ली पार्ट्या कोणा एखाद्या मित्राच्या घरी होताना दिसत नाहीत तर त्या हॉटेलमध्ये किंवा रिसॉर्ट मध्ये होताना दिसतात. त्यामुळे आपला मुलगा नेमका कुठे जातोय ? काय करतोय ? याकडे सहसा आई-वडिलांचं लक्ष जात नाही . परंतु आजची ही तरुणाई व्यसनांच्या आहारी जाऊन आपलं आयुष्य तर उद्ध्वस्त करत नाहीये ना याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे . आणि अमली पदार्थांचा सेवन हे सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत असून आजची तरुणाई याच्याही आहारी गेलेली आहे . त्यामुळे येणाऱ्या काळात या पिढीचं भविष्य नेमकं काय राहील ? याचा विचार समाजातल्या प्रत्येक सुजाण नागरिकांनी करणे ही आज आत्ता या क्षणाला आपली गरज आहे . हातात सिगरेट घेऊन त्याचे झुरके मारणारी तरुणाई सुद्धा आज मोठ्या प्रमाणात दिसते आहे . आणि यात महाविद्यालयीन मुली सुद्धा आज मागे नाहीत हे खेदाने म्हणावे लागते. आपण, मेट्रो सिटी मध्ये या सगळ्या गोष्टी होत्या असं काही वर्षांपूर्वी म्हणत होतो .परंतु आता चंद्रपूर , नागपूर , वर्धेसारख्या ठिकाणी सुद्धा अनेक चौकांमध्ये किंवा महाविद्यालयापासून थोड्याशा अंतरावर असलेल्या पानठेल्यावर , अनेक हॉटेलमध्ये , सुमसाम रस्त्यावर होणाऱ्या पार्ट्यांमध्ये अनेक मुलींच्या हाती मद्याच्या पेल्यासह सिगरेट सुद्धा अगदी सहजतेने दिसायला लागली आहे . जस्ट चिल यार , कूल ब्रो , एन्जॉय युवर लाईफ दोस्त ... असं म्हणत ही तरुणाई आज आपल्या व्यसनाधीनतेचे समर्थन करताना दिसते आहे . तर दुसऱ्या बाजूला खाजगी कंपन्यांमध्ये असलेल्या तरुणांच्या पार्ट्या सुद्धा वाढायला लागल्या आहेत . आणि त्या पाठीमागे त्यांचं कारण आहे की टारगेट च्या मागे धावत असताना येणारा स्ट्रेस घालविण्यासाठी म्हणून आम्ही त्या पार्ट्या करतो , खूप घेत नाही यार जस्ट एक 90 घेतली की पुरेसा . असं म्हणणारी ही तरुणाई जेव्हा एका मागे एक पेग रिचवत जाते तेव्हा माझ्या डोक्यात विचार येतो की डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करणारी हीच ती तरुणाई आहे का ? किंवा स्वामी विवेकानंद यांना अपेक्षित असलेली तरुणाई ती हीच का ? मित्रांच्या संगतीत वाहवत जाणे यातूनही हल्ली व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढताना दिसते आहे. यावर नेमका काय



उपाययोजना करण्यात याव्यात याचा विचार आता समाजातल्या जागरूक नागरिकांनी , सुजान नागरिकांनी निश्चितच करायला हवा . दुसरी गोष्ट आहे ती फॅशनची. व्यसन ही सुद्धा एक फॅशनच झालेली आहे . किंबहुना आपलं स्टॅंडर्ड सिम्बॉल , स्टेटस म्हणून सुद्धा हल्ली व्यसनाधीनतेकडे पाहिलं जातं . उच्चभ्रू समाजामध्ये स्टेटस सिम्बॉल म्हणून मिरवणारी व्यसनाधीनता आता सर्वसामान्यांच्याही बाबतीत मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते आहे. हीच अवस्था आता फॅशनच्या बाबतीत सुद्धा आहे न्यू फॅशन , न्यू ट्रेंड च्या नावाखाली आजच्या तरुणाईच्या अंगावर असलेले त्यांचे पोशाख पाहिले की वाटतं हे तरुणाई नेमकी कुठल्या दिशेला जात आहे ? मुलांच्या सोबत मुलींच्याही अंगावरचे कपडे हे दिवसेंदिवस तोकडे होत चाललेले आहेत आणि या तोकड्या कपड्यांमध्ये वावरत असताना या तरुणाईच्या मनामध्ये यत्कींचीतही आपण काही वेगळं करतोय याबद्दलचा संकोच जाणवत नाही. कुठे कसे कपडे आपण घालावेत ? कोणत्या कपड्यांमध्ये आपलं व्यक्तिमत्त्व खुलून दिसेल ? आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडण्यासाठी आपण कोणत्या प्रकारचे कपडे घालावेत ? याबाबत आजच्या तरुणाईमध्ये जाणीव दिसत नाही . आणि हे लोण आता ग्रामीण भागातही पाहायला मिळतंय . फॅशन च्या नावाखाली बदललेले वस्त्रप्रावरन हे समाज स्वास्थ्याच्या दृष्टीनेही योग्य आहे असं वाटत नाही . विशेषत्वाने हे पाहायला मिळत की महाविद्यालयात होणाऱ्या फ्रेशरस पार्ट्या , न्यू इयर पार्ट्या , सेंडऑफ पार्ट्या ह्या मध्ये या तरुणाईच्या कापड्यांकडे पाहिलं की वाटत यांना नेमकं काय दाखवायचय ? आम्ही खूप ऍडव्हान्स आहोत , आम्ही खूप मॉडर्न आहोत , आम्ही खूप फॅशनेबल आहोत , आम्ही खूप श्रीमंत आहोत हे यांना एकमेकांना दाखवायचं आहे का ? असे कपडे घालून अस दाखवता येत का ? यासाठी हे आवश्यक आहे का ? घरून अगदी साधे कपडे घालून आलेल्या अनेक तरुणी या अशा पार्ट्यासाठी खास मैत्रिणी कडून कपडे घेऊन घालतात , आणि पार्ट्या आटोपल्या की परत आपल्या साध्या कपड्यात त्या घरी जातांना आम्ही पाहिलंय . हे सगळं पाहिल्यानंतर आजच्या या तरुणाई बद्दल खरच काळजी वाटते, चिंता वाटते. या देशाच्या कोनशिलेचा आजची ही तरुणाई खरंतर मुख्य आधारस्तंभ आहे आणि याच आधारस्तंभावर आज या देशाची प्रगती , या देशाचं यश अवलंबून आहे . सगळ्या जागाच लक्ष आज आपल्या या भरतमातेकडे लागलंय . हा देश या विश्वाच नेतृत्व करण्यासाठी समोर येत असताना याच देशातील वाढत चाललेल व्यसन आणि फॅशन या तरुणाईला कुठे नेवून ठेवेल हा एक मोठा प्रश्नच आहे. आणि म्हणूनच आजचा हा लेखनप्रपंच .

# जे बदलता येत नाही त्याला योग्य प्रतिसाद देणं हेच कौशल्य



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनातील काही बाबी ह्या आपल्या अधिनस्त नाहीत हे वास्तव आहे आणि हे वास्तव स्वीकारून घडणाऱ्या घडामोडी अथवा बाबींना योग्य प्रतिसाद देता येणं हे जीवन कौशल्य आहे.जिथ बदल होत नाही अथवा जी परिस्थिती आपण बदलु शकत नाही.तिथे आपण स्वतः मध्ये बदल घडवून योग्य पद्धतीने सामोरं गेलं पाहिजे.हे समजणं हेच जीवनातील महत्वाचा ज्ञान आहे.तंत्रज्ञान युगात विज्ञानाची प्रगती डोळे दिपवणारी असली तरी निसर्गाच्या जन्म मृत्यू चक्रावर मात्र आपल्याला आजुन काही नियंत्रण मिळवता आलं नाही. त्याच बरोबर आपल्याशी निगडित घडणाऱ्या घडामोडी या सुद्धा आपल्या अधिपत्याखाली नाहीत.**

आपण नाममात्र आहोत हेच वास्तव आहे. आपला अंहकार आपण खुप काही असल्याचा बडेजाव मारत असतो.तो मानवी स्वभावाचा एक भाग आहे.पण आपल्या जीवनातील वेगवेगळ्या कालखंडात घडणाऱ्या घडामोडी बदल सुद्धा आपण अनभिज्ञ असतो.त्याच बरोबर कधी काय घडणार आहे काय विपती येणार आहे हे जरी आपण ठरवु शकत नसलो ते आपल्याला हातात नसल तरी उदभवणारया परिस्थितीला सामोर कसं जायचं हे मात्र आपल्याला अखत्यारीत असतं.कितीही कठिण परिस्थिती आली तरी आपण ज्ञान बुद्धी आणि विवेका या नुसार चांगल्या पद्धतीने परिस्थितीला सामोरे जाऊ शकतो या मध्ये शंका नाही.आयुष्याच्या वाटेवर मार्गक्रमण करताना सगळं अनिश्चित असत. त्यामुळे कधी काय होईल कोणतं संकटं येईल वाईट वेळेला सामोरं जावं लागेल अथवा काही सकारात्मक घडून  अनपेक्षित यश देखिल मिळू शकत अथवा परिस्थितीचा आघात देखिल आपल्यावर होऊ शकतो.तेव्हा आपण ताण तणाव न घेता उद्‌भवणारी परिस्थिती कशा पद्धतीने हतळाता येईल त्या परिस्थितीला प्रतिसाद किती चांगल्या पद्धतीने देता येईल व त्या संकटातून आपण किती व्यवस्थित मार्ग काढु शकतो.हे खुप महत्वाच असुन ते आपल्या स्वाधीन असतं. निसर्गाचं काल चक्र खुप वेगावन व भयानक आहे.वेळ काळ परिस्थिती हि कोणाच्याही आधीन नसल्याने परिस्थिती चा प्रभाव आणि अघात अचानक कधी कोणावर कोसळेल हे सांगता येत नाही.जीवनात उदभवणारी परस्थिती जरी आपल्या हातात नसली तरी उद्‌भवलेल्या परिस्थितीला प्रतिसाद कसा देयचा हे मात्र नक्की आपल्य हातात आहे.परस्थिती कशीही ओढावली तरी सुद्धा आपल्याला योग्य पद्धतीने प्रतिसाद देवुन परिस्थिती वर नियंत्रण मिळवता येऊ शकत.पण आपण थेटपणे परिस्थिती बदलु शकत नसलो तरी आपण आपल्या प्रतिसादानुसार योग्य पद्धतीने परस्थिती हाताळु शकतो.आपण मात्र परस्थिती बदलण्याचा प्रयत्न करतो आणि इथच फसतो.जगात कोणत्याही व्यक्तिला उद्‌भवणारी परस्थिती बदलता येत नाही. निसर्गाने हि शक्ति आजुन तरी आपल्याला बाहाल केली नाही.पण आपण ह्या शक्तिवर नियंत्रण मिळविण्यात वेळ वाया घालविण्या ऐवजी जशी परस्थिती आपल्या समोर निर्माण होईल त्या पद्धतीने सुचक ज्ञान पुर्वक प्रतिसाद देत सुयोग्य परिणाम मिळवु शकतो.मुळात बोध महत्वाचा आहे जो बदल आपण करू शकत नाहीत त्या ठिकाणी समोर जाताना मात्र आपण आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार योग्य मार्ग काढु शकतो.सुख दुःख हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे तो कोणालाही चुकलेला नाही फक्त आपलं योग्य ज्ञान आपल्याला तारत संजीवनी प्रदान करत . येताना काही आणलं नाही सोबत काही घेऊन जायचं नाही फक्त काही क्षण इथं अभिनय करायचा आहे.तो अभिनय योग्य पद्धतीने करता आला तर काही अडचण उरत नाही. येणार दुःख हे आपल्या हातात नाही पण त्या मधुन पुन्हा उभा कस राहायचं हे तर आपल्याला करावाच लागेल. महणुन आपण जी परिस्थिती बदलु शकत नाहीत तील योग्य पद्धतीने समोर जाण हाच अंतिम व उचित पर्याय असतो. हाच पर्याय योग्य सोपा व सुलभ असुन सगळ्यांसाठी हितकारक असतो. हाच हितकारक पर्याय समजण्यासाठी ज्ञान हे खुप महत्वाचे ठरते.

# जन हे दिल्या घेतल्याचे अंतकाळाचे कोणी नाही



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**स्वतःच नाव रूप टिकवण्यासाठी प्रत्येक जीव कार्य करत असतो.सर्वांनी माझंच कौतुक करावं, फक्त मलाच चांगलं म्हणावं यासाठी रात्रंदिवस राबत असतो.त्याचप्रमाणे प्रत्येक जीव हा सुखासाठी धडपड करत असतो. मी आणि माझं यातच गुरफटून जाऊन उपाधीच्या मागे लागतो. हा जीव उपाधीमध्ये एवढा अडकून जातो की त्याला स्वतःचे, जगताचे भानच उरत नाही. या सगळ्या मुळे त्याच्यामध्ये अहंकार निर्माण होतो. आपण जगाला, वस्तूंना सर्वांना माझे म्हणतो, परंतु कधीतरी या सर्वांनी देखील आपल्याला माझे म्हणावे, तर जीवनाचे सार्थक होईल पण असे झाल्याचे कधीच दिसून येत नाही.**

म्हणून मनुष्याच्या शेवटच्या क्षणांमध्ये मानवाला अतिशय दुःख भोगावे लागते. म्हणून जीवन जगत असताना मृगजळाच्या मागे न धावता परम सुखाची प्राप्ती करून देणारा भगवंत समजून घेतला, जाणून घेतला तरच जीवन जीवन प्रवासातील शेवटचे क्षण आनंदाचे असतील, असणाऱ्या भगवंताची प्राप्ती होण्यासाठी शास्त्रकृपा, संतकृपा, अंतकरण कृपा, दृष्टीकृपा, सद्‌गुरू कृपा असेल तरच भगवंत प्राप्तीची प्राप्ती होऊ शकते. परंतु आपण देहसंबंधाने विचार करतो आणि सुखदुःख भोगतो. आपल्या स्वतःच्या भगवंताबद्दलच्या कल्पना ह्याच आपल्याला मुळात दुःखदायक असतात आपण ठराविक ठिकाणी, आकारांमध्ये भगवंत शोधायला जातो आणि स्वतःची फरपट करून घेतो. परंतु भगवंत हा शोधला नाही तर जाणून घेतला तर तो आहेच आहे. त्याला संत म्हणतात," चाले हे शरीर कोणाचिया सत्ते, कोण बोलवितो हरीवीण, देखवी ऐकवी एक नारायण, तयाचे भजन चुकवू नका". परंतु आपली सगळी शक्ती आपण नकारात्मक विचार करून वाया घालवतो आणि दुःख भोगत असतो आपण प्रत्येक जीव हा प्रत्येक वस्तूमध्ये, प्रत्येक व्यक्तीमध्ये नकारात्मक गोष्टी शोधतो, ती गोष्ट चुकीची कशी आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न करतो. तर दुसऱ्यांमध्ये असणारे दोष सहजपणे दाखवण्याचा प्रयत्न करतो परंतु त्याचवेळी मी स्वतः परिपूर्ण आहे का? माझ्याजवळ सकारात्मक विचार आहेत का? माझ्या अंगी दुसऱ्यांना आनंद देण्याची क्षमता आहे का? याचा मात्र स्वतःला सोयीस्कर विसर पडतो आणि माणूस अहंकाराने वाया जातो म्हणून भगवंत कोण, अध्यात्म काय, जगत काय, मी कोण? याला सद्‌गुरूंच्या कृपेने उकल झाली तरच या मनुष्य देहाचे सार्थक होणार आहे. कारण या सृष्टीच्या चराचरात घडणारे प्रत्येक गोष्ट माणसाच्या जिव्हारी लागते आणि माणूस सुखदुःख भोगत राहतो. परंतु संतांनी सांगितलेला आहे की, पंचकोशाच्या उपाधीमध्ये अडकला म्हणून तो जीव झाला. नावारूपामध्ये अडकला म्हणून जगत तयार झालं. मायेची उपाधी घेतली म्हणून तो ईश्वर तयार झाला. जर हे सगळं बाजूला सारलं तर चराचरांमध्ये सामावलेलं ते ब्रह्म तत्त्वच आहे. त्याच्याशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट अस्तित्वात नाही आणि शाश्वतही नाही. कारण देह संबंधाने विचार जर केला तर देह क्षर असतो आणि स्वरूप संबंधाने जर विचार केला तर स्वरूप अक्षर असते म्हणून देह रूपाने जर पाहिलं तर जीव होतो आणि आत्मतत्त्वाच्या रूपाने पाहिलं तर तोच तो एक शिवच आहे. फक्त आपण जाणून घेतला पाहिजे समजून घेतला पाहिजे. हे सगळं करण्यासाठी मनुष्याच्या जीवनातील संचित कर्म, प्रारब्ध कर्म, क्रियामान कर्म यानुसार मनुष्याचा जीवन प्रवास चालत असतो आणि या प्रवासामध्ये मनुष्य अद्वेतापेक्षा द्वेताला अधिक महत्त्व देतो. कारण द्वैता शिवाय व्यवहार होत नाही आणि म्हणूनच व्यवहारात शब्द ज्ञान असणे गरजेचे आहे परंतु अद्वेत स्वरूप असणारा परमार्थ हा शब्दांच्या पलीकडे आहे. ज्याच्यामध्ये परिवर्तन होत नाही ते तत्व भगवंत आहे आणि ज्यामध्ये परिवर्तन होतं तो देह आहे म्हणून संतांनी तत्व हेच गुरु आहे आणि ते स्वयंभू साक्षात आहे असे म्हटले आहे. त्यासाठी हे जाणून घेण्यासाठी तत्व समजण्यासाठी तत्त्वज्ञान होण्यासाठी सद्‌गुरू कृपा असणं, मनुष्याच्या जीवनामध्ये सद्‌गुरु असणं, फार महत्त्वाचं आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात, 'सद्‌गुरु वाचोनी सापडेना सोय, धरावे ते पाय आधी आधी" पण ज्याच्याकडे नाम आहे तो तोच खरा भाग्यवान आहे कारण हे नामच फक्त अखंड आहे बाकी चराचरात चर्मदृष्टीने दिसणारी प्रत्येक गोष्ट ही खंडित होणारी आहे. म्हणून संतांनी सांगितलं देह हा काळाच्या अधीन आहे. कारण "देह तर काळाचा, धन कुबेराचे, येथे मनुष्याचे काय चाले " कारण देह संबंधाने विचार केला तर देहाला आकार, विकार, प्रकार, संबंध आणि संग्रह आहे. यामुळेच मनुष्य जीव सुखदुःख भोगत असतो तो एक तर षडगुणांमध्ये अडकतो किंवा षडविकारांमध्ये अडकतो षडगुण म्हणजेच ज्ञान, वैराग्य, लक्ष्मी, औदार्य, ऐश्वर्य, यश या षडगुणांमुळे मनुष्यप्राणी अहंकारी बनतो. मला कोणाची गरज नाही असे त्याचे वर्तन घडते आणि अंतिम समय मात्र एकटाच खितपत पडलेला दिसून येतो. षडविकार यांच्या अधिन असणारा माणूस हा नेहमी विकारी झाल्याचे आपणास दिसून येते. षड विकार यामध्ये काम, क्रोध, मोह, माया, मद, मस्तर इत्यादींचा समावेश होतो आणि या षडविकारांमुळेच मानवाचे वर्तन विकृत झाल्याचे दिसून येते. त्यासाठी संतांनी राज मार्ग दिलेला आहे. त्या राजमार्गावरून जर आपण चालत राहिलो तर सुखदुःख हे येणारे जाणारे आहे. याच्यामध्ये न अडकता स्वतःच विचाराने, कल्पनेने बांधून न घेता मनुष्यप्राणी स्वच्छंद आयुष्य जगू शकतो. आयुष्य सुंदर होण्यासाठी मानवाकडे चौदा विद्या व चौसष्ट कला असणं गरजेचं आहे परंतु आपल्याला चौदा विद्या व चौसष्ट कला कोणत्या याचाच भ्रम झालेला असतो त्यामुळे त्याचा आपल्याला अहंकार निर्माण होतो आणि आपली पावले नकारात्मक विचारांच्या मार्गाने चालू लागतात. कारण चौदा विद्या म्हणजेच पाच ज्ञानेन्द्रिय, पाच कर्म इंद्रिय, मन, बुद्धी, चित्त, अहंकार या चौदा विद्या ज्याला अवगत झाल्या तो सहजपणे हा भवसागर तरुण जाऊ शकतो. मनुष्य प्राणी सहज चालता चालता म्हणून जातो की, हे कलियुग आहे, इथे असेच होणार परंतु कलियुग म्हणजेच कौशल्यांचे युग. ज्याच्या अंगामध्ये कला आहेत तोच सहजपणे तरुन जाऊ शकतो यालाच संतांनी कलियुग असे म्हटलेले आहे. कारण ज्याचा स्वतःच्या इंद्रियांवर ताबा आहे तो सुखदुःखामध्ये अडकत नाही. कारण तो हे जाणतो की, गण म्हणजे इंद्रिय. आणि संपूर्ण गणांचा (इंद्रियांचा)अधिपती तो गणपती म्हणजेच तत्त्व होय. हे जाणून घेण्यासाठी प्राण शक्ती, क्रियाशक्ती, ज्ञान शक्ती, मनशक्ती ह्या एकवटल्या तरच खरा गणपती कोण याची ओळख होणार आहे. भगवंताची प्रत्येक जीवावर कृपा आहेच आहे, कारण प्रत्येक जीवाला स्मरण आणि विस्मरण ह्या दोन्ही गोष्टी भगवंताने दिलेले आहेत. जर आपल्याला स्मरण आणि विस्मरण नसते तर मनुष्य प्राणी जीवन जगू शकलाच नसता. तो सतत भूतकाळामध्ये अडकून राहिला असता आणि चिंतन करण्याच्या ऐवजी चिंता करत राहिला असता. म्हणून स्मरण विस्मरण ही भगवंताची प्रत्येक जीवाला मिळालेले फार मोठी देणगी आहे. म्हणून प्रत्येक जीवाने जो वंदनीय, पूजनीय, आदरणीय जो भगवंता आहे तत्वरूपाने जो चराचरामध्ये भरलेला आहे त्याला नमन केलं पाहिजे. त्याच ठिकाणी शरण गेलं पाहिजे, कारण तोच तो एक अनंत आहे. पण माणूस मात्र स्वतःच्या विचाराने कल्पनेने सुखदुःख भोगतो. तो यातून बाहेर पडायला मागत नाही. जसं समुद्रात गेल्यावर पाण्याच्या लाटांचा आनंद प्रत्येक जीव घेत असतो परंतु स्वतःच्या



संत साहित्यातील तत्वज्ञान : भाग-४

विचारांच्या लाटांमध्ये मात्र पूर्णपणे अडकून जातो. याला संत सांगतात, "ना बोलो फार, ना बैसो जनामध्ये, मोडतील भक्तीच्या वाटा, आणि कोपतील संतजन." म्हणून अधिक बोलण्यापेक्षा शांत राहण्यासाठी जास्त ताकद लागते, संयम लागतो, आणि विवेक लागतो. ज्याच्याकडे आनंद, संयम, विवेक ही त्रिसूत्री आहे तोच स्वतःला व स्वतःमध्ये असणाऱ्या भगवंताला जाणून घेऊ शकतो. समजून घेऊ शकतो आणि माझ्यातला भगवंत आणि समोरच्या व्यक्तीला भगवंत हा एकच आहे याची जेव्हा जाणीव होते त्यावेळी तो इतरत्र भगवंताची शोधाशोध करत नाही व नकारात्मक विचाराने स्वतःचे जीवन ग्रासून घेत नाही. कारण भगवंताने दगड माती यांना सत्ता दिली, वनस्पती झाडं वेली यांना सत्ता व जीवन दिले, तर पशु पक्षी प्राणी यांना सत्ता जीवन बुद्धी दिली, परंतु मनुष्य प्राण्याला मात्र सत्ता जीवन बुद्धी आणि विवेक दिला. म्हणूनच संपूर्ण चराचरसृष्टीमध्ये मनुष्य प्राणी हा भगवंताची मौल्यवान अशी रचना आहे. ज्या भगवंताने स्वतःला जाणून घेण्यासाठी, समजून घेण्यासाठी मनुष्य प्राण्यांची रचना केली तोच मनुष्य प्राणी त्या भगवंताला विसरला आणि अहंकाराच्या आणि उपाधीच्या मागे धावू लागला. जसं तूप हे दुधामध्येच आहे, फक्त रीतीने जावं लागतं. अगदी तद्वत्तच भगवंत सुद्धा चराचरसृष्टीमध्ये भरून उरलेला आहे परंतु रीतीने गेलं तरच तो भगवंत कळणार आहे. म्हणून स्वतःचा जीवन प्रवास सुखकर, आनंदी करण्यासाठी प्रत्येक जीवाने अहंकाराचा व उपाधीचा त्या त्या ठिकाणीच योग्य वापर केला तर मात्र मनुष्य जन्माचे सार्थक होणार आहे. ज्याला इतरांचं म्हणणं ऐकून घेता येतं, समाजामध्ये वावरताना संयमाने वागता येतं, ज्याचा विवेक सदैव जागृत असतो तो ह्या जगामध्ये अडकून राहत नाही. तो तत्त्वरूपाने जो एकच एक भगवंत भरून उरला आहे त्या भगवंताशी एकरूप होऊन जातो. कारण प्रत्येक जीव धडपडत असतो तो शेवटचा दिवस गोड होण्यासाठी. यासाठी संतही म्हणतात, "याची साठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिस गोड व्हावा". आणि जर असे होत नसेल तर मात्र आपण रीतीने न जाता आपला मार्ग कुठेतरी चुकला आहे याची जाणीव प्रत्येकाला व्हायला लागते, परंतु अंत समयी जर याची जाणीव होत असेल तर मात्र मनुष्य जन्म हा निरर्थक ठरतो. म्हणून प्रत्येक जीवाने जगाच्या बाजारात न अडकून राहता स्वतःच्या मोहाचा क्षय करून मोक्ष कसा प्राप्त होईल आणि स्वतःच्या आत मध्ये असणारा आनंद बाह्यांगाने कसा प्रगट होईल याचा विचार केला तर तो सुखकारक आहेच आहे. आपण नेहमी विचार करतो जगाला काय वाटेल, जग काय म्हणेल, जग काय विचार करेल यामुळे आपण सदैव ग्रासून जातो आणि जगाकडून कौतुकाची थाप मिळण्यासाठी चुकीच्या गोष्टी करून बसतो. परंतु आजपर्यंत कोणाची उपाधी टिकून राहिले व या जगाने कोणास चांगले म्हटले आहे. संत सहजपणे सांगून जातात, राम गेले, कृष्ण गेले त्याने काय जग ओस पडले. मग एवढं सगळं आपल्याला संतांनी विचारांचा सार काढून ठेवलेला असताना आपण करंट म्हणून जीवन का जगत आहोत? आपण या जगाच्या नादी लागून सुखदुःख का भोगत आहोत? कारण नाव आणि रूप काढलं तर जगत राहू शकत नाही.कारण देह पडला की त्याच क्षणी नाव जातं आणि बॉडी म्हटलं जातं मग ते नाव टिकवण्यासाठी आपण किती अट्टाहास करत असतो, हा विचार प्रत्येकाने करायला हवा. आपण नाव आणि रूपामध्ये अडकतो म्हणून हे जगत आपल्याला सत्य भासतं परंतु हे जगत मुळात शाश्वत नाही. ह्या जगाला चालवणारा जगाचा चालक-मालक पालक हा एकमेव शाश्वत आहे आणि तोच तो एक सत्य आहे. कारण जगत जर सत्य असत तर ते आपल्याला जागृती मध्ये दिसतं, भासतं परंतु स्वप्न अवस्थेत मात्र जगत आपल्याला दिसत नाही तेव्हा ते जाणवत देखील नाही. मग तेव्हा ते जगत कुठे गेलं? त्याचं काय झालं ? याचा विचार जर झाला तर आपण जगाच्या बाजारात अडकणार नाही. चर्मदृष्टीने पाहिलं तर जगत सत्यभासतं आणि तत्वदृष्टीने पाहिलं तर जगत मिथ्या जाणवतं म्हणून विचार करायचाच आहे तर  सकारात्मक का करू नये. एक चांगला विचार केला तर म्हणजेच जगत मिथ्या व भगवंत सत्य असे जर आपण दररोज म्हणत गेलो तर एक ना एक दिवस आपल्याला त्याची ओळख पटल्याशिवाय राहणार नाही. कारण मनुष्य प्राणी जन्माला एकटाच आला आहे आणि या इहलोकीची यात्रा संपवून प्रत्येक जीव देखील एकटाच पुढील प्रवासासाठी निघून जाणार आहे. मग आपण ह्या जीवन प्रवासामध्ये नकारात्मक गोष्टी, अहंकार उपाधी, मी आणि माझं याच्यामध्ये अडकून न राहता स्वतःमध्ये गर्क राहिलं तर आपल्याला स्वर्ग सुखाचा आनंद मिळणार आहे. कारण स्व मध्ये गर्क असणे म्हणजेच स्वर्ग होय आणि बाह्यंगांमध्ये गर्क असणे, जगतामध्ये गर्क असणे म्हणजेच नरक होय. मग आपण जीवन जगत असताना स्वर्गसुख भोगतो की नरक यातना भोगतो हे प्रत्येकाच्या विचारसरणीवर अवलंबून आहे. म्हणून ह्या जगाच्या बाजारामध्ये अडकून न घेता या जीवन  प्रवासामध्ये माझ्या जीवाची सुटका कशी होईल याचा विचार अधिक केला तर आनंद आहेच आहे. म्हणून संतही सांगतात 'जन हे दिल्या घेतल्याचे, अंतकाळीचे कोणी नाही' जर अंतिम समय जर सगळे आपल्या सोबत असते तर त्यांनी आपल्या सोबत इहलोकीची यात्रा संपून यावं. पण असं कोणी करत नाही. प्रत्येकाला आपले जीवन आणि जीव प्रिय असतो. आपल्याला विरक्ती येते, ती फक्त जोपर्यंत आपण स्मशानामध्ये आहोत तोपर्यंतच. एकदा का स्मशानभूमीतून बाहेर पडलो की आपली जग रहाटी लगेच सुरू होते. काही क्षणापूर्वी आपल्याला आपल्या मनामध्ये जी काही वैराग्याची भावना निर्माण झाली होती त्याचाही विसर पडून जातो. आणि पुन्हा ह्या मोहमायेच्या मनोराज्यामध्ये माणूस अडकून जातो. प्रत्येक जीवाचं अंतिम सत्य म्हणजे ही ईहलोकीची यात्रा संपणे. मग ही यात्रा संपवत असताना ती आनंददायी पद्धतीने जर संपवायची असेल तर त्यासाठी आयुष्यभर कर्म चांगली करायला हवीत. "जैसे कर्म केले, तसे फळाशी आले, उपजले मेले ऐसे किती," आपले कर्म चांगले असेल, आपले विचार चांगले असेल, मनामध्ये शांतता  असेल तर हे जीवन सुंदर आहेच आहे. आपण त्याच्यामध्ये अजून सुंदरता भरू शकतो. परंतु आपण जगाच्या चक्रव्ह्यूवमध्ये अडकतो आणि सुखदुःख भोगतो. जीवन यात्रा संपत असताना मग आपल्याला जाणवतं की हे जन दिल्या घेतल्याचे अंतकाळाचे कोणी नाही पण याची जाणीव जर आपल्याला जीवन प्रवासाच्या सुरुवातीला जर झाली तर मात्र अपेक्षांमुळे होणारा त्रास आणि उपेक्षा मानवी जीवाच्या वाट्याला येणार नाही. तो स्वतःच आनंद स्वरूप आहे त्यामुळे स्वतःच्या सुखदुःखांचा शिल्पकार सुद्धा मानव स्वतःच असतो. म्हणून ज्यांना मी माझं माझं म्हणतो ते, हे जीवन यात्रा संपवताना माझ्यासोबत का येत नाहीत?  याचा प्रश्न पडला आणि त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला, तर आपण ह्या जगाच्या बाजारात अडकणार नाही. कारण जे सुख मिळवण्यासाठी माणूस आयुष्यभर धडपडतो. घर गाडी बंगला पैसा उपाधी अहंकार यांच्या मागे आयुष्यभर धावतो. परंतु यातलं एकही जीवन प्रवास संपत असताना सोबत येत नाही. मग सोबत येतो तो तुमच्या माझ्यामध्ये असणारा भगवंत आणि आपण आयुष्यभर त्यालाच विसरतो. म्हणून संत सांगतात 'विसरला त्याची थोर झाली हानी, पचतील खाणी चौऱ्यांशीच्या.  आपण ह्या जगाचे काहीतरी देणं लागतो, या भावनेने जीवन जगत असताना फक्त आपल्या अंतर्मनात असणारा आनंदच आपण वाटू शकतो आणि तोच स्वतःच्या इतरांच्या आयुष्यामध्ये सुगंध पसरवू शकतो. म्हणून सुखाच्या मागे न धावता सुखदुःखामध्ये न अडकता आनंद स्वरूप असणारा तत्व यामध्ये आपण लीन व्हायला शिकलं पाहिजे. कारण सुख असो वा दुःख 'ये भी चला जायेगा' याची आपल्याला जाणीव असली पाहिजे. म्हणजेच आपण सदैव सुखरूप राहू व जीवनरुपी नौका सहजपणे, आनंदाने पार पडेल. म्हणून जीवन प्रवासाच्या सुरुवातीलाच आपल्याला जन हे दिल्या घेतल्याचे अंतकाळाचे कोणी नाही याची जाणीव असायला हवी.

# फक्त पाच वर्षे मला द्या.... पंकजाताई असं का म्हणाल्या ?

आधुनिक केसरी

**लोकसभेची उमेदवारी मिळवण्यासाठी भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथ मुंडे ह्या कुणाकडेही गेल्या नाहीत. पक्षानं आदेश दिला कार्यकर्ता म्हणुन त्याचं पालन करताना निवडणुक लढवण्याची वेळ त्यांच्यावर आली हे अगदी खरं म्हणावे लागेल. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जाहिर सभेतुन त्यांनी आपली भुमिका स्पष्ट केली. राजकिय भविष्य सांगताना मला फक्त पाच वर्षे संधी द्या, मी पुन्हा तुमच्या दारात मते मागायला येणार नाही. असं सांगायला त्या मागे राहिल्या नाहीत, पण नेमकं पंकजाताई असं का बरं म्हणाल्या? कारण तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधान पदावर नरेंद्र मोदी निश्चित बसणार आहेत.**

त्यांच्यासमोर खासदार नव्हे तर पुढे संधी पंकजाताई दिसणार आहेत, त्यांच्या नेतृत्वातली क्षमता आणि विकासाची भुक बेटा पंकजा या शब्दांत



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

असलेला राजकिय गोडवा आणि वजन त्याचा फायदा बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांना घ्यायचा आहे. फक्त पाच वर्षात जिल्ह्याचा चेहरामोहरा आपण बदलु शकतो याची त्यांना खात्री असुन कॅन्सरसारखं हॉस्पीटल आणि एखादा मोठा उद्योग शिवाय गोदावरी खोऱ्यातले पाणी हे करण्यासाठीच फक्त पाच वर्षे त्यांनी मागितले. वास्तविक पहाता राजकारणात भरल्या सभेत असं बोलण्याची कुणी हिंमत करत नाहीत. मात्र स्पष्ट बोलुन वस्तुस्थितीच्या आधारावर राजकारण करणं हा मुळात स्वभाव त्यांचा असल्याने मागितलेली पाच वर्षे कारणी लावण्यासाठी निश्चित कारणीभुत ठरणार आणि ते लोकांना देखील पटलं हे मात्र नक्की. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर पंकजाताईनं जाहिर सभेत मतदार जनतेसमोर संवाद साधला. लोकसभा निवडणुक लढवण्यामागची भुमिका स्पष्ट करताना त्यांनी अनेक गोष्टीचा ऊहापोह जाहिरपणे केला. राजकारणात काम करणारा पुढारी जनतेच्या समोर सर्व गोष्टी सत्य बोलतोच असं नव्हे. मात्र त्याला अपवाद हे नेतृत्व असुन सकारात्मक आणि सत्यपणाची कास त्यांनी कधीच सोडली नाही. मुळात बीड जिल्ह्यातील माय-बाप जनतेच्या प्रेमावर त्यांना वाटणारा उपकार भाव लक्षात घ्यायला हवा. स्व. मुंडे साहेबांच्यानंतर लोकांनी आम्हाला लावलेला जीव त्यातुन मिळालेली प्रतिष्ठा हे खरं राजकिय प्रोटीन त्या समजतात. म्हणुनच या जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता माझी आणि मी जनतेची हा त्यांचा ऋणानुबंध बरंच काही सांगुन जातो. वीस वर्षापासुन जिल्ह्याचं राजकारण करताना त्यांनी जातपात धर्म ही चौकट कधीच पाहिली नाही. माझा जिल्हा-माझी माणसं प्रामाणिक तत्वाचा स्विकार करत जनतेची सेवा केली. लोकांनी त्यांचं काम पाहिलं. पालक मंत्री पदाच्या काळात झालेला विकास आजवरच्या इतिहासात कुठल्याही नेतृत्वाला करता आला नाही. तेवढा विकास निधी त्यांनी मंत्रीपदाच्या काळात आपल्या जिल्ह्यात आणुन चेहरामोहरा बदलण्याचं काम केलं. एक गोष्ट जवळुन पाहिल्यानंतर त्यांना विकासाची भुक असुन दिव्य दृष्टी आणि कुठलीही योजना खेचून आणण्याची क्षमता त्यांच्या नेतृत्वात लक्षात येते. त्यांचं राजकारण स्वच्छ आणि प्रामाणिक सत्यपणाचे असल्याने विविध राजकिय पक्षात त्यांचे असलेले संबंध आपुलकीचे हे मात्र नक्की. आजही त्या खासदार व्हाव्यात अशा भावना केवळ महायुतीच्या नव्हे तर विरोधकांच्या देखील बेंबीच्या देठापासुन आहे. कदाचित परिणाम निकालाअंती जाणवतील. नव्या पिढीने पालकमंत्री पदाचा काळ जवळुन पाहिला. खरंच सांगायचं की एक आदर्श पालकमंत्री महिला नेतृत्व कसं असतं? आणि पालकत्वाची भुमिका ज्यात मातृत्व दडलेलं त्या दृष्टीने माय-बाप जनतेची केलेली. सेवा. २०१४ ते २०१९ ही त्यांची कारकीर्द. जरा पानं चाळुन पाहिली तर खरंच या माऊलीने कुणालाही कसल्याही प्रकारचा त्रास दिला नाही. विरोधकांची मनं कामातुन जिंकली. उदाहरण सांगायचं झालं तर गेवराईत अमरसिंह पंडित, आष्टीत बाळासाहेब आजबे काका, प्रकाशदादा सोळुंके ही सारी मंडळी तनमन धनातुन काम करण्यामागचे खरं कारणं पंकजाताईचं राजकारण मुळात त्यांना भावलेलं आहे. जातीपातीचं राजकारण या माऊलीनं कधी केलेलंच नाही. आपल्या पित्यानं जे स्वप्न पाहिलं ते म्हणजे समाजातील वंचित, उपेक्षित, दीनदलित, गोरगरिब, शेतकरी, कष्टकरी या वर्गाचा आवाज बनुन राजकारणात काम केलं पाहिजे. अशा अठरापगड जातीधर्माच्या लोकांना कल्याणकारी उपक्रमाच्या प्रवाहात आणलं पाहिजे. तेच स्वप्न साहेबांच्या जाण्यानंतर पुर्ण करण्याचा संकल्प साकार करण्याचं काम त्यांनी केलं. या जिल्ह्यातील असं एकही गाव नाही जिथे पंकजाताईच्या माध्यमातुन काम आलं नाही असं दिसणार नाही. गाव तिथे योजना ग्रामपंचायत कुणाची आहे? तांडी, वस्ती कुणाची आहेत?, शहराचा नगराध्यक्ष कोण आहे?, जिल्हा परिषद, पंचायत समिती कुणाच्या ताब्यात आहेत? या साऱ्या गोष्टी माऊलींनी कधी पाहिल्याच नाहीत. म्हणुनच की काय लोक या नेतृत्वावर खरंच मनातुन प्रेम करतात. प्रचारात विरोधक वेगवेगळ्या अफवा पसरवुन राजकिय फायदा उठवण्याचा उद्योग करत असले तरी पंकजाताईच्या बाबतीत सर्व जातीपातीचे लोक पुढे आलेले दिसणं याचाच अर्थ हे नेतृत्व सर्वसमावेशक असणं याची प्रचिती याचि देहि, याचि डोळा येवुन जाते. या जिल्ह्यात लोकांच्या प्रेमापोटी त्यांचं मन इथं रमलं. अनेक स्वप्न आपल्या जिल्ह्याविषयी त्यांचे असल्याने काही तरी मला करून दाखवायचं आहेच ही भुक त्यांना प्रचंड लागलेली वाटते. जाहिर भाषणात त्यांनी फक्त पाच वर्षे संधी मागितली. वास्तविक पहाता निवडणुक लढवणारा कुठलाही उमेदवार पाच वर्षाची भाषा करत नाही. जी भाषा पंकजाताईंनी बोलुन दाखविली. एवढ्यावरही न थांबता मी पुन्हा माझ्यासाठी मतदान मागणार नाही असं सांगायला त्या विसरल्या नाहीत. याचा अर्थ एवढाच आहे की उद्या देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आणि मग त्यांच्यासमोर बसण्याची संधी ज्याचा फायदा आपल्या जिल्ह्यासाठी घेण्याची दिव्यदृष्टी त्यांच्याकडे आहे. पाच वर्षे त्यांनी मागणं म्हणजे स्वतःच्या राजकिय हितासाठी असं म्हणाल तर अत्यंत चुकच म्हणावे. कारण पाच वर्षे त्यांची सुवर्णकाळाची निश्चित राहतील. त्यांना आपल्या जिल्ह्यात एखादा मोठा उद्योग ज्यामुळे नाही म्हटलं तरी दहा हजार तरूणांना रोजगार मिळेल. आर्थिक सुबत्ता वाढेल आणि गोरगरिब लोकांच्यासाठी कॅन्सरसारखं अद्ययावत हॉस्पीटल उभा करण्याचा त्यांचा विचार आहे. गोदावरी खोऱ्यातल्या तुटीच्या १६५ टीएमसी पाणी मराठवाड्यात खेचुन आणण्यासाठी निश्चितच केंद्र सरकारकडून त्या करूनच घेणार. अशा अनेक योजना केंद्र सरकारच्या आपल्या जिल्ह्यासाठी खेचुन आणण्याची क्षमता त्यांच्यात आहे. मतदारांच्या सोबत कराराची भाषा कुणी करत नाही. यांनी मला केवळ पाच वर्षे संधी द्या हात जोडून विनंती केली. याकडे आपल्या जिल्ह्याच्या भविष्याचं आणि भवितव्याचा विचार केला तर नक्कीच खरं म्हणावे लागेल. कारण २०१४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका फोनवर नगर-बीड- परळी रेल्वे प्रश्नासाठी स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त २८०० कोटी रूपायांची आर्थिक तरतुद करत रेल्वे अधिकाऱ्यांना आदेश देवुन कामाला मंजुरी दिली होती. कसं पाहणार तुम्ही या प्रश्नाकडे? इतरांना शक्य झालं असतं का? येथे पाहिजे जातीचे येरा गबाळ्याचे काम नोहे?,



सारासार विचार बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेनं करायला हवा. हा पर्वकाळ पुन्हा कधीच येणार नाही. एका महिला नेतृत्वाने लक्ष्मीच्या पावले आपल्या जिल्ह्यात विकासाची लक्ष्मी खेचुन आणण्यासाठी मागितलेली संधी ज्याचा विचार प्रत्येकाने केला तर आगामी पाच वर्षात आपला बीड जिल्हा पश्चिम महाराष्ट्रातील एक जिल्ह्यासारखा ओळखल्या जाईल. केवळ विकास नव्हे तर लोकांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवण्याचं सामर्थ्य या नेतृत्वात आहे. म्हणुन त्यांनी जाहिर सभेत मागितलेले केवळ पाच वर्षे या साऱ्या पार्श्वभुमीवर महत्वाचे वाटतात.



# पहूरला येथे फुले विद्यालयात 'इंग्लिश डे'; मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात दि .२५/४/२४ रोजी 'इंग्लिश डे' मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापीका व्ही .व्ही. घोंगडे या होत्या. वीस विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे इंग्रजीतून संपूर्ण कार्यक्रमाचे सादरीकरण केले. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत गेल्या दोन वर्षांपासून राज्यभरात प्रादेशिक विदया प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शाळांमध्ये चेस प्रकल्प राबविण्यात येत आहे.थोर इंग्रजी नाटककार विल्यम शेक्सपियर यांची जयंती व पुण्यतिथी इंग्लिश डे म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.त्यानिम्मत शाळेत पोस्टर प्रेझेंटेशन उपक्रम राबविण्यात आला.या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील इंग्रजी भाषेद्दल आत्मविश्वास वाढत आहे. दर शनिवारी इंग्रजी दिवस साजरा केल्याने मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी इंग्रजी बोलू लागले आहेत. काल झालेल्या कार्यक्रमात श्वेता सोनवणे, अमृता सोनवणे, प्रेरणा भोंडे, आर्शिया शेख, पल्लवी घाटे, प्रथमेश लहासे, वेदांत क्षीरसागर, देवेश सोनवणे, कुश उभाळे, पवन बावस्कर, भुषण मगरे, सौरभ द्राक्षे, प्रथमेश क्षीरसागर, आकांक्षा जाथव, दिक्षा खरे, अनिकेत जाथव, जीवन बनकर आदी विद्यार्थ्यांनी गोष्ट, सुविचार, दिनविशेष, प्रेरणा गीत, स्वागत गीत, शब्दांची जादू, संभाषण, मुलाखत आदी उपक्रम सादर केले .
यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती व्ही.व्ही. घोंगडे विदयार्थ्यांचे कौतूक केले. त्यांचे आर. जे. चौधरी यांनी स्वागत केले. बी.एन जाधव , एच .बी. राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख शंकर भामेरे यांचा राज्यस्तरीय चेस प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन पियुष मगरे याने केले तर प्रथमेश लहासे याने आभार मानले.

# पेराल तसे उगवेल

आधुनिक केसरी

जी बियाणे आपण जमिनीत पेरू तीच बिजं वर येतात. आंब्याची कोय जमिनीत लावली आणि बाभळीचे

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 46

झाड उगवून आले असं होत नाही. किंवा सरकीचे रोप लावले आणि वांगे येण्याची वाट पाहू लागलो तर कसं शक्य आहे?
आयुष्यभर जरी सरकीला वांगी येण्याची वाट बघितली तरी वांगी येणार नाही. सरकीला कपासच येणार. तसेच आपल्या आयुष्याचं आहे.
आपण जे पेरू तेच उगवेल. चांगलं पेरलं तर आपल्या जीवनात काहीतरी चांगलेच घडेल. "शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी ".आई वडील संस्कारी असतील तर मुलं सुसंस्कारी होतील.
अपवादही असेल.. आयुष्यभर चांगले विचार पेरत राहिलात, दुसऱ्यांना मान सन्मान दिलात, प्रेम माया जिव्हाळा दिला तर आपल्यालाही या गोष्टी आपोआप मिळतील. कधी आपल्यावर नाही तर आपल्या विचारावर प्रेम करणारी माणसं भेटतील आणि विचारावर, स्वभावावर ,वागण्या बोलण्यावरच प्रेम करणारी माणसं भेटली पाहिजे. कारण तीच माणसं कायम टिकतात. सौंदर्यावर प्रेम करणारी माणसं फार काळ एकमेकांच्या आयुष्यात टिकत नाही आणि नकोत अशी वृत्ती असलेली माणसं.
सौंदर्यावर सुद्धा प्रेम करावे. पण कोणतं सौंदर्य?? निसर्ग सौंदर्य, सागर सौंदर्य, डोंगर, पक्षी, हिरवळ, झाडे, कला, लेखणी, माणुसकी, प्रेम, नातं यांच्यातलं निखालस सौंदर्य आपल्याला ओळखता आलं पाहिजे. या सौंदर्यावर फक्त प्रेमच नाही करायचं तर त्यांना जपलं पण पाहिजे. चांगल्या विचारांची पेरणी अवश्य करावी. त्यातून मनाला होणारा आनंद शाश्वत असतो. जितकं चांगलं पेरत राहू तितकं खत पाणी न घालता ते उगवत राहील. चांगल्या आचार विचारांचा वटवृक्ष वाढवूया. चांगल्या माणसाला त्रास होतो. मात्र दगड नेहमी आंब्यालाच मारतात .बाभळीला नाही.. केळीचे झाड बाभळी शेजारी राहिले तर त्याची पाने फाटणारच. तेव्हा संगत बदला .विचार चांगले ठेवूया.. आंब्या इतकी सहनशक्ती ठेवू. दगड मारणारालाच आंबा मिळतो. न मारणाराला नाही. पण सात्विक आनंद न मिळणाऱ्यालाच होतो. कारण त्याने हिंसा केलेली नसते. कोणावरही प्रहार केलेला नसतो. आपल्या मधाळ बोलल्याने जग जिंकावे. माझ्या बोलल्याने त्याच्या नाकातील केस जळाले. अशी वृत्ती ठेवू नका. इतकं जहाल बोलू नका. इतरांच्या शरीरात दाह होईल असं.. " जैसी करणी वैसी भरणी".

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

आपल्या हिंदू संस्कृतीत अनेक सणं,उत्सव उत्साहात साजरे केले जातात. चैत्र महिना हा मराठी वर्षातील पाहिला महिना. उन्हाळ्याची सुरुवात होते आहे याची जाणीव करून देणारा महिना. या महिन्यात कैऱ्या छान येतात. म्हणूनच तो सुसह्य व्हावा यासाठी आपल्या पूर्वजानी सर्वांनी उन्हाळ्याचे सुद्धा उत्साहात स्वागत करावे म्हणुन चैत्रगौरी बसवून म्हणजेच तिला माहेरवाशीण मानून तिला उन्हाळ्याचा त्रास होऊ नये म्हणून सर्व थंड पदार्थ, फराळाचे पदार्थ, गोड खीर, थंडगार आंबटगोड चवीचे कैरीचे पन्हे, तिखट, खारट,आंबट, गोड, तुरट, कडवट अशा सहा चवींनी म्हणजेच षड्रसांनी आपले शरीर निरोगी राहावे म्हणून असे कडूनिंबाची चिंच गुळाची चटणी, कैरीची डाळ,म्हणजेच आंबेडाळ, काकडी,बत्तासे, असे पदार्थ बनवावेत आणि खावेत अशी प्रथा पाडली आहे. खरबूज, टरबूज अशी रसदार फळेसुद्धा खास आणली जातात. अंगाला थंड चंदन उटी लावतात, गुलाब, मोगऱ्यांची सुगंधी फुले आणून हार, गजरे बनवून घालतात. वाळा थंड आणि सुगंधी असतो म्हणून त्याचे पाणी पितात. त्यामुळे आपण आता उन्हाळ्याशी सामना करण्यासाठी जणू आपले शरीर तसे तयार करतो. तर मग आज आपण खास सर्वांची आवडती चटपटीत आंबेडाळ. .कैरीची डाळ बनवू या .

**साहित्य :** 1 वाटी चण्याची म्हणजेच हरभऱ्याची डाळ , 4..5 हिरव्या मिरच्या , 1 वाटी कैरीचा खिस , पाव वाटी साखर , 2 मेथी मिरच्या म्हणजेच तळणीच्या सांडगी मिरच्या , अर्धी वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर , कधीपत्ता , फोडणी साठी तेल आणि फोडणीचे साहित्य , 1..2 लाल वाळलेल्या मिरच्या , मोहरी ,जिरे ,हिंग ,हळद , चवीनुसार मिठ. **कृती :** सर्वांत आधी चण्याची डाळ पाण्याने स्वच्छ धुवून 5..7 तास भरपूर पाण्यात मोठ्या भांड्यात भिजत ठेवावी . कारण ही डाळ भरपूर पाणी शोषते आणि फुगते . मग ती तारेच्या चाळणीत उपसून काढून पाणी निथळण्यासाठी ठेवावी . कैरी धुवून, साल काढून ती खिसून घ्यावी . पाणी निथळल्यावर प्रथम मिक्सरच्या भांड्यात मिरच्यांचे तुकडे , निम्मी कैरी , साखर , थोडीशी कोथिंबीर , डाळ घालून थोडीशी जाडसर वाटून घ्यावी . मग ती बाऊल मध्ये काढून त्यात चवीनुसार मीठ घालावे . सर्व व्यवस्थित मिक्स करावे . आता त्यात राहिलेली कैरी ,कोथिंबीर घालावी. आता गॅसवर छोटे कढले ठेवून त्यात तेल गरम करण्यास ठेवावे . मध्यम गरम झाले की त्यात तळणीची मेथी मिरची तळून बाजूला काढून ठेवावी . मग त्यात मोहरी ,जिरे कधीपत्ता घालावा . मग गॅस एकदम बारीक करून हिंग घालावा व गॅस बंद करून मग हळद घालावी . नाहीतर ती करपून रंग काळपट येतो . मग लाल मिरच्या घालाव्यात . ही थोडी थंड झाली की लाल मिरच्या बाजुला काढुन मग फोडणी कैरीच्या डाळीवर घालावी . शेवटी थंड झालेली मेथी मिरची , फोडणीतील कढीपत्त्याची पाने कुस्करून घालावी .म्हणजे त्याचा स्वाद खूपच सुरेख येतो . मग बाकीची कोथिंबीर घालून डाळ व्यवस्थित मिक्स करावी . तिखट ,मीठ, आंबटपणा चव घेऊन लागेल तसे कमी जास्त पाहून घालू शकतो आता आपली पिवळी, पोपटी, सुरेख अशी कैरीची डाळ छान बाऊल मध्ये काढावी. वरून सजावटीसाठी कोथिंबीर आणि लाल मिरच्या ठेवून तयार केलेली खाण्यासाठी एकदम रेडी आहे.

**वैशिष्टय:** कोकणात किंवा बरेचजण या डाळीत ओला नारळ खवून घालतात. त्यामुळे चव खूप छान येते. ज्यांना आवडत असेल त्यांनी जरूर घालावा.यातील चण्याच्या डाळीतून आपल्याला आवश्यक असणारी प्राथीने मिळतात. कैरीतून सी जीवनसत्व, फायबर्स मिळतात. त्यातील साखरेची गोडी, मिठाचा खारटपणा, मेथी मिरचीचा कडवटपणा, हिंगाचा, कढीपत्त्याचा तुरटपणा, कैरीचा आंबटपणा, मिरचीचा तिखटपणा असे सहाही रस आपल्याला मिळतात. नारळ, तेल यातून स्निग्धता सुद्धा मिळते . शिवाय सर्वांत महत्वाचे म्हणजे टेस्टी तर इतकी की पुन्हा पुन्हा मागून खावी . मग अशी कैरीची डाळ बनवणार ना लगेच.

# लोककथा नामशेष होण्याच्या मार्गावर...



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**अनादि काळापासून लोककथा या मौखिक पद्धतीने चालत आलेल्या आहेत. मनोरंजनासाठी कथा सांगून त्यातून प्रबोधन केलं जात होते, हा कथेचे मुख्य हेतू होता. सायंकाळी नातवंडासोबत आजी कथा सांगत अंगणात बसत असे. चार लोक एकत्रित जमले की करमणुकीसाठी एखादी विनोदी कथा, शौर्य कथा, रूपक कथा सांगून मनोरंजन करण्याची पद्धत होती. चावडीवर, चौकात, पारावर, प्राचीन काळी लोक एकत्रित जमायचे, आपल्या अनुभवा नुसार वेगवेगळ्या कथा सांगायचे.त्या कथेतून माणूस आपल्या कडून झालेल्या चुका सोडवून चांगल्या पद्धतीने स्वाभिमानाने वागण्याचा प्रयत्न करत असे, परंतु अलीकडे आज समाजामध्ये कथा सांगण्याची प्रथा अतिशय कमी झाली आहे.**

एकत्रित कुटुंब पद्धतीमध्ये आजी -आजोबा आई- वडील,मुले-मुली त्यांच्या सोबत राहत असत. सर्व नातवंडाला एकत्रित घेऊन आजी -आजोबा मनोरंजन म्हणून कथा सांगत असत. परंतु आता काळ बदलला, घरात टी,व्ही, मोबाईल आला. एकत्रित कुटुंब पद्धती विभक्त झाली. लहान मुलांना तीन वर्षापासून बालवाडीत पाठवत असल्याने ताळमेळ बसेनाशी झाला.


नातवंडापासून आजी -आजोबा दूर गेले.आणि कथा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. असे जरी म्हटलं तरी काही वावगे ठरणार नाही. एका बाजूने आपण आधुनिकतेच्या गप्पा मारत आहोत. संस्कार, संस्कृती म्हणत आहोत हे संस्कार आकाशातून पडत नसतात. प्रत्येक मानवाला ज्येष्ठाकडून संस्कार घ्यावे लागतात.त्याची किंमत मोजावी लागते.अनुभवासारखा गुरु नाही असे आपण म्हणतो. प्राचीन काळातील कथा या संसारावर, राजकारणावर, देवावर, दैवतावर, विवाह समारंभावर, जत्रा -यात्रेवर, अवलंबून होत्या. काही जातक कथा सांगितल्या जात होत्या. इसापनीतीच्या कथेतून मानवाचे प्रबोधन आणि मनोरंजन होते. हे या ठिकाणी आपल्याला सांगायचं आहे. मराठी लोक साहित्याच्या अभ्यासामध्ये अनेक साहित्यिकांनी लोककथांचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार त्या कथा सांगितल्या जातात. कथेला कहाणी किंवा गोष्ट असे ही म्हणतात. लोक जीवनामध्ये दैवत कथा हा एक भाग आहे. देव, देवता, गंधर्व, यक्ष यांच्याशी संबंधित या दैवत कथा असतात. जुन्या काळामध्ये राजे, राजवाडे यांच्या कथा आपल्याला प्रेरणा देतात. काही दंतकथा, अद्भुत कथा, परिकथा, अनुभव कथा , शूरावीरांच्या कथा, बोधकथा, हास्य कथा, असे नाना प्रकारच्या कथा आहेत. म्हणून आपण



कथेपासून दूर जात आहोत. असे मला वाटते. समाजाच्या भावभावना अशा- आकांक्षा, सुख- दुख कुटुंबातील परस्पर संबंध, भावजीवन हे सगळं आपल्याला लोक कथेतून सांगता येते. काही वेळेस काल्पनिक कथा सांगितल्या जातात. त्यामुळे समाजामध्ये परिवर्तन होते. लोक कथेची भाषा हृदयाला भिडणारी जिवंत भाषा असते. छोटी छोटी वाक्य तयार करून कथा सांगितल्या जातात. कथेमध्ये हास्य ,विनोद, मार्मिकता, गंभीरता सर्व काही येते म्हणून या लोककथा नामशेष होऊ देऊ नयेत. मराठी भाषेमधून कथा आपण शिकतो. फक्त आता नवीन मुलांना कथा माहित नाहीत. कथा कशी तयार करावी हे अभ्यासक्रमांमधून पूर्वी जास्त शिकवल्या जायाचे,त्याला गुण मिळायचे,परंतु आता काळाच्या बदलानुसार कथा कमी लिहिल्या जात आहेत.कथालेखन हा एक महत्त्वाचा भाग होता. म्हणून सम्राट अकबर व बिरबलाच्या चातुर्य कथा ऐकल्यानंतर स्फूर्ती येते. एखादा राजा भोज असेल, तेनाली रामन असेल यांच्या कथा अनेक जणांनी ऐकलेल्या आहेत. हजरजबाबीपणा, संभाषण चातुर्य, व्यवहारी ज्ञान, कुशलता हे सर्व कथेशी संबंधित असतात. बरेच जण म्हणतात माझ्या जीवनाची कथा काय सांगू? मी फक्त गावाकडून अंगावरल्या कपड्याने शहरात आलो इथून सुरुवात करतात. म्हणून कथा या लोप पावू नयेत. कथेचा विस्तार व्हावा, कथेचे जतन केले जावे, कथा हा मराठी साहित्यातला फार मोठा अनमोल ठेवा आहे. कथा या भूतकाळात घडलेल्या असतात. समाजातील व्यवहारा वर त्या अवलंबून असतात. एखाद्या ठिकाणचा समाज गरीब असेल तर तेथील कथा तयार होते. काही कथा लहान दिसत असल्या तरी त्यातील घटना, प्रसंग , पात्र याचे चित्र नेमके पणाने वर्णन केलेले असते. रामायण आणि महाभारता तील कथा आपल्याला माहिती आहेत. कथेतून माणसाचे स्वभाव ओळखू येतात. काही प्राणी व प्रणय कथा असतात नेहमी आपण ससा आणि कासवांची कथा ऐकतो, या कथेतून ससाला अहंकार निर्माण होतो आणि त्याचा शेवट पराभूत मध्ये होतो, काळानुसार बदलत चला. परंतु कथासुद्धा आपल्या ऐकण्यासाठी शिल्लक राहिल्या पाहिजेत. त्यासाठी तिचे जतन व संवर्धन केले पाहिजे. म्हणून देशोदेशीच्या कथा ऐकून समाज प्रगल्भ होतो. समाजाची स्वभाव वैशिष्ट्ये कळतात. म्हणूनच कथा अतिशय महत्त्वाच्या असतात. अनुभवी व्यक्ती कथा फार सुंदर रंगवून सांगतात म्हणून मला या लेखातून हे सांगायचे आहे .कथांचे सर्व मराठी भाषकांनी जतन व संवर्धन करावे. मराठी ही अभिजात भाषा आहे. तिच्या अनेक बोलीभाषा आहेत.

प्रत्येकाच्या बोलीभाषेतून ती कथा आपण घ्यावी, ग्रामीण बोली भाषेचा गोडवा कमी होता कामा नये. ती कथा त्याच रंगाढंगात शिवी हासडून दिली तरच तिची रंगत आणि गंमत वाढते आणि माणूस जागा राहून ती श्रवण करतो. कथा हा मराठी भाषेचा अनमोल ठेवा आहे. त्यामुळे आपली कथा संस्कार देते. काळाच्या ओघात कथा ऐकण्याची सवय आता काही लोकांना राहिली नाही. इतरांची कथा सुद्धा काही जणांना ऐकू वाटत नाही, असे जर म्हणून आपण कथेकडे दुर्लक्ष केलं तर कथा या खरोखर नामशेष होतील. पुढील पिढीला कथा काय ? आहेत हे सुद्धा समजणार नाही म्हणून सर्व मराठी भाषकांनी मराठी शिकवणाऱ्या अध्यापकांनी विद्यापीठात चर्चासत्रे घेऊन कथेचे जतन व संवर्धन करावे. दरवर्षी भरल्या जाणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून कथा या विषयावर चर्चा करावी. दर्जेदार कथासंग्रहांना पुरस्कार द्यावेत त्यामुळे कथा लिहिण्यासाठी साहित्यिकांना बळ मिळेल आणि कथेचे जतन ही होईल. तुमच्या जीवनाची कथा सांगायची असेल तर कथासंग्रह तुम्ही लिहायला सुरुवात करा, ही अपेक्षा..

# विद्यापीठातील पीएच.डी. संशोधन..काळजीचा विषय



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**सध्या विद्यापीठातील पी एच डी संशोधनाचा दर्जा अन् त्या संदर्भात होणारा भ्रष्टाचार चर्चेचा विषय झाला आहे.अर्थात यात नवे काहीच नाही.यापूर्वी देखील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्राध्यापकाकडून होणारी छळवणूक,त्यासाठी करावी लागणारी आर्थिक देवघेव पुराव्यासह पुढे आली आहे.तरीही हे प्रकार कमी होत नाहीत.याचे कारण संबंधितांना कायद्याचा धाक नाही.अनेकांची चौकशी होते.पण कुणालाही लक्षात राहील अशी शिक्षा होत नाही. शिक्षक,डॉकटर या पेशा कडे पावित्र्याच्या दृष्टीने बघितले जाते.पण संबंधितांना त्याची लाज वाटत नाही हे दुर्दैव. गेल्या काही वर्षात पी एच डी संबंधीचे नियम बरेच शिथिल झाले आहेत. यू जी सी फक्त मार्ग दर्शक तत्वे सांगते.**

पण प्रत्येक विद्यापीठाची मंडळे,प्राधिकरणे त्या दुधात पाणी टाकून सोयी साठी बदल करतात.यासाठी विद्यार्थी नेते,प्राध्यापक,विविध मंडळाचे निर्णय घेणारे राजकारणी सभासद या सर्वांचा सहभाग असतो.गेल्या काही वर्षातील,दशकातील पी एच डी संशोधनाच्या दर्जाचा सखोल अभ्यास केला, एकेडेमिक ऑडिट केले तर सगळ्या गोष्टी चव्हाट्यावर येतील.ज्यांनी पी एच डी केली आहे त्यांनी स्वतःलाच एक प्रश्न विचारावा..” आपल्या संशोधनाचा कुणी,कुठे,कसा,किती उपयोग केला आहे ?”.(फक्त संदर्भ म्हणून नव्हे..समाज,जीवनमान सुधारण्यासाठी प्रत्यक्ष उपयोग).या प्रश्नाच्या उत्तरात सारे काही स्पष्ट होईल. नव्वद टक्के प्रबंध हे फक्त ग्रंथालयात,परीक्षा विभागात धूळ खात पडण्या इतके सुमार दर्जाचे असतात.ज्यांना हे विधान अतिशयोक्ती चे वाटेल त्यांनी आपली गणना उरलेल्या दहा टक्केत करावी! खरे तर संशोधनाचा उपयोग समाजाच्या कुठल्या तरी अंगासाठी, जीवनमान सुधारण्यासाठी व्हायलाच हवा. संशोधनामुळे नवा विचार,नवी संकल्पना, नवी वैज्ञानिक संज्ञा, नवे सोपे तंत्रज्ञान जगा पुढे येणे अपेक्षित असते.पण कुठल्याच क्षेत्रात आपल्याकडे हे घडताना दिसत नाही.कसातरी विषय निवडायचा,कसातरी डेटा गोळा करायचा,कसे तरी प्रयोग करायचे,कसेतरी निष्कर्ष काढायचे,काहीतरी लिहायचे असे सुमार दर्जाच्या प्रबंधाचे स्वरूप असते.याला काही सन्माननीय अपवाद निश्चितच आहेत.असतात.पण ती संख्या कमीच. परदेशी विद्यापीठातील बहुतेक संशोधन प्रायोजित असते. कुठल्या तरी सरकारी,खाजगी संस्था तर्फे प्राध्यापकाला ग्रांट मिळाली असते.त्यातूनच विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यापीठाच्या पैशातून सहसा कुणाला शिष्यवृत्ती मिळत नाही. त्यामुळे तेथील संशोधनाचे उद्दिष्ट,स्वरूप,प्रारूप,दिशा सारे काही स्पष्ट असते.सारेकाही कसेतरी असा वर उल्लेखिलेल्या पद्धतीने चटावरचे श्राद्ध उरकल्या जात नाही! अनुदान देणाऱ्या संस्थेला मार्गदर्शक गाईड,संशोधक विद्यार्थी सारेच जबाबदार असतात. तिकडे विद्यार्थ्याला प्रबंधाच्या विषयाला हात घालण्या आधी एक वर्ष कोर्स वर्क करावे लागते.म्हणजे विषयासंबंधी अन् त्या संशोधनाला पूरक असे कोर्सेस कमीत कमी बी ग्रेडसह पास व्हावे लागतात.हे कोर्स वर्क अन् प्रि क्वलिफायींग परीक्षा अतिशय कठीण असते.उलट आपल्याकडील प्रि पी एच डी कोर्स वर्क हा फार्स असतो.त्याबद्दल जास्त न बोललेलेच बरे!

प्रबंधाच्या कामाचा दर्जा हा त्यावर आधारित जर्नल पेपर पब्लिकेशन वरून ठरतो.आपल्याकडे हाही एक धंदा झाला आहे.कुठल्याही साध्या कॉलेजातील सुमार दर्जाच्या ( आंतर राष्ट्रीय!!) परिषदेत एखाद दुसरा पेपर वाचला की काम भागते. काही ई जर्नल आज पाठवलेला पेपर उद्या प्रसिध्द करतात. त्यातील चुका सह! तज्ञा कडून परीक्षण,रिव्ह्यू,संपादन काही काही नाही.परदेशातील जर्नल मध्ये एक दोन रिविजन शिवाय पेपर प्रसिध्द होत नाहीत सहसा.आपल्या कडे कट पेस्ट,उचलेगिरी चे प्रमाण जास्त. त्यामुळे परदेशातील जर्नल मध्ये पेपर पाठवायला विद्यार्थी,मार्गदर्शक हिम्मत करीत नाहीत. फायनल प्रबंध परीक्षेतील,अन् तोंडी परीक्षेतील नाटक, सावळा गोंधळ याबद्दल न बोललेले बरे.यासाठी मार्ग दर्शक ,परीक्षक,मध्यस्थ याच्यात होणारी आर्थिक देवघेव,विद्यार्थ्याचा होणारा मानसिक आर्थिक छळ याबद्दल अनेक सुरस कथा माध्यमातून सारख्या प्रसिध्द होतात.पण तात्पुरते प्रकरण गाजते. मग थंड होते.विद्यार्थ्याच्या भवितव्याचा प्रश्न म्हणून जरा सहानुभूतीने प्रकरण हाताळले जाते. तेरी भी चूप मेरी भी चूप असा प्रकार! विषयाची निवड,संशोधन पद्धत, एकूणच पदवी संपादना मागचे गांभीर्य याकडे विद्यार्थी,मार्गदर्शक,निर्णय घेणारे,नियम राबविणारे प्राध्यापक,विद्यापीठ प्रशासन,परीक्षा विभाग या सर्व घटकांचा दृष्टिकोन प्रत्येक बाबतीत अतिशय क्याजुअल असतो. दोष कुणाला द्यायचा हाच प्रश्न असतो.कारण सारेच हातात हात घालून,ते उंचावत दाखवत असतात.आजकालच्या युती करणाऱ्या नेत्यासारखे हम पंच्छी एक डालके हे गाणे गात असतात!

पी एच डी करणाऱ्या एका संशोधक विद्यार्थ्यां मागे सरकार,विद्यापीठ एकूण किती खर्च करते अन् शेवटी समाजाच्या,सरकारच्या हाती नेमके काय लागते याचे सुध्धा संशोधन,ऑडिट व्हायला हवे.म्हणजे ही अधोगती नेमकी कधी सुरू झाली,का सुरू झाली,याला जबाबदार कोण,यावर सुधारण्या साठी उपाय काय यावर देखील वेगळी पी एच डी ( एक नव्हे अनेक) करता येईल. हा जो काही प्रकार चालू आहे तो काही विद्यापीठा पुरता मर्यादित नाही.अगदी आय आय टी, एन आय टी सारख्या संस्थांतील संशोधनाचा दर्जा ७०-८० दशकाच्या तुलनेत खालावला आहे.( तिथे आर्थिक देवघेव नसेल कदाचित. )काही वर्षा पूर्वी नेचर या जग प्रसिध्द जर्नल मध्ये कॉपी पेस्ट उचलेगिरी वर अनेक संशोधकांनी मिळून पेपर प्रकाशित केला होता.तिथेही संशोधन चोरी प्रकरणात आपला देश अव्वल होता.आता खाजगी विद्यापीठा ची संख्या वाढली आहे.तिथे तर लाखो रुपये फी आकारली जाते.साहजिकच या पैशाची परतफेड म्हणून सुमार दर्जाच्या प्रबंधाना ठराविक काळात कशीतरी मान्यता मिळते. मला वाटते विद्यापीठ प्रशासनाने पी एच डी चे संशोधन अधिक गांभीर्याने घेण्याची गरज आहे.आहे तेच कायदे कडक धोरणाने राबविले तरी बऱ्याच गोष्टी साध्य होतील.पैसे मागणारे,मार्गदर्शक,परीक्षक यांच्यावर पकडले गेल्यास कडक कारवाई व्हावी.अशा केसेस गुंडाळ ल्या न जाता त्यांना प्रसिध्दी द्यावी.म्हणजे निदान लज्जे पोटी तरी काही जण सुधारतील. विद्यार्थ्यांनी देखील ज्या प्रबांधाचा हाती घेतल्यावर अभिमान वाटेल असे दर्जेदार संशोधन करण्याचा चंग बांधावा.मार्गदर्षकाने सुध्धा गुणवत्तेच्या बाबतीत कसलीही तडजोड न करता दर्जेदार काम केल्या शिवाय प्रबंधाला मान्यता देऊ नये.दर सहा महिन्याने प्रगतीचे प्राध्यापक समिती व्दारे कडक मूल्य मापन व्हावे.यात दिशा दिग्दर्शन व्हावे.योग्य प्रगती नसेल तर त्या काळा पुरती शिष्यवृत्ती थांबवावी गरज पडल्यास.कुठे तरी प्रत्येकावर वचक हवाच.सगळ्यांना आता सारखे रान मोकळे सोडले तर परिस्थिती आणखीन बिघडेल.मग आपल्या कडील पी एच डी ला कुणी विचारणार नाही. ती परिस्थिती यायला नको.

# सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा

आधुनिक केसरी

भारतीय रेल्वे ही भारतीयांची जीवनवाहिनी आहे. दररोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या कोट्यावधीच्या घरात आहे. एकट्या मुंबईत दररोज पाऊण कोटी लोक रेल्वेने प्रवास करतात. यावरून संपूर्ण देशात किती प्रवासी रेल्वेने प्रवास करतात याचा अंदाज लावता येईल. सर्वाधिक प्रवासी संख्या असल्याने सरकारला सर्वाधिक महसुल देखील रेल्वेच मिळवून देते. जवळचा प्रवास करण्यासाठी प्रवासी उपनगरी रेल्वे सेवेचा आधार घेतात तसाच लांबचा प्रवास करण्यासाठी प्रवासी दीर्घ पल्ल्याच्या रेल्वेचा आधार घेतात. रेल्वेचा प्रवास म्हणजे कमी पैशात सुखकर प्रवास. कितीही लांबचा प्रवास असेल तरी रेल्वेत थकवा किंवा शिन येत नाही कारण लांबच्या प्रवासाचे आरक्षण अधिच केलेले असते. आरक्षण मिळाले की प्रवासी निश्चीन्त असे. रेल्वे गाड्याही पुरेश्या असल्याने सर्वांना आरक्षण मिळतं, ज्यांना आरक्षण मिळत नाही ते जनरल डब्यातून प्रवास करत मात्र देशात कोरोना आला आणि हे सर्व चित्र बदलले. कोरोनामुळे लॉक डाऊन लागू झाले आणि दीर्घ पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना ब्रेक लागला. लॉक डाऊन उठल्यानंतर मात्र पूर्वीचे हे चित्र बदलले. रेल्वे प्रशासनाने काही दीर्घ पल्ल्यांच्या एक्सप्रेस गाड्यांचे मार्ग बदलले तर काही एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या. आता तर दीर्घ पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्यांमधील डब्यांच्या रचनेत धोरणात्मक बदल करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या धोरणानुसार आता मेल, एक्सप्रेस, सुपरफास्ट एक्सप्रेसमधून जनरल डबे पूर्णपणे हटवले जाणार आहेत. त्यामुळे येत्या काळात केवळ या गाड्यांमध्ये वातानुकूलित कोचच असणार आहेत. याची सुरवातही रेल्वेने केली असून अनेक एक्सप्रेस गाड्यांचे स्लीपर कोच



कमी केले असून काही गाड्यांचे जनरल डबे बंद केले आहेत. रेल्वेने स्लीपर कोच कमी केल्याने सर्वसामान्य प्रवाशांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वी एका रेल्वेत १२ स्लीपर कोच तसेच चार जनरल डबे असायचे आता ही संख्या ५ ते ७ वर आल्याने गरिब तसेच सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला झळ बसत आहे. स्लीपर कोच काढून त्या ऐवजी वातानुकूलित कोच वाढवल्याने स्लीपर कोचचे आरक्षण मिळत नाही त्यामुळे प्रवाशांना द्वितीय श्रेणीचे वातानुकूलित तिकीट काढावे लागत आहे हे तिकीट सर्वसामान्य तिकिटाच्या दरापेक्षा पाचपट अधिक आहे त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक झळ बसत आहे. जनरल डबे कमी केल्याने जनरल डब्यात पाय ठेवायलाही जागा नसते. रेल्वेने डब्यांच्या रचनेत बदल करताना सर्वसामान्य, गरीब प्रवाशांचा विचारच केला नाही. सर्वच प्रवाशांना वातानुकूलित कोचचे तिकीट काढणे शक्य नाही त्यामुळे त्यांच्या प्रवासावरच रेल्वेने गदा आणली आहे. गरीब तसेच सर्वसामान्य प्रवाशांनी रेल्वेतून प्रवास करू नये असेच हे धोरण आहे. रेल्वेने हे नवीन धोरण बदलून पूर्वीप्रमाणे स्लीपर तसेच जनरल डब्यांची रचना ठेवून गरीब तसेच सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा द्यावा. जर रेल्वेने हे नवीन धोरण बदलले नाही तर भविष्यात रेल्वेला प्रवाशांच्या मोठ्या रोषाला सामोरे जावे लागेल.

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

## आधुनिक केसरी संवाद

# घसरत्या मतदानाची टक्केवारी लोकशाहीसाठी चिंताजनक

### नेत्यांनी मुद्दे खुंटीला टांगले; मतदारांचा निरुत्साह गंभीर ; संतप्तेची दखल कोण घेणार ?



आधुनिक केसरी

**लोकसभा निवडणुकीतील दुसर्या टप्प्यातील मतदान काल पार पडले. निवडणुकीच्या दोन्ही चरणात प्रचाराचे मुद्दे जनतेसाठी नव्हतेच उलट नेत्यांनी एकमेकांच्या काढलेल्या उखाळया- पाकळया होत्या. म्हणूनच मतदारांच्या निरुत्साहामागे हेही कारण असू शकते. उलट आमच्या जगण्याच्या संवेदनशील प्रश्नांवर नेते बोलणारच नसतील तर आम्ही मतदानाला का बाहेर पडावे? असा संतप्त सवाल मराठवाड्यातील अनेक मतदारांनी तिरुपती-लातूर विशेष रेल्वे प्रवास दरम्यान आज दैनिक आधुनिक केसरीशी संवाद साधत व्यक्त केला.**

**मतदान करण्याचा उत्साह नाही :** गेल्या दहा वर्षांपासून सरकारचा चाललेला कारभार बघून मन विटून गेले. लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सुटणार नसतील आणि नेत्यांना त्याचे काहीच वाटत नसेल तर विश्वास कुणावर ठेवायचा. आमच्याकडे काल 28 तारखेला मतदान होते. परंतु आम्हाला मतदानच करायचे नव्हते म्हणून आम्ही बाहेरगावी गेलो. मतदान करण्याचा उत्साहच निघून गेला.



**व्यंकटेश काबदे, शेतकरी, नायगाव, नांदेड**

**लोकशाहीला धोक्यात आणणाऱ्यांना वठणीवर आणायचंय :** मी एमबीए करून एका मार्केटिंग कंपनीत दहा- बारा हजारावर काम करीत आहे. येत्या दोन तारखेला माझे लग्न असून तेरा तारखेला मी, माझी पत्नी आणि कुटुंब मतदानाला जाताना योग्य निर्णय घेऊ. आम्हाला मतदानाचा हक्क कळतोय परंतु लोकशाहीला धोक्यात आणणाऱ्यांना वठणीवर आणायचंय.




**सुहास पारधे, मार्केटिंग ऑफीसर, परळी-वैद्यनाथ**

**बेरोजगारांना रोजगार नाही तर मतदानही नाही :** सरकार बेरोजगारांची जरासीही कीव करत नाही. उलट यांना फक्त खुर्चीची आस लागलेली आहे. लोकशाहीची बदललेली व्याख्या आता आम्हाला नीट समजलेली आहे. आम्ही उच्चशिक्षण घेऊन लाचारी जीवन जगत आहोत. मी गेल्या पाच वर्षांपासून किराणा दुकान चालवत आहे. दोनतीन स्पर्धा परीक्षा दिल्या त्यातला घोळ आणखी मिटला नाही. आमच्याकडे 7 मे ला मतदान होत आहे. माझ्यासह माझे अनेक मित्र योग्य निर्णय घेणार आहोत.



**अमर चव्हाण, किराणा दुकानदार, लातूर**

**गॅस वरून चुलीवर आलो :** उज्ज्वला योजनेतून एकदाच भरलेले सिलेंडर मिळाले. अकराशे रुपयाचे सिलेंडर घ्यायला आठ दिवस कामाला जावे लागते. ते रिकामे सिलेंडर घरात धूळखात पडून आहे. कामावरून परत येताना आणलेल्या जळणावर स्वयंपाक करते. जनतेचा अंत पाहणाऱ्या नेत्यांना या निवडणुकीत आम्ही महिला शक्ती जागा दाखवून देणार आहोत.



**कुसुम गिरमे, गृहिणी, औसा लातूर**

**या राजकारण्यांची चीड आलीय :** नैतिकता मोडून केवळ स्वतःसाठी जनतेला कवडीमोल किंमत देणाऱ्या राजकारण्यांची प्रचंड चीड आली आहे. शेतमालाला भाव नाही. निसर्गाच्या लहरीपणाने कंबरडे मोडलेल्या बळीराजाला मदत नाकारणाऱ्यांना आम्ही दारावर देखील उभे राहू देणार नाहीत.. आमच्या एकत्र कुटुंबात 50 सदस्य आहेत. सगळ्यांनी ठरवलंय योग्य बटनाचा वापर करू. **राधेश्याम माने, शेतमजूर, उदगीर**



**मतदानाला जायची हिंमत होत नाही :** सद्यपरिस्थिती बघून आमच्या मनात अनेक प्रश्नांची चलबिचल सुरु आहे. लोकशाहीचे झालेले वस्त्रहरण बघून मन सुन्न झाले आहे. तरुणांना रोज नव्या समस्या, बेरोजगारी, महागाई, भेडसावत आहेत. उच्चविद्याविभूषित तरुण भिकारी होऊन फिरत आहेत. माय जेऊ घालीना अन् बाप भीक मागू देईना, अशी अवस्था तरूणांची झाली आहे. म्हणूनच नवतरुणांना मतदानाला जायला हिंमत होत नाही. **प्रशिक देशमुख, विद्यार्थी, जालना**



# डॉक्टर मुकुल घरोटे यांचा पैशाचा नसणारा मोह मला जीवनदायी ठरला

### रुग्ण अविनाश सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आलेल्या आहेत एकीकडे मोठ्या प्रमाणावर कट प्रॅक्टिस सुरू असल्याचा समाजात गैरसमज आहे वैद्यकीय उपचार महागडे ठरत असताना आजही समाजात रुग्णसेवा करणारे लोक आहेत सेवाभाव डोळ्यासमोर ठेवून पैशाचा मोह न ठेवता कॅन्सर सारख्या आजारातून मुक्त करण्यासाठी पैशाचा मोह न ठेवता उपचार करणारे डॉक्टर देखील समाजात आहे हे जणू काही साईभक्त असलेले व शिर्डी येथे दर आठवड्याला येऊन कॅन्सर उपचार करणारे कॅन्सर तज्ञ डॉक्टर मुकुल घरोटे यांनी प्रत्यय आणून दिल्यामुळेच मी या आजारातून बाहेर पडू शकलो अशी प्रतिक्रिया नाशिक जिल्ह्यातील सातपूर येथील अविनाश हरिभाऊ सोनवणे या रुग्णाने पत्रकारांशी बोलताना दिली

सोनवणे म्हणाले की दाढ दुखीचा त्रास होत असल्याने मी शाकुंतल क्लिनिक येथे तपासणीसाठी गेलो असता त्या ठिकाणी डॉक्टर पाटील यांनी तपासणी केली वेगवेगळ्या तपासणीनंतर मला तोंडाचा कॅन्सर आहे अशी निदान झाले. डोळ्यासमोर माझे कुटुंब उभे राहिले कॅन्सर म्हणजे मृत्यू या भीतीने मी हतबल झालो आधार देत त्यांनी उपचार केले व पुढील उपचारासाठी मला मुक्ता क्लिनिकचे कॅन्सर तज्ञ डॉक्टर मुकुल घरोटे यांच्याकडे गेलो पहिल्या भेटीतच मला मोठा आधार दिला तुमचा कॅन्सर बरा करू तुम्ही चिंता करू नका अशी सांगितले केमोथेरपी सह विविध उपचार घेतले उपचाराच्या काळात बोलणे बंद झाली तोंड उघडत नव्हते बोलताना त्रास होत होता तोंडाचे व्यायाम सांगितले वजन कमी झाले होते तोंडात स्प्रे मारण्यासाठी तीन ते चार हजार रुपये खर्च येत होता घरातील मी कुटुंब प्रमुख पैशाची होणारी ओढाताण डॉक्टर घरोटेने म्हणालो की डॉक्टर माझ्याकडे पैसे नाही त्यावेळी डॉक्टर घरोटे म्हणाले की पैशाची चिंता करू नका वेळेवर उपचार घ्या दिलेल्या सूचनाचे तंतोतंत पालन करा मी देखील त्या सूचनांचे पालण केली सहा महिन्यानंतर मी बरा झालो जीवनाची नवी उमेद मला जगण्याची प्रेरणा देऊन गेली त्यासाठी पैशाचा मोह न ठेवता वैद्यकीय उपचार करणारे कॅन्सर तज्ञ डॉक्टर मुकुंद घरोटे हे जणू काही देवदूत म्हणून मला भेटल्यामुळेच मी या आजारातून बाहेर पडलो मी म्हणालो माझ्याकडे पैसे नाहीत तेव्हा डॉक्टर म्हणाले जेव्हा तुझ्याकडे येतील तेव्हा मला दे परंतु औषध उपचार वेळेवर घे अशी सांगत कॅन्सर निश्चितपणे बरा होतो हा दिलेला आत्मविश्वास व त्यामुळेच मी या आजारातून बाहेर पडलो व पुन्हा एकदा माझ्या कुटुंबाच्या आयुष्यात आनंद निर्माण झाला त्याचे श्रेय डॉक्टर घरोटे यांना जाते असे देवदूत डॉक्टर समाजात आजही आहेत यामुळेच वैद्यकीय क्षेत्रावरचा विश्वास आजही टिकून आहे त्याला डॉक्टर देखील अपवाद नाही असे म्हणावे लागेल, असे मत अविनाश सोनवणे यांनी व्यक्त केले.

आता आपल्या शिर्डी साई बाबा हॉस्पिटल मध्ये मुक्ता कॅन्सर क्लिनीक
नाशिक येथील सुप्रसिध्द कर्करोग फिजिशियन
डॉ. मुकुल घरोटे (Onco-physician)
MBBS, M.D.(Med.), D.M. (Med.Onco.)
Consultant Haemato-oncologist & Medical Oncologist
प्रत्येक आठवड्याचा शनिवार वेळ स.९ ते सायं.५
कर्करोगावर खालील लक्षणांवरती निदान व उपचार
* स्थनांच्या गाठी * थायरॉईडच्या गाठी * पोटातील गाठी * सर्व प्रकारच्या कर्करोगाच्या गाठी
* न बरा होणारा खोकला/टी.बी./ताप * तोंडातील न बरी होणारी जखम * संबंधानंतर रक्तस्राव
* अंगावरील सर्व प्रकारच्या गाठी * संडासावाटे/थुंकीवाटे/उलटीवाटे रक्त पडणे.
संपर्क : समाजसेवा विभाग, साई बाबा हॉस्पिटल, शिर्डी
मो.९६३७०११२९९, ९०११९२०२०० फोन नं : ०२४२३-२५८६८१
टिप : मागील रिपोर्ट असल्यास सोबत आणणे आवश्यक आहे.
ठिकाण : साई बाबा हॉस्पिटल (संस्थान), शिर्डी



# विखेंकडून ५० लाख रूपयांची ऑफर !

### अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांचा खळबळजनक आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या विरोधात हरकत घेऊ नये म्हणून विखे यांच्या समर्थकांनी ५० लाख रूपयांची ऑफर दिली होती असा खळबळजनक आरोप अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांनी केला आहे. आम्ही अनिलभैय्या राठोड यांचे मावळे आहोत. ५० लाखाच्या ऑफरला आम्ही भिक घालणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी विखे यांच्या अर्जावर घेतलेल्या हरकती फेटाळल्या असल्या तरी त्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात दाद मागण्यात येणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.

डॉ. सुजय विखे यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जावर अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रसंगी दोन हरकती नोंदविल्या होत्या. या हरकतींवर बराच खल होऊन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी नऊ तासानंतर विखे यांचा अर्ज वैध ठरविला. त्यानंतर गिरीश जाधव यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

जाधव म्हणाले, विखे यांनी शासनाची वन विभागाची ५०० एकर जमीन १ रूपया देऊन आपल्या संस्थेसाठी घेतली. त्यांच्याकडे शासनाची ८०० ते ८५० एकर जमीन असून या जमिनीवर खाजगी कॉलेज उभारून लोकांकडून करोडो रूपयांच्या देणग्या घेत आहेत. त्यावर मी हरकत घेतली होती. महानगरपालिकेची तीन कोटी रूपयांची पाणी पट्टी सर्वसाधारण सभेत भाजपाचे महापौर असताना ही पाणी पट्टी माफ करून घेण्यात आली. सुचक, अनुमोदक तसेच महापौर हे भाजपाचे यांनी सर्वांनी मिळून महापालिकेची लुट केली आहे. त्यासंदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागण्यासाठी गेलो होतो असे जाधव म्हणाले. जिल्हाधिकारी यांनी मी घेतलेल्या दोन्ही हरकती फेटाळून लावल्या. त्या कोणत्या मुद्दावर फेटाळल्या याचे स्पष्टीकरण देण्यात आले नाही. सहकारी संस्थांचा संबंध नसतो असे जिल्हाधिकारी सांगतात. सहकारी संस्थांचे तुम्ही थकबाकीदार असले तरीही अर्ज बाद होतो. विखे यांनी सरकारी जागेवर दिडशे कोटींचे कर्ज घेतले आहे. महापालिकेची तीन कोटी रूपयांची माफी घेतली यावर कोणी काही बोलायचेच नाही का ? असा सवाल जाधव यांनी केला.



**विखे यांना माफ करणार नाही :** डॉ. विखे यांनी मागील लोकसभा निवडणूकीत शिवसेना नेते अनिलभैय्या राठोड यांच्याशी गद्दारी केली. पायाला लागलेले असतानाही अनिलभैय्या राठोड यांनी विखे यांचा प्रचार केला होता. रक्तातील साखर वारंवार वाढत असताना, पायाला लागलेले असताना रूग्णालयात उपचार घेऊन वीस-बावीस दिवस रोज प्रचार केला. त्याची विखे यांना लाज नाही. आणि आज ते म्हणतात की शिवसेनेचे लोक विरोधात आहेत. विरोधात काय सांगता तुमच्यामुळेच अनिल राठोड हे गेले. त्यामुळे विखे यांना आम्ही कधीही माफ करणार नाही असे जाधव म्हणाले.

**त्यांच्यासोबत फिरणारे विरोधात मतदान करणार :** पालकमंत्री राधाकृष्ण विखे आहेत म्हणून आमच्या विरोधात जिल्हाधिकाऱ्यांनी निकाल दिला. हा निकाल सर्वकालीन नाही. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात जाऊन या निकालास आव्हान देणार आहोत. आम्ही अनिल राठोड यांचे कार्यकर्ते आहोत. त्यांच्यासोबत आज जे लोक फिरत आहेत ते देखील विखे यांच्या विरोधात मतदान करणार असल्याचा दावा जाधव यांनी केला.

# सहकार मंत्री दिलीप वळसे पाटीलांच्या प्रकृतीत सुधारणा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील जेष्ठ नेते तथा राज्याचे सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील मागील १५ ते २० दिवसांपूर्वी आपल्या घरातच पाय घसरुन पडल्याने त्यांच्या खुब्याला मार लागला होता त्यांचा एक हात ही फॅक्चर झाला होता. ऐन लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडवरच त्यांचा अपघात झाला होता. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नामुळे वळसे पाटील यांच्या तब्येतीत लक्षणीय सुधारणा झाली असून लवकरच ते आपल्या मतदार संघात जनतेच्या गाठी-भेटी घेणार आहेत.



दिलीप वळसे पाटील - सहकार मंत्री, महाराष्ट्र

"दि. २७ ला रात्री राहत्या घरात पाय घसरून पडल्यामुळे मला फॅक्चर झाले होते. मागील १५ दिवसांत त्यावर जलद,योग्य उपचार झाल्याने प्रकृतीत सुधारणा वाटत असल्याने आता बरे वाटत आहे. लवकरच मतदार संघात जाऊन जनतेच्या गाठी-भेटी घेणार असून शिवाजीराव आढळराव पाटील यांना निवडून आणण्याकामी मदत करावी अशा प्रकारचा प्रयत्न करणार आहे.

सध्या लोकसभेच्या निवडणुकीचा धुमधडाका सुरु आहे. शिरूर मधून महायुतीचे उमेदवार म्हणून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने उमेदवारी दिली असून महायुतीचा प्रचार ही जोरात सुरु असल्याचे पाहावयास मिळते. पुणे जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघाची जबाबदारी पक्षाचे तगडे नेते म्हणून वळसे पाटील यांच्यावर नक्कीच आहे.ते आता बरे झाल्याने महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारास नक्कीच पाठबळ मिळेल असा विश्वास समर्थकांतून व्यक्त होत आहे.

# आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची जेईई परीक्षेमध्ये उत्तुंग भरारी

## चंद्रपूर आदिवासी विकास विभागाच्या 'मिशन शिखर' उपक्रमाचे यश

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय चंद्रपूर अंतर्गत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांकरीता मिशन शिखर उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना जेईई/नीट/सीईटी/एनडीए/सीएलएटी अशा विविधि परिक्षेचे मोफत मार्गदर्शन प्रशिक्षक / शिक्षक यांच्या मदतीने दिले जाते. दिनांक 24 एप्रिल 2024 ला जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये मिशन शिखर मधील 5 आदिवासी विद्यार्थी पात्र झाले आहेत.

यात सुनिता श्यामराव मेश्राम, रा. जिवती (69.14 टक्के), प्रितिका जंगु करपाते, रा. भारी (68.23 टक्के), अदिती उमेश जुमनाके, रा. मांडवा, ता. कोरपना (64.44 टक्के), अर्जुन विजु वेलादी, रा. कारगाव, ता. कोरपना (54.46 टक्के) आणि गौरव चित्तरंजन कोवे, रा. मोहाळी, ता. बल्लारपूर (47.46 टक्के) अशी पात्र विद्यार्थ्यांची नावे आहेत. हे सर्व विद्यार्थी चंद्रपूर जिल्हयातील असून आदिवासी समाजाचे आहेत तसेच हे विद्यार्थी एकलव्य मॉडेल रेसीडेंशिअल पब्लिक स्कुल, देवाडा येथे शिकत आहेत. सर्व पात्र विद्यार्थी व त्यांच्या पालकांना प्रकल्प कार्यालयात आमंत्रित करून त्यांना भेट वस्तू देवून त्यांचा सत्कार केला. मिशन शिखर 2023-2024 अंतर्गत जेईई/नीट/सीईटी/एनडीए/सीएलएटी चा क्रॅश कोर्स प्रकल्पात राबविला जात असून त्यामध्ये यावर्षी सीईटी करीत 85, जेईई 27, नीट 54 आणि एनडीए साठी 20 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. भविष्यात जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये पात्र करणे हा आदिवासी विकास प्रकल्पाचा उद्देश असल्याचे प्रकल्प अधिकारी श्री. राचेलवार यांनी सांगितले. प्रकल्पात पहिल्यांदाच ऐवढ्या संख्येने आश्रम शाळेतील विदयार्थी जेईई सारख्या परीक्षेत पात्र झालेले आहेत. आदिवासी विद्यार्थीसुद्धा कोणत्याही परिस्थितीवर मात करून घवघवीत यश संपादन करू शकतो, हे या यशाने दाखवून दिले आहे. मे 2024 ला होणा-या विविध मेडिकल / इंजिनिअरींग परीक्षेकरीता मिशन शिखर अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी पात्र होतील, असा विश्वास प्रकल्प अधिकारी यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मिशन शिखर उपक्रमास भेट देणारे प्रकल्प कार्यालयातील अधिकारी, एकलव्य मॉडेल रेसीडेंशिअल पब्लिक स्कुल, देवाडा या सर्वांचे कौतुक करण्यात आले आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रकल्पात आदिवासी विद्यार्थ्यांकरीता मिशन शिखर, समर कॅम्प, ताडोबा शैक्षणिक सहल, भारत दर्शन, परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ, शिक्षकांकरीता भविष्यावेधी प्रणाली नुसार प्रशिक्षण, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासपूरक प्रशिक्षण असे विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

# ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलकडून मतदार जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज




**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देशात व राज्यात लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया पार पडत आहे.पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होत असून देशात तसेच महाराष्ट्रात सुद्धा मतदान करण्यासाठी विविध संघटना कडून आवाहन केले जात आहे.तसेच शालेय स्तरांवर सुद्धा विद्यार्थ्यांच्या मार्फत जनजागृती करण्याचा प्रयत्न शालेय प्रशासन करत आहेत. पुरंदर तालुक्यामध्ये निरा-पिंपरे येथे असलेल्या ॲसेंड इंटरनॅशनल स्कूल कडून सुद्धा मतदार जनजागृती केली जात आहे.मतदान करण्यासंदर्भातील विविध पोस्टर हातात घेत, विद्यार्थ्यांचा बनविण्यात आलेल्या एका व्हिडिओ द्वारे मतदान करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे, सचिव नीता खोमणे आणि मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांनी विद्यारर्थी व शिक्षकवृंद यांचे विशेष अभिनंदन केलेले आहे.सार्थक फरांदे,ईश्वरी फरांदे,संस्कृती धायगुडे,स्नेहल बरदडे,उत्कर्षा पवार,अथर्व साबळे,क्षेया धुमाळ,काव्या फरांदे,स्वप्नाली क्षीरसागर,जिया शेख,शिवराज निगडे, स्वरांत पिसाळ आदी विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.आपले मत बहुमुल्य आहे,आपले मत आपले भविष्य,मतदानासाठी वेळ काढा, आपली जबाबदारी पार पाडा,सोडा सर्व काम,चला करूया मतदान,आपल्या मताचे दान आहे लोकशाहीची शान,मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो,वाढवू तिरंग्याची शान, करूया देशासाठी मतदान,जना मनाचा पुकार, मतदान आपला अधिकार,जय संविधान,लोकशाही जिंदाबाद अशी मतदार जागृती घडवुन आणणारी वाक्ये पोस्टर वर लिहिण्यात आली.हे पोस्टर विद्यार्थ्यांच्या हातात देण्यात आले. मतदारांमध्ये शालेय स्तरावरून जन जागृतीचे एक चांगले व लोकशाहीला बळकटी आणण्याचे कार्य होत असल्याने लोकांनी तसेच पालकांकडून विद्यार्थ्यांचे व शाळेचे विशेष कौतुक होत आहे.या उपक्रमातून लोकशाही,संविधान,मतदान,मतदार या बाबत विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा याबद्दल आत्मीयता निर्माण होत असल्याने असे उपक्रम महत्वाचे ठरत आहेत.

शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे म्हणाले की,भारतीय राज्यघटनेचे थोर शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान या देशाला दिले. त्या संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकाला मतदानाचा हक्क देण्यात आला.तो मतदानाचा हक्क हा अनमोल असून त्याचा वापर चांगले प्रतिनिधी निवडण्यासाठी करण्यात यावा.आपले मतदान हे आपले आणि आपल्या देशाचे भविष्य असू शकते.हे सर्वसामान्य नागरिकाला समजले पाहिजे. त्यासाठी आपण मतदान करण्यासाठी आणि चांगली व्यक्तीची निवड करण्यासाठी मतदान केलेच पाहिजे.हे काम करण्यासाठी पाच वर्षातून एकदाच आपणाला हा अधिकार प्राप्त झालेला आहे.या अधिकाराच्या माध्यमातून संधीचे सोने करण्यासाठी प्रत्येक मतदारांनी वेळ काढून मतदान केलेच पाहिजे. खऱ्या अर्थानं लोकशाही मजबूत करण्यासाठी संविधानाचे रक्षण करण्यासाठी आपला हक्क आपण बजावलाच पाहिजे. विद्यार्थ्यांकडून करण्यात आलेली मतदार जनजागृती हा कौतुकास्पद असा उपक्रम आहे.सर्व विद्यार्थ्यांचे तसेच शालेय शिकवृंद यांचे मी खूप खूप अभिनंदन करतो.असे सुद्धा त्यांनी सांगितले.हा मतदार जन जागृतीचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी रुपाली शितोळे,आशालता काकडे,सुजाता जाधव,माधुरी ठोंबरे,अर्पणा फरांदे,श्वेता शिळिमकर,मनिषा धायगुडे,पुष्पा शिंदे आदी शिक्षकवृंद यांनी विशेष मेहनत घेतली."चला करू मतदान" या गाण्यावर तर नृत्य सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी मतदान करण्याचा संदेश दिला.एकप्रकारे विद्यार्थ्यांनी यातून राष्ट्रीय मतदान दिवसच साजरा केला.



# सावळदबारा येथे कोल्हापूर बंधारा विना रेती, बिना आसारीचा; नुसती गट्टी टाकून मलमपट्टी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे चालू असलेले कोल्हापूर बंधाऱ्याचे कामा अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम सुरू आहे याकडे कोणी लक्ष देईल का असे मत अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागिय अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी व्यक्त केले आहे.

सविस्तर माहिती अशी की सावळदबारा शिवारामध्ये गावालगत असलेल्या नदीपात्रावरसिमेंट बांधाचे काम सुरू असूनहे काम रामभरोसेअसल्याचे दिसून येत आहे हे सर्व काम मजुरांच्या भरोशावर होत असून मजुरांना हे काम कोणाचे माहित नाही मात्र संबंधित ठेकेदार आपल्या व इंजिनियर मजुरांच्या भरोशावर काम करतात या कामावरती फिरवूनही पाहत नाहीत सदरील काम हे इस्टिमेट नुसार होत नसून हे काम किती रुपयाच आहे. याची कुठलीस माहिती फलक लावण्यात आलेला नाही तर येथे इस्टिमेट सुद्धा उपलब्ध नाही लाखो रुपयाचे असलेले हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून सदरील कामावरती पाणीसुद्धा मारण्यात आलेले नाही ज्या ठिकाणी काम केले गेले त्या ठिकाणी परवानगी न घेता कित्येक सागवान झाडी पोकलँड च्या साह्याने तोडण्यात आली याची माहिती अजिंठा परिक्षेत्र विभागातील वन परिमंडळाला देण्यात आली परंतु त्यांनीही कुठलीच कारवाई आजवर हाती घेतलि नाही सावळद बारा हे गाव सोयगाव तालुक्यातील शेवटची गाव असून आणि डोंगर रांगेत असून मोठ्या प्रमाणावर नदी नाले झरणे असून येथे सिमेंट बांध अधिक प्रमाणात शासनाकडून राबवले जातात मात्र इंजिनीयरच्या व यांच्यावर अधिकाऱ्यांच्या मिली भगत मुळे हे सर्व कामे थातूरमातूर पद्धतीने करून आपले खिसे गरम करण्याचे काम हे लोक करतात या कामावरती निकृष्ट दर्जाची सिमेंट रेती वापरण्यात आली लोखंडाचे बिल काढले जाते मात्र यात असारी वापरले गेले नाही शासनाच्या बऱ्याच योजना गावोगावी येतात पण कागदोपत्री घोडे नाचवून कामाचे बिल काढण्यात येते या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी गोकुळसिंग राजपूत व गावकऱ्याकडून व्यक्त होत आहे.

# प्रचाराच्या धुरळ्यात स्वतःच्या पोळ्या भाजण्यासाठी उपरे पुढारी करताहेत पुढे-पुढे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** लोकसभा निवडणुक प्रचाराच्या धुरळ्यात स्वतः च्या पोळ्या भाजण्यासाठी गावपातळीवरील उपरे पुढारी नेत्यांच्या पुढे-पुढे करीत असल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात तालुक्यात पहावयास मिळत आहे. जालना लोकसभेची रणधुमाळी ऐन उन्हाळ्यात तापली असुन लोकसभेच्या मतदारसंघात येणाऱ्या सर्वच गावात सर्वच पक्षातील उमेदवारासह उमेदवारांच्या नातेवाईकांकडून मतदारसंघ पिंजुन काढला जात आहे. त्याचबरोबरच प्रत्येक तालुक्यासह विधानसभा मतदारसंघातील कांग्रेस, भाजप, वंचित बहुजन आघाडी व काही अपक्ष उमेदवारांच्या पदाधिकारी यांच्याकडून प्रचाराची धुरा सांभाळण्याचे काम चालू असले तरी पदाधिकारी मात्र आपली वैयक्तिक निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच प्रचार धुरा सांभाळत असल्याने लोकसभा उमेदवारांनी टाकलेल्या वैयक्तिक विश्वासास तडा जाताना दिसत आहे.



उमेदवाराच्या प्रचारासाठी पक्षाकडून किंवा उमेदवारांकडून गाडी घेणे व प्रचार मात्र स्वतःचाच करणे. मतदान कुणालाही करा मी फक्त भेटायला आलो म्हणून सांगणे तर काही जण आमदारकी डोळ्यासमोर ठेवून मतदारसंघ पिंजुनकाढून सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्याचा खटाटोप चालवताना उपरे पुढारी मात्र एक पायरी पुढे दिसत आहेत. काही आमदारकी, काही जिल्हा परिषद, काही नगर पालिका, काही पंचायत समिती, काही ग्रामपंचायत अशा रीतीने तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेण्याचा कार्यक्रम चालू आहे. सत्य परिस्थिती थोडे वेगळीच असल्याचे जाणकार मतदारांकडून बोलल्या जात आहे तर 'मौन सर्वार्थ साधनम्' या म्हणीप्रमाणे अधिकची बडबड करण्यापेक्षा गप्प बसून. शांततेत मतदान करण्याचा सल्ला जाणकार देत आहेत मात्र लोकसभेच्या प्रचारात स्वताच्या पोळ्या भाजण्यासाठी उपरे पुढारी पुढेपुढे करताना दिसुन येत असून गावातील चार दोन मते न पडणाऱ्यांना नेता मोत्यांचे स्वप्न पडले असल्याचे चित्र दिसून येत आहे..



# तरससदृश प्राण्याच्या हल्ल्यात ५५ मेंढयांचा मृत्यू

## आ. नीलेश लंके यांची मुख्यमंत्र्यांकडे मदतीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगांव :** तरससदृश प्राण्याने मेंढपाळाच्या वाडयावर हल्ला करून मेंढयांना लक्ष्य केल्याने ५५ मेंढया मृत्यूमुखी तर १० मेंढया अत्यावस्थ आहेत. आ. नीलेश लंके यांनी व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून पिडीत मेंढपाळाशी संवाद साधत दिलासा दिला. वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी पत्रव्यवहार करून पिडीत मेंढपाळास तातडीची मदत करण्याची मागणी केली.

जिल्हयातील शेवगांव तालुक्यातील घेऊरी, दहिगांव ने या गावातील धनगर बांधव अशोक बाबूराव क्षीरसागर यांच्या मेंढयांच्या वाडयावर २५ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास तरससदृश प्राण्याने हल्ला केल्याने तब्बल ५५ शेळया मृत्यूमुखी पडल्या तर १० शेळया अत्यावस्थ आहेत.

नीलेश लंके यांचे सहकारी दहीगांव ने भागात असताना या मेंढपाळावर ओढावलेल्या संकटाची माहीती त्यांना समजली त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत आ. नीलेश लंके यांच्याशी व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून संपर्क केला. लंके यांनी पिडीत मेंढपाळ बांधवाशी चर्चा करून त्यांना धीर दिला. तिथे उपस्थित असलेल्या वन विभागाच्या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांशीही लंके यांनी चर्चा करून पंचनामे करून तात्काळ अहवाल पाठविण्याच्या सुचना दिल्या.


अशोक श्रीरसागर हे अत्यंत गरीब असून मेंढी पालन करून ते त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. जंगली प्राण्याच्या हल्ल्यात मोठया संख्येने मेंढया मृत्यूमुखी पडल्याने प्रचंड आर्थिक नुकसान होऊन त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने त्याची गंभीर दखल घेउन त्यांना तात्काळ आर्थिक मदत करण्याची मागणी आ. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

# जालना येथे शिक्षक साहित्य संमेलनाचे आयोजन

## रसिकांसाठी परिसंवाद, मुलाखत व कविसंमेलन होणार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातर्फे महाराष्ट्र दिनानिमित्त एकदिवसीय 'शिक्षक साहित्य संमेलनाचे' आयोजन 29 एप्रिल रोजी जालना येथे करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. बसवराज कोरे, स्वागताध्यक्षपदी मंगल धुपे, तर कार्यवाहपदी सुहास सदाव्रते यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्‌घाटन डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या हस्ते होईल. शिक्षण विभागातर्फे आयोजित हे संमेलन जालना शहराजवळील खरपुडी येथे मराठवाडा शेती साहाय्य मंडळ संचालित 'आमची शाळा' येथे होणार असून या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.




**पहिल्या सत्रात परिसंवाद :** या शिक्षक साहित्य संमेलनाच्या पहिल्या सत्रात सकाळी 10 .30 वाजता डॉ . यशवंत सोनुने यांच्या अध्यक्षतेत 'समाज माध्यमांवरील साहित्य लेखन आणि रसिक वाचकांची मानसिकता' या विषयावर परिसंवाद होणार असून डॉ . विशाल तायडे (प्रादेशिक विद्या प्राधिकरण छ . संभाजीनगर), डॉ . प्रमोद कुमावत (जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था), डॉ . दिगंबर दाते (मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड) व डॉ . ज्योती धर्माधिकारी हे वक्ते सहभागी होणार आहेत . सूत्रसंचालन विजय जाधव करतील .

**कविसंमेलन :** तिसऱ्या सत्रात कवी कैलास भाले यांच्या अध्यक्षतेत व कवी, कथाकार पंढरीनाथ सारके यांच्या प्रमुख उपस्थितीत कविसंमेलन दुपारी 1 .30 होईल . यात रेखा गतखणे जाधव, नारायण खरात, प्रा . प्रदीप देशमुख, डॉ . शशिकांत पाटील, डॉ . मारोती घुगे, डॉ . अशोक पाठक, डॉ . कन्नूलाल विठोरे, प्रा . दीपक राखुंडे, जिजा वाघ, पांडुरंग गिराम, डॉ . विद्या दिवटे, अतुल हेलसकर, मनिष पाटील, प्रा . अशोक खेडकर, सतीश खरटमल, डॉ . गोपाल तुपकर, विनोद वीर, श्रीकांत गायकवाड, भिवसन ससाणे, बीना पाठक, सुधाकर चिंधोटे, शिवनंदा मेहेत्रे, डॉ . गणेश कंटुले, मिलिंद लांबे, कविता नरवडे, आरती जोशी, सुरेश कायटे, प्रकाश कुंडलकर, कुणाल जाधव, कृष्णा कदम, संतोष जोशी, छाया वाघ हे कविता सादर करतील . सूत्रसंचालन डॉ . प्रभाकर शेळके, अशोक डोरले करतील .

**विनोद जैतमहाल यांची विशेष मुलाखत :** संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात जालना येथील कवी, गीतकार, पत्रकार, नाट्यकलावंत विनोद जैतमहाल यांची विशेष मुलाखत सकाळी 11 .30 वाजता होणार असून ज्येष्ठ रंगकर्मी मुकुंद दुसे व डॉ . विद्या दिवटे हे त्यांची मुलाखत घेणार आहेत .

**समारोप सत्रात राजकुमार तांगडे : संमेलनाचा समारोप नाट्यलेखक व अभिनेते राजकुमार तांगडे व डॉ . कैलास इंगळे (समीक्षक, छ . संभाजीनगर) हे करतील . सूत्रसंचालन मनिषा पाटील करतील .**

# जखमीला मदत करून दुचाकी पळविली

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** डोंबिवली जवळील खोणीगाव तळोजा रस्त्यावर गुरुवारी मध्यरात्री एका मोटार कार चालकाने एका दुचाकी स्वाराला जोराची धडक देऊन त्याला जखमी केले. दुचाकी स्वार रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडला होता. त्याला एका पादचाऱ्याने एका गॅरेजच्या निवाऱ्याजवळ बसविले. आणि जखमी प्रवाशाची दुचाकी त्या पादचाऱ्याने घेऊन पळून गेला. जखमी प्रवाशी शुध्दीवर आला तेव्हा त्याला आपली दुचाकी गायब असल्याचे दिसले. आपणास मदत करणाऱ्या इसमानेच दुचाकी चोरून नेली असल्याचा संशय व्यक्त करून जखमीने मानपाडा पोलीस ठाण्यात शुक्रवारी तक्रार दाखल केली आहे. उमेशकुमार पारसमल दुक्कड (३५) असे जखमी प्रवाशाचे नाव आहे. ते डोंबिवली जवळील लोढा आर्केड गृहसंकुलात राहतात. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार उमेशकुमार हे गुरुवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास तळोजा खोणी रस्त्याने दुचाकीवरून जात होते. यावेळी सुसाट वेगात असलेल्या एका मोटार कार चालकाने उमेशकुमार यांच्या दुचाकीला जोराने कट मारला. जीव वाचविण्याच्या प्रयत्नात उमेशकुमार यांनी दुचाकी रस्त्याच्या कडेला घेण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात ते बाजुच्या खड्ड्यात दुचाकीसह पडले. मोटार कार चालक यावेळी पळून गेला होता. बराच उशीर उमेशकुमार मध्यरात्रीच्या वेळेत रस्त्याच्याकडेला पडून होता. त्याचवेळी तेथून एक पादचारी पायी जात होता. त्याने जखमी उमेशला मदत करण्याच्या बाहाण्याने त्याला प्रथमोपचार करून बाजुला असलेल्या एका गॅरेजच्या निवाऱ्याखाली आणून बसविले.

# राहुल शिंदे यांचे संतुलन बिघडले !

## सुवर्णा धाडगे यांची बोचरी टीका

आधुनिक केसरी न्यूज



**पारनेर :** तालुक्यातून नीलेश लंके यांना मोठया प्रमाणावर पाठबळ असून इतर विधानसभा मतदारसंघातही लंके यांचाच बोलबाला आहे. संपूर्ण लोकसभा मतदारसंघात भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांना जनतेचा प्रतिसाद मिळत नसल्याने हतबल झालेले भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. एकाही निवडणूकीत गुलाल न घेतलेले राहुल शिंदे हे मतदारसंघातील नागरीकांची दिशाभूल करीत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सुवर्णा धाडगे यांनी सांगितले. धाडगे यांनी सांगितले की, ज्या राहुल शिंदे यांना नीलेश लंके यांनी चार वेळा पराभूत केले ते लंके यांच्यावर पारनेर तालुका नाराज असल्याचे सांगत आहेत हाच विनोद आहे. पारनेर तालुक्याच्या कोणत्याही प्रश्नांची सोडवणूक लंके यांनी केली नसल्याचे सांगणाऱ्या शिंदे यांना गेल्या साडेचार वर्षात त्यांनी मतदारसंघात आणलेला १ हजार ४०० कोटी रूपयांचा निधी दिसत नाही. दहशत नेमके कोण निर्माण करीत आहे ? असा सवाल करून धाडगे म्हणाल्या, नीलेश लंके यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांच्यावर केवळ कांदा भावाच्या आंदोलनाचा एकच गुन्हा दाखल आहे. नीलेश लंके यांनी प्रशासनास वेठीस धरल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे. आजही पारनेर तालुक्यात लंके यांनी मंजुर करून आणलेल्या ३५० कोटींच्या कामांना विखे पिता पुत्रांनी स्थगिती देऊन सत्तेचा गैरवापर केला याचीही जनतेला जाणीव आहे. राहुल शिंदे यांचे आयुष्य एजंटगिरी करण्यात गेले असून त्यांनी आणखी कशात एजंटगिरी केली हे सांगण्यासाठी तोंड उघडायला लावू नका असा इशाराही धाडगे यांनी दिला आहे. खा. डॉ. सुजय विखे यांच्या आजोबांनी तेलबिया प्रकल्प सुरू करून तरूणांना रोजगार देतो असे सांगितले होते. त्यासाठी रांजणगांव मशिद येथे शेतकऱ्यांकडून १०० एकर जमीन घेण्यात आली. आता नातू मते मागत असतानाही हा प्रकल्प का उभा राहू शकला नाही याचे उत्तरही शिंदे यांनी द्यावे, असे आव्हान धाडगे यांनी दिले आहे.

# मारहाणीत शेतकऱ्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** अनेक वर्ष जमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादातून खडवली जवळील उतणे गावातील शेतकरी बंधूंनी फळेगाव मधील वृध्द शेतकरी चांगदेव कचरू बनकरे आणि त्यांच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण केली होती. या मारहाणीत चांगदेव गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर कल्याण मधील एका खासगी रुग्णालयात महिनाभर उपचार सुरू होते. या उपचारा दरम्यान चांगदेव यांचा मृत्यू झाला आहे. बाळाराम नामदेव टोके, प्रल्हाद नामदेव टोके, सागर बाळाराम टोके, अमित बाळाराम टोके अशी आरोपींची नावे आहेत. हे सर्व शेतकरी उतणे गावातील रहिवासी आहेत. टिटवाळा पोलीस ठाण्यात या खून प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चांगदेव यांचा मुलगा नीलेश (३०) यांनी या खून प्रकरणी तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, गेल्या महिन्यात सकाळच्या वेळेत चांगदेव यांची पत्नी उषाबाई, मजूर सविता आसरे त्यांच्या शेतात काम करत होत्या. यावेळी तेथे आरोपी गटाने आले. त्यांनी उषाबाईला ही जमीन आमच्या मालकीची आहे. या शेतात काय करता असे बोलून त्यांना तेथून दमदाटी करून हाकलून लावले.




# प्रस्थापित व्यवस्थेला सत्तेचे व्यसन लागलेले आहे

## रमेश बारसकर : रामराजेंसह, रणजितसिंह, धैर्यशील मोहिते यांच्यावरही टीका टिप्पणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगांव :** माढा लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीकडून ओबीसी नेते व माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर हे निवडणूक लढवित आहेत.ते माढा मतदारसंघातील विविध गावांना भेटी गाठी देत प्रचार करत आहेत.लोकांशी संवाद साधत आहेत.शिट्टी या चिन्हा समोरील बटण दाबून मतदान करण्याचे आवाहन सुद्धा लोकांना करत आहेत.फलटण तालुक्यातील तरडगांव येथे ते आले असता त्यांनी वंचित बहुजन आघाडी आणि बहुजन समाज सामाजिक विकास संघटना यांच्याशी संवाद साधला.आजपर्यंत जे आरक्षणवादी आहेत.मग तो एससी,एसटी,ओबीसी असेल यांचा ८५ टक्के हा समाज असताना सत्ता फक्त १५ टक्के लोक याठिकाणी उपभोगतात.असे सांगताना त्यांनी इथल्या प्रस्थापित असलेल्या पक्षांच्या व लोकांच्या विरोधात टिकात्मक भूमिका मांडली. माढा मतदारसंघात उभे असलेले दोन्ही उमेदवार हे भाजपचे आहेत.असा आरोप सुद्धा रमेश बारसकर यांनी केला.तसेच प्रस्थापित व्यवस्थेला सत्तेचं व्यसन लागलेलं आहे.अशी सडकून टिका सुद्धा केली.तसेच रामराजे नाईक निंबाळकर,धैर्यशिल मोहिते पाटील,रणजितसिंह  मोहिते पाटील आणि यांच्या वर सुद्धा रमेश बारसकर यांनी भाष्य केले. रमेश बारसकर हे तरडगाव ता.फलटण येथे आल्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी संदिप गायकवाड यांच्या निवासस्थानी बैठक संपन्न करण्यात आली.यावेळी त्यांनी परखडपणे प्रस्थापितांचा समाचार घेतला.बैठकीपूर्वी त्यांचे



स्वागत औक्षण करून करण्यात आले.तसेच वंचित बहुजन आघाडी आणि बहुजन समाज सामाजिक विकास संघटनेच्या वतीने उमेदवार रमेश बारसकर यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला.तसेच वंचित बहुजन आघाडीचे सातारा जिल्हाध्यक्ष भीमराव घोरपडे,अरविंद आढाव,संजय करपे यांचे ही स्वागत करण्यात आले.यावेळी मोतीराम गायकवाड,संदीप गायकवाड,मधुकर गायकवाड, दत्तात्रय अडसूळ,चंद्रकांत चिरमे,शशिकांत गायकवाड,शिवाजी गायकवाड आदींसह इतर उपस्थित होते. रमेश बारसकर म्हणाले की,वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आदरणीय प्रकाश आंबेडकर यांनी जो माझ्यावर विश्वास दाखविलेला आहे.त्या विश्वासाला सार्थ ठरविण्यासाठी माढा लोकसभा मतदारसंघामध्ये फिरत आहे.उत्तरप्रदेश,बिहार, राजस्थान इत्यादी ठिकाणी बहुजन चळवळ यशस्वी झालेली आहे.बहुजन समाजाचा मुख्यमंत्री झालेला आहे.बहुजन समाजाची सत्ता वेळोवेळी तेथे आलेली आहे.केवळ महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत होऊन शकलेलं नाही.ते करण्याचा प्रयत्न प्रकाश आंबेडकर हे करत आहेत.त्यांना खऱ्या अर्थाने शक्ती देऊन ह्या आपल्या सर्व आरक्षणकर्त्या समाजाने त्यांच्या पाठीशी उभे राहायला पाहिजे. माझ्या सारखा ओबीसी समाजाचं नेतृत्व करणारा, कार्य करणारा तरुण कार्यकर्ता पुढं आल्यानंतर प्रकाश आंबेडकरांनी उमेदवारी दिली. विश्वास दाखविला.असे सुद्धा त्यांनी सांगितले.

रमेश बारसकर पुढे म्हणाले की,आजच्या बैठकीच्या माध्यमातून एवढं सांगू इच्छितो जे समोर उमेदवार आहेत.ते दोन्ही बीजेपीचे आहेत.म्हणजेच वंचित बहुजन आघाडीची लढाई ही एका भाजप बरोबर नाही.तर दोन भाजप बरोबर लढाई आहे. आमच्या सोलापूर जिल्ह्यात सांगायचं म्हटलं तर सोलापूर जिल्ह्यात जे धैर्यशील मोहिते पाटील राष्ट्रवादीचे कॉंग्रेसचे उमेदवार आहेत.त्यांचे बंधू हे आजही भाजप मध्ये आहेत.रणजितसिंह मोहिते पाटील हे भाजपचे आमदार आहेत.आणि भाजपही त्यांच्या वर कारवाई करत नाही.हा संशोधनाचा विषय आहे.आज या सातारा भागात सांगायचं म्हटलं तर फलटण मध्ये रामराजे नाईक निंबाळकर हे राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये आहेत.आणि त्यांचा बंधू कशाचा प्रचार करत आहेत.हे तुम्हा आम्हांला नवीन सांगण्याची आवश्यकता नाही.म्हणजे चित भी मेरा पट भी मेरा..! त्यांना सत्तेचं व्यसन लागलेलं आहे.जसं एखाद्याला दारूचं आणि गांजाचं व्यसन लागतंय.दारू आणि गांजा नाही मिळाला की अस्वस्थ होतंय.तसंच या पद्धतीनेच या प्रस्थापित व्यवस्थेला सत्तेचं व्यसन लागलेलं आहे.सत्ता जवळ नसेल तर तर डीप्रेशन मध्ये जातात.म्हणून कुणी कडून ही आमचीच सत्ता असली पाहिजे.अशा प्रकारचं त्यांचं या ठिकाणचं वागणं आपण या राज्यामध्ये पाहत आहात.आणि त्यास छेद देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला आपण खऱ्या अर्थाने ओबीसी असेल एससी,एसटी,मायनोरिटी असेल या समाजाने वंचित बहुजन आघाडीच्या पाठिशी उभे राहीले पाहिजे.अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संदीप गायकवाड म्हणाले की,लोकसभा निवडणुकीच्या निमित्तानं आपल्या सर्वांचे नेते ॲड.बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांनी या माढा मतदारसंघामध्ये स्वाभिमानाचा आवाज उंचावण्यासाठी आणि जातीचं सामाजिक समिकरण घडवून आणण्यासाठी संपुर्ण राज्यामध्ये विविध जाती धर्माचे उमेदवार देऊन  चांगल्या प्रकारचे गणित जुळवून आणलेलं आहे.माढा लोकसभा मतदार संघाचे उमेदवार व माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांचं तरडगावच्या भूमिमध्ये स्वागत करतो.



# पहूरला जय सप्तश्रृंगी मातेचे मंदिरच हरवले

## मंदिर शोधण्यासाठी पोलीसांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहुर -कसबे येथे वाघूर नदीच्या तीरावर चक्क  'क ' वर्ग दर्जा प्राप्त जय सप्तशृंगी मातेचे मंदिरच हरवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून मंदिर शोधण्यासाठी गावातीलच रहिवासी शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी थेट पोलीस प्रशासनालाच  निवेदन सादर करून मंदिर शोधण्याची मागणी केली आहे.

या बाबत पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन सानप यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ,  पहूर कसबे तालुका जामनेर जिल्हा जळगाव येथील गावाच्या प्रवेशद्वारापाशी वाघूर नदीच्या तिरावर नोंदणीकृत जय सप्तशृंगी निवासीनी मॉ ट्रस्ट रजि . नं . ९८३ आहे. या ट्रस्टच्या अध्यक्षांच्या नावे ग्रामपंचायत पहूर कसबे,  ता. जामनेर, जि. जळगांव येथे नमुना नं . ८ वर मालमत्ता क्रमांक २४३ नुसार मालकी हक्काची  नोंद करण्यात आलेली  आहे.  महाराष्ट्र राज्य शासन ग्रामविकास खात्याच्या ग्रामिण तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत या ट्रस्टला क वर्ग दर्जा मिळालेला आहे . ट्रस्टने प्रस्ताव दाखल करताना जय सप्तश्रृंगी मातेचे मंदिर मंदिर उभारल्याचे दाखविले आहे . तसेच या मंदिरात चैत्र पौर्णिमा , अश्विन नवरात्री उत्सव मोठ्या थाटात साजरे होत असल्याची माहिती नमूद केलेली आहे . असंख्य भाविक दर्शनाला येतात , असेही म्हटले आहे .

परंतू आज शुक्रवार दि . २६ एप्रिल २०२४  रोजी मी  सकाळी  ट्रस्टने नमुद केलेल्या जागी दर्शनासाठी गेलो असता जय सप्तश्रृंगी मातेचे मंदिर जागेवर दिसून आले नाही . सदर मंदिरात मला जय सप्तश्रृंगी मॉ आरती समिती स्थापन करून सकाळ सध्याकांळ आरती करण्याचा विचार असून मी दर्शनासाठी गेलो असता सर्वत्र घाणीचे साम्राज्य आढळून आले ,तसेच आज रोजी जागेवर मंदिर नसल्याचे दिसून आले .  तरी आपण जय सप्तश्रृंगी मातेच्या मंदिराचा शोध घ्यावा , ही नम्र विनंती . या निवेदनाच्या प्रति मा . जिल्हाधिकारी , मा . पोलीस अधिक्षक ,   मा . सहाय्यक धर्मादाय आयुक्त मा . मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव,  मा . जिल्हा माहिती अधिकारी जळगांव आदींना देण्यात येणार आहेत.

# उन्हाचे चटके त्यात वादळीवाऱ्यासह सरी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात उन्हाचे चटके त्रासदायक ठरत असतानाच उकडा वाढला आहे तर ढगाळ वातावरणामुळे कमाल तापमानात चढ उतार सुरुच आहे.त्यामुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहे. यंदा कधि नव्हे ऐवढे मार्च/ एप्रिल मध्ये कडाक्याचे उन्ह उकडा दमटपणा उन्हाचे चटके एक ना अनेक समस्या वाढल्या आहे.तर अधून मधून सततचे ढगाळ वातावरण त्यात दोनतीन दिवसांपासून वादळी वारे पावसाच्या सऱ्या त्यामुळे आणखीन उकडा दमट हवामानात बदल होत असल्याने त्रास वाढला आहे. आलेल्या अवकाळी पावसाने टरबुज ला फटका बसला आहे.तर वादळीवाऱ्याने अंब्याची पडझड पिकांची नासाडी झाली आहे.विटभटटी धारक,मका खरेदीदार वादळ व पावसामुळे मोठी तारांबळ उडाली आहे.अधिकच्या वाऱ्याने येथे यात्रा व आठवडी बाजारात व्यापारी व्यावसायिक यांची चिंता वाढवली.

# वयाच्या ९२ व्या वर्षी स्वयंस्फूर्तीने बजावला मतदानाचा हक्क


## सन १९५७ ते २०२४ सलग १७ लोकसभेसाठी केले मतदान

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** काल दि.२६ एप्रिल रोजी पार पडलेल्या १८ व्या लोकसभा निवडणुकीत अकोला लोकसभा मतदारसंघातील रिसोड - मालेगाव विधानसभा मतदार संघात येणाऱ्या शेलुखडसे येथील श्री. नागोराव तुळशीराम खडसे यांनी वयाच्या ९२ व्या वर्षी मतदान केंद्र गाठून स्वयंस्फूर्तीने मतदानाचा हक्क बजावला आहे. त्यांचा उत्साह बघुन गावातील तरुणांना मतदान करण्याची प्रेरणा मिळत होती.

१९ सप्टेंबर १९३३ साली जन्मलेले श्री. नागोराव तुळशीराम खडसे हे शेलुखडसे गावातील वयाने सर्वात मोठे असलेले गृहस्थ आहेत. वयोमानामुळे कंबर दुखी व गुढघे दुखीचा त्रास असतांनाही स्वयंस्फूर्तीने चालत जाऊन मतदान केंद्र गाठत आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. त्या अनुषंगाने त्यांच्याशी प्रत्यक्ष भेटून संपर्क साधला असता ते दै. आधुनिक केसरी सोबत दिलखुलासपणे बोलत होते. बोलतांना त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील व स्वातंत्र्यानंतरच्या बऱ्याच आठावनींना उजाळा दिला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की १९४७ साली आपला देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा मी जेमतेम पंधरा वर्षांचा असेन, त्यामुळे इंग्रज काळातील बऱ्याच गोष्टी मला कळत होत्या. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे गुलामगिरी, पारतंत्र्य काय असते हे मी नेमक्या कळत्या वयात जवळून पाहिले आहे. त्यामुळे आपसूकच स्वातंत्र्याची किंमत माझ्या सारख्या अनेक नव्वदी पार केलेल्या वयोवृध्दांसाठी खुप अनमोल आहे. स्वातंत्र्या नंतर १९५१-५२ साली पहिली सार्वत्रिक निवडणुक झाली तेंव्हा मतदान करण्याची खुप ईच्छा होती. पण वय आड येत होते.मात्र १९५७ साली झालेल्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच मतदान करण्याचा अधिकार मला प्राप्त झाला होता.तो क्षण माझ्या आयुष्यातील सुवर्ण क्षण ठरला आहे. तेंव्हापासून सलग १७ लोकसभा निवडणुकीत व ईतर अनेक निवडणुकांत मी माझे आद्य कर्तव्य म्हणुन माझा मतदानाचा हक्क बजावत असून, देशाचा कारभार कोणाच्या हाती सोपवायचा या प्रक्रीयेत माझा खारीचा वाटा राहिला आहे. आपल्या संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला दिलेला मतदानाचा अधिकार हा सर्वोच्च अधिकार आहे असे मी मानतो. त्यामुळे प्रत्येकाने मतदानाकडे नकारात्मक दृष्टकोनातून न बघता ते एक राष्ट्रीय कार्य समजुन मतदानाचे कर्तव्य बजावलेच पाहिजे असं ९२ वर्षाचे वृद्ध नागोराव खडसे मोठ्या जोषात येवून आधुनिक केसरी सोबत बोलत होते.१९४७ नंतरची ही २०२४ ची १८ वी लोकसभा निवडणूक आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळून जवळपास ७७ वर्ष लोटत आहेत. तरी सुद्धा शासनाला मतदान करण्याविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम राबवावी लागते ही लोकशाहीसाठी लाजिरवाणी बाब आहे. आणि दुसरे विशेष म्हणजे एव्हढी जनजागृती करून सुध्दा प्रत्यक्ष मतदान साठ ते सत्तर टक्केच्या आत होते याचे खुप दुःख वाटत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पुढे बोलतांना ते म्हणाले आमच्या काळात माहितीची माध्यमे खुप कमी होती. त्यामुळे आकाशवाणी वरुन ठरावीक वेळेत प्रसारीत करण्यात येणाऱ्या बातमी पत्राकडे सर्वांचे लक्ष असायचे आता तर दिल्लीत काय घडलं ते काही मिनिटातच घरबसल्या थेट पाहावयास मिळते. त्यामुळे आपसूकच देशात काय चाललंय हे प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचते. तरी सुद्धा बरेच नागरीक लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्यास टाळाटाळ करतात हे लक्षण लोकशाही साठी घातक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.



**मतदानाची टक्केवारी वाढवणे युवा पिढीची जबाबदारी :** खरं पाहिलं तर, मतदान हे देशाच्या कारभारात प्रत्यक्ष सहभागी होण्याचे मुख्य साधन आहे . कारण आपण निवडून देतो तो लोकप्रतिनिधी हा आपला असतो . त्यामुळे साहजिकच आपण त्याला हक्काने जाब विचारू शकतो . त्याने जर आपल्याकडे दुर्लक्ष केले तर पुढच्या निवडणूकीत आपण त्याला घरी बसवू शकतो . ही मतदानाची ताकद लक्षात घेऊन युवा पिढीने मतदानाची टक्केवारी वाढविण्याची जबाबदारी आता स्वीकारली पाहिजे असा संदेश यानिमित्ताने ९२ वर्षाच्या नागोराव खडसे यांनी दै . आधुनिक केसरी सोबत बोलतांना दिला आहे .

# फुलांचा वर्षाव करत भिक्खू महासंघातर्फे मंगलप्रभात फेरी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती ते लक्ष्मी नगर येथील लोक जनशक्ती पार्टी चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांच्या नवीन वास्तू घरापर्यंत भिक्खू संघातर्फे मंगल मैत्री प्रभात फेरी काढण्यात आली आहे.

सदर ही प्रभात फेरी भन्ते आनंद थेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्गस्थ झाली आहे. यावेळी फुलांचा वर्षाव करत बुद्ध भिक्खूचं स्वागत करण्यात आले. याप्रसंगी धम्ममय वातावरण पाहायला मिळालं. सदर या प्रभात फेरीचा समारोह लोकजन शक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांच्या नवीन वास्तू घराचे पूजन करत करण्यात आले. याप्रसंगी तथागत गौतम बुद्ध, व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजनही यावेळी भन्ती आनंद थेरो यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सामुदायिक त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आल्यानंतर भव्य भोजन दानाचा कार्यक्रम पार पडला. सदर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेशभूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समितीचे अध्यक्ष आनंद सैंदाणे यांनी केले.
सदर या कार्यक्रमाचे आयोजक दिलीप आप्पा साळवे,मीनाताई दिलीप साळवे,शोभाताई चव्हाण, मधुकर चव्हाण,रंजना मधुकर चव्हाण,सुरज साळवे, हेमलता साळवे, रमेश जगदेव, नयना जगदेव, सिद्धांत साळवे, रूपाली चव्हाण,सागर चव्हाण,दिपाली चव्हाण, दत्तू साळवे, शुभम साळवे यांनी केले,याप्रसंगी कुंदन खरात, त्रिंबक खरात, प्रमोद सोनवणे, मुरलीधर वाघ, गौतम वाघ, सागर परदेशी, बबलू शिंदे, दीपक नगराळे, रमेश बागुल, पत्रकार रवींद्र नगराळे व पत्रकार दीपक वाघ आधी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

# ओबीसी प्रकल्पग्रस्तांना न्याय दिल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही

## पानवडाळा येथील महापंचायतमध्ये हंसराज अहीर यांचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ओरोबिंदो रिआलिटी इन्फ्रास्ट्रक्चर लिमी च्या पानवडाळा, टाकळी, जेना, बेलोरा, डोंगरगांव खडी, किलोनी, कान्सा, शिरपूर उत्तर व दक्षिण कोळसा खाणी करीता होणाऱ्या भूसंपादन, पूनर्वसन व रोजगार विषयक मागण्यासंदर्भात ओबीसी प्रकल्पग्रस्तांनी बोलाविलेल्या महापंचायत व संवाद सभेला प्रमुख उपस्थिती दर्शवित ही महापंचायत प्रकल्पग्रस्तांच्या न्याय लढ्याचे रणशिंग फुंकणारी असून संबंधित ओबीसी व अन्य प्रकल्पग्रस्तांना त्यांचे न्यायहक्क मिळवून दिल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही असा निर्धार राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केला. टाकळी, जेना, बेलोरा कोळसा खाण प्रकल्पग्रस्तांच्या भद्रावती तालुक्यातील पानवडाळा येथे दि. 26 एप्रिल रोजी पार पडलेल्या संवाद सभेत उपस्थित शेकडो प्रकल्पग्रस्तांना संबोधित करतांना ते बोलत होते. या संवाद सभेला रमेश राजुरकर, पानवडाळाचे सरपंच प्रदीप महाकुलकर धनंजय पिंपळशेंडे, अशोक हजारे, विजय वानखेडे,नरेंद्र जीवतोडे, प्रशांत डाखरे, पवन एकरे, राकेश तालावार, आकाश वानखेडे, प्रदिप मांडवकर, विजय ढेंगळे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी हंसराज अहीर यांनी प्रकल्प्रग्रस्तांच्या न्यायोचित मागण्या व समस्या जाणून घेतल्या त्याबाबत उपस्थितांना योग्य मार्गदर्शन केले. आपल्या मागण्यांसाठी आक्रमकतेने समस्यांचे निराकरण करण्याची तयारी करण्याची आवश्यकता असल्याचे अहीर यांनी यावेळी सांगीतले. प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचा मोबदला, निर्धारीतकालावधीत जमिनीचे संपादन बेलोरा गावाचे योग्य ठिकाणी पूनर्वसन हाय पॉवर कमिटीनुसार स्थानिक प्रकल्पग्रस्त युवकांना रोजगार व प्रकल्पाकरीता लागणारी संपूर्ण 936 हे. जमिन ठराविक कालावधीमध्ये संपादित करुन भरीव मोबदला मिळाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असा विश्वास अहीर यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना दिला.
या महापंचायतीला ईश्वर उताने, भाऊराव महाकुलकर, पंढरी पिंपळकर, जितू पिंपळकर, धराज आसेकर, नितेश बोथले, गुणवंत उताने, अनिल चिकटे, मंगेश लांडगे, निलेश उताने, लहू बोथले, कवडूजी भोयर, सचिन महाकुलकर, मोहन आसेकर, प्रमोद आसेकर, गजानन उताने, महेश उताने, सुरज झिलपे, विकास घोसरे, पंढारी ताजने, सौ प्रिती घोसरे, सौ सविता महाकुलकर, सौ सुवर्णा महाकुलकर, सौ रजपी आस्वले, पोलिस पाटील सौ सुषमा उताने, सौ छाया पिंपळकर, सौ कल्पना घोसरे, सौ दिपाली काळे, सरंपच डोंगरगांव खडी सौ मनिषा तुरानकर, हेमंत धानोरकर, राहुल सोनेकर, विलास परचाके, प्रशांत मत्ते, प्रवीण देऊरकर, लेडांगे यांचेसह पानवडाळा, टाकळी, जेना, बेलोरा, डोंगरगांव खडी, किलोनी, कान्सा, शिरपूर येथील बहुसंख्य ओबीसी प्रकल्पग्रस्त बांधव उपस्थित होते. यावेळी महापंचायतीला उपस्थित सरपंच व प्रकल्पग्रस्तांनी न्यायाकरीता आंदोलनात्मक पवित्रा घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

# विदर्भात अपेक्षेपेक्षा कमी मतदान

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यात शुक्रवारी पूर्व विदर्भातील वर्धा व पश्चिम विदर्भातील यवतमाळ-वाशीम, अमरावती, अकोला आणि बुलढाणा या एकूण पाच मतदारसंघांत दुपारी ५ वाजेपर्यंत सरासरी ५३ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्याप्रमाणे दुसऱ्या टप्प्यातही विदर्भात मतदानाची टक्केवारी कमी राहिली. मराठवाड्यातील परभणी, हिंगोली आणि नांदेड या तीन मतदारसंघांत पाच वाजेपर्यंत सरासरी ५३.७९ टक्के मतदान झाले. मतदारांचा निरुत्साह आणि वाढत्या उन्हाच्या 'झळा' टक्केवारीला बसल्या असल्या असून याचा निकालावर काय परिणाम होईल, याची उत्कंठा आहे.
दुपारी एकपर्यंत पाचही मतदारसंघांत सरासरी ३० टक्के मतदानाची नोंद झाली होती. तीनपर्यंत त्यात वाढ होऊन ते ४०.०१ टक्के झाले. पाच वाजेपर्यंत सरासरी ५३ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली. अमरावतीत साईनगर भागातील मतदान केंद्रात प्रवेश करण्याच्या मुद्यावरून भाजपच्या नवनीत राणा व शिवसेनेच्या माजी नगरसेविका मंजूषा जाधव यांच्यात वाद झाला. यवतमाळ-वाशीम मतदारसंघात हिवरी येथे मतदान सुरू असताना केंद्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नाष्टा करण्यासाठी मतदान थांबवले. अकोल्यात ॲड. प्रकाश आंबेडकर, काँग्रेसचे डॉ. अभय पाटील, अमरावतीत नवनीत राणा, काँग्रेसचे आ. बळवंत वानखडे, बुलढाण्यात प्रतापराव जाधव, नरेंद्र खेडेकर, वर्ध्यात रामदास तडस, अमर काळे, यवतमाळ-वाशीमध्ये राजश्री पाटील व संजय देशमुख यांच्यासह २०४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे.

# काँग्रेसचे राजेंद्र बरकडे यांचा राजीनामा

## बरकडे बारामती मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** काँग्रेस ओबीसी विभाग पुणे जिल्हाध्यक्ष असलेले राजेंद्र बरकडे हे स्वतः लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिलेले आहेत.ते काँग्रेसचे असुन सुद्धा त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे.काँग्रेस पक्ष हा महाविकास आघाडीचा घटक पक्ष असल्याने बारामती लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाकडे गेला.खासदार सुप्रिया सुळे यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे.अशी राजकीय परिस्थिती असताना सुद्धा सामान्य कुटुंबातील व्यक्तीने निवडणुकीच्या रिंगणात का उतरू नये हा आक्रमक पवित्रा घेत बारामती लोकसभा मतदारसंघातून राजेंद्र बरकडे यांनी ते स्वतः काँग्रेस पक्षाचे असून सुद्धा अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला.निवडणूक आयोगाकडून त्यांना स्पॅनर (पाना) हे चिन्ह मिळालेले आहे.काँग्रेसचे पदाधिकारी म्हणून राजेंद्र बरकडे यांनी महाविकास आघाडीचा



धर्म पाळणे अपेक्षित होते.
परंतु या भानगडीत पडून न राहता व आपल्या मुळे काँग्रेस पक्षाकडे बोट जाऊ नये म्हणून अखेर काँग्रेसचे अपक्ष उमेदवार राजेंद्र बरकडे यांनी स्वत हून काँग्रेस ओबीसी विभाग पुणे जिल्हाध्यक्ष आणि सदस्य पदाचा राजीनामा देत स्वतःलढण्याची मोकळी वाट करून घेतली आहे.कॉग्रेस ओबीसी विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भानुदास माळी यांच्याकडे हा राजीनामा पाठविला आहे. पदमुक्त करण्यात यावे.अशी विनंती सुद्धा राजेंद्र बरकडे यांनी केलेली आहे. राजीनामा पत्रात राजेंद्र बरकडे यांनी असे म्हटलेले आहे की,मी अनेक वर्षे काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता ते पुणे जि.काँग्रेस ओबीसी विभाग अध्यक्ष पदापर्यंत काम करत आलो असुन आतापर्यंत मी पक्षाचे निष्ठेने काम केले आहे.माझ्या वैयक्तिक अडचणीमुळे काँग्रेस पक्षाची कोणतीही हानी होऊ नये.या कारणास्तव मी माझ्या काँग्रेस पक्षाचा पुणे जि.काँग्रेस ओबीसी विभाग अध्यक्ष पदाचा राजीनामा आपणाकडे सुपुर्त करत आहे.तरी आपण माझ्या अर्जाचा विचार करून पदमुक्त करावे. अशी विनंती सुध्दा राजेंद्र बरकडे यांनी केलेली आहे.राजेंद्र बरकडे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की,पुणे जिल्हा कॉग्रेस ओबीसी विभाग अध्यक्ष पदाचा राजीनामा महाराष्ट्र पद्रेश कॉग्रेस ओबीसी विभाग अध्यक्ष आदरणीय भानुदास माळी साहेब यांच्याकडे सुपूर्त केला असुन आजपर्यंत जेवढं संघटन वाढवायचा प्रयत्न करायचा तेवढा केला आहे इथुन पुढे सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करण्याची इच्छा आहे.असे सुद्धा त्यांनी सांगितले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in




# शिवुर्जा प्रतिष्ठानच्या दिव्यांगांची भैरवगडावर भटकंती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शिवुर्जा प्रतिष्ठानच्या वतीने अकोले तालुका नगर जिल्ह्यातील भैरवगड शिरपुंजे किल्ल्यावर आयोजित केलेल्या भटकंतीमध्ये महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या ९ दिव्यांगांनी सहभाग घेतला होता.

शिवुर्जा प्रतिष्ठान या दिव्यांगांच्या दुर्ग भ्रमण संवर्धन संस्थेच्या वतीने प्रत्येक महिन्याला महाराष्ट्रातील कोणत्याही एका गड किल्ल्यावर भटकंती व अभ्यास मोहिमेचे आयोजन करण्यात येते. रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी एप्रिल महिन्यातील उन्हाळी ट्रेक भटकंती मोहिमेचे आयोजन अकोले तालुक्यातील सह्याद्री पर्वत रांगेत असलेल्या व कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात असलेल्या चार हजार फूट उंचीच्या भैरवगड शिरपुंजे या किल्ल्यावर करण्यात आले होते.

या अनोख्या भैरवगड दुर्ग भटकंती मोहिमेसाठी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, पुणे, बीड, नाशिक, जळगाव, धाराशिव ६ जिल्ह्यातून नऊ दिव्यांगांसह १४ दुर्गप्रेमी भटक्यांनी सहभाग घेतला होता. प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी गाडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील विविध जिल्ह्यातील दिव्यांगांनी आदल्या दिवशी शनिवार दिनांक २० एप्रिल रोजी भैरवगडाच्या पायथ्याशी असलेल्या शिरपुंजे गावाच्या बाहेर एकत्र येत रात्रीचा मुक्काम ठोकला. रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजता भैरवगड चढाई सुरुवात करण्यात आली. झाडीझुडपातून, कडे कपारीतून, खाच खळग्यातून, दगड धोंड्यातून तर कधी लोखंडी शिडीवरून तर कधी खोदकाम केलेल्या कातळ कोरीव पायऱ्यातून एकमेकांना आधार देत या दिव्यांगांनी अवघ्या अडीच तासात भैरवगडाचा बालेकिल्ला गाठला. भैरवगडावर अनेक पाण्याची टाके, कोरलेल्या प्रशस्त गुहा, भैरोबाचे मंदिर, तीन वीरगळी , रांजण खळगे, भग्न प्रवेशद्वार, पडझड झालेली तटबंदी, ऐतिहासिक वस्तूंचे अवशेष व अनेक ऐतिहासिक खानाखुणा असलेल्या या भैरवगडाबद्दल दुर्ग अभ्यासक तथा प्रतिष्ठानचे सचिव कचरू चांभारे यांनी सविस्तर माहिती दिली. भैरवगडावर दिव्यांगांनी फेरफटका मारून अभ्यासपूर्ण भटकंती केली. या मोहिमेत शिवाजी गाडे पैठण छत्रपती संभाजीनगर, कचरू चांभारे बीड, अंजली प्रधान सागर बोडके नाशिक, मच्छिंद्र थोरात, जीवन टोपे, ओम तारू , सतीश आळकुटे पुणे, विजय पाटील जळगाव भिवंडी या नऊ दिव्यांगांनी सहभाग घेतला होता तर या सर्व दिव्यांगांना बजरंग काळे पैठण, शिवशंकर राऊत वाशी धाराशिव, राहुल अग्निहोत्री नाशिक, सार्थक गायकवाड अश्विनी तारू पुणे या सक्षम व्यक्तींनी मदतनिसांची भूमिका बजावून भैरवगड चढण्यास व उतरण्यास मोठी मदत केली.

# श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथील साईबाबांच्या समकालीन साईभक्त श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एक मे २०२४ रोजी भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच गरजू वयोवृद्धांसाठी मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर सकाळी ९ ते २ या वेळेत आयोध्या हॉस्पिटल बिल्डिंग शिर्डी येथे संपन्न होणार असून या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आव्हान ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गायकवाड विश्वस्त संगीता गायकवाड साईराज गायकवाड यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे. अरुण गायकवाड म्हणाले की वाढता वैद्यकीय खर्च वाढलेली मोठ्या प्रमाणावर महागाई कौटुंबिक होणारी ओढाताण त्याबरोबरच वाढलेले वय व कुटुंबाकडून होणारे दुर्लक्ष या दृष्टीने समाजात वयोवृद्धांकडे दुर्लक्ष होत असल्याचे पुढे आले होते.

त्यामुळे श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून प्रति महिन्याला सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अशा प्रकारचे शिबिराचे आयोजन करण्यात येत असून दोन शिबिर या अगोदर पार पडले असून हे तिसरे शिबिर एक मे रोजी संपन्न होणार आहे पार पडलेल्या दोन शिबिरात ७५ लोकांवर आत्तापर्यंत मोफत नवी मुंबई येथे शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून आठशे लोकांनी नेत्र तपासणी करून मोफत चष्मे देखील वाटप करण्यात आले होते अशा प्रकारे प्रत्येक महिन्याला असे मोफत शिबिर आयोजित करणारे शिर्डी येथील श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट नगर जिल्ह्यातील एकमेव ट्रस्ट ठरले असून साईबाबांनी दिलेले आरोग्य सेवेचा व संदेशाचा अंमलबजावणी करणारी एकमेव सेवाभावी संस्था ठरली असून नगर नाशिक सह मराठवाड्यातील लोकांना या शिबिराचा मोठा फायदा होत असतो १ मे रोजी होणाऱ्या शिबिरासाठी रुग्णांनी भाग घेऊन शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान अरुण गायकवाड यांनी केले आहे.

# कन्नडमध्ये आरटीओ कार्यालयाच्या वतीने 'एक नैतिक मतदार व्हा' अभियान

## एक हजार रिक्षांना व टॅक्सींना लावले जागृतीचे स्टिकर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील हॉटेल न्यु पाप्युलर समोर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी आरटीओ कार्यालयाच्या वतीने 'एक नैतिक मतदार व्हा' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत कन्नड शहरात एक हजार रिक्षा आणि काळी पिवळी टॅक्सीला शुक्रवारी (दि.२६) एप्रिल स्टिकर लावण्यात आले व जनजागृती करत मतदान करावे अशी आवाहन करण्यात आले. या संदर्भात सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक विकास डोंगरे यांनी सांगितले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हॉटेल ग्रेट पॉप्युलर समोर रिक्षांना थांबवून 'एक नैतिक मतदार व्हा' असे स्टिकर लावण्यात आले. पुढे बोलताना ते म्हणाले की, आमचे वरिष्ठ अधिकारी मोटर वाहन निरीक्षक अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शहरातील मतदारांमध्ये जनजागृती करत आहोत. वाहतुकीचे नियम पाळावेत यासोबतच प्रत्येकाने मतदान करावे असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी ग्रेट पॉप्युलर हॉटेलचे संचालक सिद्धार्थ निकाळजे, सिद्धार्थ निकाळजे, जुबेर शेख आरिफ शेख, वाहन चालक वसीम शेख, यमाजी वणे, विजय जाधव, दिपक घुगे, शिवा उचित, बाळू आव्हाड इत्यादींची प्रमुख उपस्थीती होती.




# भ्रष्ट व्यवस्थापनामुळे साखर कारखाना आर्थिक संकटात : अनिल औताडे

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शिरसगाव अशोक कारखाना व्यवस्थापनाने ३० एप्रिल च्या आत गाळप झालेल्या संपूर्ण उसाचे एफ.आर. पी.प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे देयक त्वरित अदा करावे अन्यथा शेतकरी संघटना तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशारा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिला आहे. त्यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की,"श्रीरामपूर तालुक्यातील अशोक सहकारी साखर कारखान्याची गाळप हंगाम २०२३-२४ ची सांगता कारखान्याचे अध्यक्ष भानुदास मुरकुटे यांनी नुकतीच केली आहे.अशोक सहकारी साखर कारखाना हा गेली चाळीस वर्षापासून ऊस उत्पादक सभासदांनी विश्वास ठेवल्यामुळे एक हाती सत्ता भानुदास मुरकुटे यांच्याकडे दिली आहे.कारखान्याबाबत सातत्याने कारखान्याचे सर्वेसर्वा समजले जाणारे माजी आ.भानदास मुरकुटे यांनी सातत्याने अशोक शेजारील गणेश व डॉक्टर तनपुरे कारखान्याची उदाहरणे देऊन सभासदांना खोटी भीती दाखवली गेली आहे.परंतु अशोक कारखान्याची वस्तुस्थिती समोर येऊ दिली नाही.याबाबत जिल्हा शेतकरी संघटनेने गेल्या १२-१३ वर्षापासून शेतकरी संघटनेचे नेते व प्रदेश उपाध्यक्ष स्व.बबनराव काळे यांच्या नेतृत्वाखाली व तदनंतर त्यांचे सुपुत्र ॲड अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने कारखान्याच्या आर्थिक व्यवहाराची पोलखोल केली गेली आहे.सन-२००९-१० मध्ये साखरेचे दर ०२ हजार २०० रुपये प्रति क्विंटल असताना अशोक कारखान्याने दोन हजार रुपये प्रतिक्विंटल दर दिला होता. त्यावेळी कारखान्याकडे कोजन इथेनॉल असे कुठलेही उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प अस्तित्वात नव्हते.उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प अस्तित्वात नसतानाही साखरेचा दर व उसाच्या दरामध्ये फक्त दोनशे रुपयांचा प्रति टन फरक होता.आज रोजी साखर दर ०३ हजार ५०० रुपये प्रति क्विंटल असून उसाचा दर ०२ हजार ७०० रुपये प्रति टन आहेत.तसेच कारखान्याकडे उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प आहेत तरीही अशोक कारखाना आज रोजी १५ जानेवारी ते १५ एप्रिल पर्यंतचे देयक देण्यास असमर्थ कसा ठरत आहे.ही बाब तालुक्याच्या व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने दुर्दैवी व गंभीर आहे.कारखाना व्यवस्थापनाच्या भ्रष्ट व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे ऊसाचे देयक होत नाही हि वस्तुस्थिती आहे.आज रोजी अशोक सहकारी साखर कारखान्यावर ४०० कोटी मध्यम मुदत कर्ज व १३५ कोटी पूर्व हंगामी कर्ज असे एकूण ५३५ कोटी रुपये कर्ज आहे.सदर कर्जाबाबत अशोक संचालक मंडळ सभासदांपुढे वस्तुस्थिती मांडताना दिसत नसून केंद्राच्या धोरणावर व साखरेच्या दरावर बोट दाखवून ऊस उत्पादकांची दिशाभूल करण्याचे काम चालू आहे.परंतु कारखाना अध्यक्ष मुरकुटे यांनी अद्याप पर्यंत केंद्राच्या व राज्य सरकारच्या धोरणाबाबत कधीही संघर्ष केलेला दिसून येत नाही यावरून ही फक्त नौटंकी असल्याचे दिसून येत असल्याचा आरोप केला आहे.हा फॉर्म्युला जिल्ह्यातील इतर कारखान्या प्रमाणेच भानुदास मुरकुटे यांचा गेल्या पंचवीस वर्षापासून सुरू आहे.त्यामुळे अशा चुकीच्या पद्धतीने शेतकऱ्यांची दिशाभूल करून घेतली जाणार नाही असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.अशोक कारखान्याकडे असलेल्या ५३५ कोटी कर्जापैकी १०० कोटी कर्ज जिल्हा बँकेने वसूल केले आहे आणि सदर कर्ज हे कारखान्याने नियम बाह्य पद्धतीने घेऊन सदर कर्जातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप केला आहे. आज रोजी जिल्हा बँकेवर कारखान्याचे अध्यक्ष स्वतः भानदास मुरकुटे हे संचालक असून त्यांच्याकडून कारखान्याची आर्थिक परिस्थिती वाचविण्यासाठी दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांची जिल्हा बँकेची असलेली कर्ज वसुली सक्तीने केली आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर